**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**
**कार्यपत्रिका क्रमांक – २७**
**सभावृत्तांत**

दिनांक – २०.२.२०१९ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी- २०१९ ची मासिक मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २०.२.२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर
२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.दत्तात्रय बाबूराव साने
६) मा.अश्विनी संतोष जाधव
७) मा.सारीका शिवाजी सस्ते
८) मा.वसंत प्रभाकर बोराटे
९) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

,

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.केशव हनुमंत घोळवे

३७) मा.मंगला अशोक कदम

३८) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

,

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.भालेकर प्रविण महादेव

४३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४६) मा.घोलप कमल अनिल

४७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४८) मा.पवळे सुमनताई मधुकर

४९) मा.चिखले सचिन तुकाराम

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.शैलजा अविनाश मोरे

५५) मा.बाबर शर्मिला राजू

५६) मा.अमित राजेंद्र गावडे

५७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६१) मा.ढाके नामदेव जनार्दन

६२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

,

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६९) मा.जयश्री वसंत गावडे

७०) मा.कोमल दिपक मेवानी

७१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.शाम गणपतराव लांडे

७४) मा.सुजाता सुनिल पालांडे

७५) मा.योगेश मंगलसेन बहल

७६) मा.कदम निकीता अर्जुन

७७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८०) मा.नढे विनोद जयवंत

८१) मा.काळे उषा दिलीप

८२) मा.कोकणे संतोष अंकुश

८३) मा.पवार मनिषा प्रमोद

८४) मा.बारणे अर्चना तानाजी

८५) मा.अभिषेक गोविंद बारणे

८६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८७) मा. अ‍ॅड.भोसले सचिन सुरेश

८८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८९) मा.बारणे माया संतोष

,

९०) मा.निलेश हिरामण बारणे

९१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९२) मा.दर्शले रेखा राजेश

९३) मा.कलाटे राहुल तानाजी

९४) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९५) मा.ममता विनायक गायकवाड

९६) मा.कामठे तुषार गजानन

९७) मा.चोंधे आरती सुरेश

९८) मा.कस्पटे संदिप अरुण

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४) मा.कुटे निर्मला संजय

१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.मुंढे उषा अंकुश

१०९) मा.लोखंडे चंदा राजू

११०) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१११) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

,

११५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११७) मा.नवनाथ दत्तू जगताप

११८) मा.संतोष बबन कांबळे

११९) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२१) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२२) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२५) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डिकर- आयुक्त, मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.निकम-सह शहर अभियंता, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.राऊत- प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. १४ तारखेला पुलवामा येथे भारताचे ४० जवान अतीरेकी हाल्ल्यामध्ये त्याठिकाणी शहिद झालेल आहेत. अशाप्रकारचा या देशावरचा हा सर्वात मोठा हाल्ला आहे. या अतीरेकी हाल्ल्यामुळे संपुर्ण देश एकात्मतेच्या भावनेनी ढवळून निघाला आहे दु:खाच्या सागरात सुध्दा लोटला गेला. झालेल नुकसान कधीच भरुन येणार नाही. परंतु देश आहे, देश चालवायचा आहे त्याच बरोबर

,

देशाच्या प्रती त्या सैनीकानी आपले प्राण गमावले त्यांच्याप्रती सुध्दा आदर आहे, सहानुभूती आहे, प्रेम आहे. त्यांच्या देशभक्तीला आमचा सलाम आहे. या सगळया पार्श्वभूमीवरती आपण त्यांच्या दहशतवादी हाल्ल्याचा जितका निषेध करु तेवढा कमीच आहे परंतु या निषेधा बरोबरच आपल्याला जागरुक राहण्याची आणि संघटीत होण्याची फार गरज आहे. मा.महापौर साहेब, आज याठिकाणी पुलवामा याठिकाणी झालेल्या घटनेचा मी सर्व पक्षाच्या वतीने तीव्र निषेध नोंदवते आणि त्यांचा धिक्कारही करते, अशाप्रकारची घटना परत परत होवू नये. सर्व शहीदांच्या कुटूंबीयाच्या पाठीशी सर्व पक्षीय नगरसेवक, या पिंपरी चिंचवड शहरातील जनता, सर्व पक्षाचे पक्षाध्यक्ष असतील, गटनेते असतील, पुढारी, नेते या सगळयांच्या वतीने मी त्यांना याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करते. सर्व सैनिकांच्या पाठीशी आम्ही ताकदीन उभे आहोत, देश त्यांच्या बरोबर आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, सिमाताईंनी जो विषय मांडला आहे त्याला सर्व पक्षाच्या वतीने सूचनेस अनुमोदन देतो आणि मी सर्व पक्षाच्या वतीने पुलवामा येथे झालेल्या हाल्ल्याचा तीव्र शब्दात जाहीर निषेध करतो. आपल्या जवानांच सिमेवर बलीदान झालेल आहे, मी सर्व पक्षाच्या वतीने निषेध करतो. तरी मा.महापौरांना विनंती करतो की या विषयावर श्रध्दांजली अर्पण करावी आणि सभागृहाच्या वतीने, पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने, सर्व पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करुन ही सभा तहकूब करावी अशी मी विनंती करतो.

**मा.महापौर-** जम्मू-काश्मिरमध्ये जे जवान शहीद झालेले आहेत त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.विलास मडिगेरी -** मा. महापौर साहेब, आजची ही सभा पुलवामा येथील दहशती हाल्ल्याचा निषेध करुन शुक्रवार दि.२२/२/२०१९ रोजी सकाळी ११.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

,

**मा.महापौर-** उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने आजची सभा शुक्रवार दि.२२/२/२०१९ सकाळी ११.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

(राहुल गुलाब जाधव)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

,

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**
**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २७</u>**
**<u>सभावृत्तांत</u>**
**<u>(दिनांक २०/२/२०१९ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २२.२.२०१९</u> <u>वेळ – सकाळी ११.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/२/२०१९ ची तहकूब मा. महापालिका सभा शुक्रवार दिनांक २२/२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ९) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १२) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |

,

१३) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२२) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२३) मा.फुगे भिमाबाई पोपट

२४) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२५) मा.लोंढे नम्रता योगेश

२६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२७) मा.लांडे विक्रांत विलास

२८) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२९) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३०) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३१) मा.अनुराधा गणपत गोरखे

३२) मा.केशव हनुमंत घोळवे

३३) मा.मंगला अशोक कदम

३४) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३५) मा.अश्विनी भिमा बोबडे

३६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३७) मा.संजय बबन नेवाळे

,

३८) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३९) मा.भालेकर प्रविण महादेव

४०) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४३) मा.घोलप कमल अनिल

४४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४५) मा.पवळे सुमनताई मधुकर

४६) मा.चिखले सचिन तुकाराम

४७) मा.जावेद रमजान शेख

४८) मा.यादव मीनल विशाल

४९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५०) मा.प्रमोद कुटे

५१) मा.शैलजा अविनाश मोरे

५२) मा.बाबर शर्मिला राजू

५३) मा.अमित राजेंद्र गावडे

५४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५७) मा.ढाके नामदेव जनार्दन

५८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५९) मा.करुणा शेखर चिंचवडे

६०) मा.भोईर सुरेश शिवाजी

६१) मा.अपर्णा निलेश डोके

६२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

,

६३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६५) मा.जयश्री वसंत गावडे

६६) मा.कोमल दिपक मेवानी

६७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६८) मा.सुलक्षणा राजू धर

६९) मा.सुजाता सुनिल पालांडे

७०) मा.योगेश मंगलसेन बहल

७१) मा.कदम निकीता अर्जुन

७२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७४) मा.नढे विनोद जयवंत

७५) मा.पाडाळे निता विलास

७६) मा.काळे उषा दिलीप

७७) मा.पवार मनिषा प्रमोद

७८) मा.बारणे अर्चना तानाजी

७९) मा.अभिषेक गोविंद बारणे

८०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८१) मा.ॲड.भोसले सचिन सुरेश

८२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८३) मा.बारणे माया संतोष

८४) मा.निलेश हिरामण बारणे

८५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८६) मा.दर्शले रेखा राजेश

८७) मा.कलाटे राहुल तानाजी

,

८८) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८९) मा.ममता विनायक गायकवाड

९०) मा.कामठे तुषार गजानन

९१) मा.चोंधे आरती सुरेश

९२) मा.कस्पटे संदिप अरुण

९३) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९४) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९५) मा.सुनिता हेमंत तापकीर

९६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८) मा.कुटे निर्मला संजय

९९) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१००) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०२) मा.मुंढे उषा अंकुश

१०३) मा.कदम शशिकांत गणपत

१०४) मा.लोखंडे चंदा राजू

१०५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०७) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०८) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०९) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

,

११३) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११५) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११६) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११७) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११८) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.चव्हाण- शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.पाटील, मा.निकम- सह शहर अभियंता, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.खोत, मा.बोदडे-सहा.आयुक्त, मा.राऊत- प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके- मुख्य उदयान अधिक्षक, मा. शिंदे- प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.डॉ.पंडित- अधिष्ठाता (वायसीएमएच), मा.कुलकर्णी, मा.भोसले, मा.मोरे, मा.देशमुख, मा.फुटाणे - कार्यकारी अभियंता, मा.दगडे-पशु वैदयकीय, मा.गाडेकर-प्रशासन अधिकारी व मा.माने-लेखाधिकारी (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक- २४ दिनांक २०/११/२०१८ व दि.२०/१२/२०१८ (दु.१.०० आणि सायं.५.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.महापालिका सभा क्रमांक २४ मध्ये शिक्षक वर्गीकरणाचा जो विषय आहे त्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विरोध नोंदवावा अशी आमची मागणी आहे.

,

**मा.महापौर -** तुमचे विरोध केल्याचे म्हणणे प्रोसीडींगमध्ये येईल तसा सभावृत्तांत कायम करताना विषयास विरोध नोंदवता येत नाही.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक- २५ दिनांक २०/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक- २६ दिनांक १९/१/२०१९ व दिनांक ४/२/२०१९ (दु. २.०० व ३.४० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा. दत्तात्रय साने** – मा. महापौर साहेब, मा.महापालिका सभा क्र. २६ मध्ये विषय क्रमांक १ संतपीठाचा जो विषय आहे यास आणि विषय क्रमांक ५ जो भोसरी हॉस्पिटलचा आहे यास या दोन्ही विषयाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आमचा विरोध आहे. तरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांचा विरोध नोदंवावा अशी मी विनंती करतो.

## <u>नियुक्त्या</u>

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

मा.नगरसचिव – विषय क्रमांक १- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात

,

आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर निवृत्त झालेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीचे दिनांक १ मार्च २०१९ रोजी दुपारी निवृत्त होणारे सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे-

१) मा.लांडगे सारिका संतोष २) मा.बोईनवाड यशोदा प्रकाश ३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र ४) मा.बारणे अर्चना तानाजी ५) मा.साधना अंकुश मळेकर ६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे ७) मा.राजू मिसाळ ८) मा.अमित राजेंद्र गावडे याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ४, पिंपरी चिंचवड अपक्ष आघाडी २०१७- १, पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – २, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना- १ या पक्षियबलाप्रमाणे नियुक्त्या करणे करीता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गटनेते तथा सभागृहनेता मा.एकनाथ रावसाहेब पवार यांनी त्यांच्या पक्षाचे ४ सदस्यांची नांवे बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटनेते तथा विरोधी पक्षनेता मा.दत्तात्रय बाबूराव साने यांनी त्यांच्या पक्षाच्या २ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावीत. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना गटनेते मा.राहुल तानाजी कलाटे यांनी त्यांच्या पक्षाच्या १ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावे. (बंद लखोटा देणेत आला.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड अपक्ष आघाडी २०१७ गटनेते मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे यांनी त्यांच्या पक्षाच्या १ सदस्यांचे नाव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी महापौरांकडे द्यावे. (बंद लखोटा देणेत आला.)

त्यानंतर –

मा.महापौर यांनी बंद लखोटे सर्वासमक्ष उघडले आणि त्यामध्ये असणारी नांवे श्री.आण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांनी सभागृहात वाचून दाखविली ती पुढीलप्रमाणे-

,

१) मा.चौंधे आरती सुरेश- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी २) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी ५) पंकज दत्तात्रय भालेकर - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ६) मा.कलाटे मयूर पांडुरंग - पिंपरी चिंचवड महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ७) मा.कलाटे राहुल तानाजी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना ८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब - पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष अघाडी-२०१७.

ठराव क्रमांक - ३७३ विषय क्रमांक - १

दिनांक – २२/२/२०१९ विभाग – मा.नगरसचिव

## <u>मा.स्थायी समिती सदस्य</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळांच्या प्रमाणात १) मा.चौंधे आरती सुरेश २) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे ३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे ४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव ५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर ६) मा.कलाटे मयूर पांडुरंग ७) मा.कलाटे राहुल तानाजी ८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात येत आहे.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

--------

,

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सत्तारुढ पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे मा.गटनेते यांचे हस्ते नियुक्त समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवुन सन्मान करणेत आला)

------

**मा.नगरसचिव- विषय क्रमांक २)** मा.कुंदन अंबादास गायकवाड यांचे मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य पद रिक्त झाले असल्याने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ आणि कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमाक २ चा विचार माहे एप्रिल २०१९ चे मा.महापालिका सभेमध्ये करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक - ३७४ विषय क्रमांक - २

दिनांक – २२/२/२०१९ विभाग – मा.नगरसचिव

विषय कमांक २ चा विचार माहे एप्रिल २०१९ चे सभेचे वेळेस करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मत पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, पिंपळे गुरव येथे झालेल्या दुर्घटनेमध्ये ३ मजुरांचे निधन तसेच मेजर चित्रेश बिस्त - जम्मु काश्मीरातील नौशेरा सेक्टर येथे बॉम्ब निकामी करताना शहीद, रमेश भाटकर - जेष्ठ सिनेनाटय अभिनेते, कृष्णकांत कुदळे-

,

महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष, महेश आनंद - हिंदी चित्रपट अभिनेते, जयसिंग पवार - कामगार सेनेचे सहचिटणीस, नंदाताई सुरेश सायकर, सखाराम शामराव सुर्वे, ह.भ.प., निर्मलाताई रामचंद्र बलकवडे, श्रीधर माडगुळकर - ज्येष्ठ साहित्यिक, गोविंदराव मोरे - ह.भ.प., मनोहरदादा भुजबळ, लक्ष्मीबाई काळभोर –निगडी, सोपानराव सावंत - माजी सहा. आयुक्त अमृतराव सावंत यांचे वडील, आप्पा मोरे-सामजिक कार्यकर्ते, चंद्रकांत वाळके, सुनंदा जगन्नाथ वाळके, पार्वती परशुराम  ढोरे, संभाजी ज्ञानेश्वर शिंदे, रक्मिणीताई सुरेशआण्णा पठारे- भोसरी, बाळुबाई निवृत्ती लांडगे - भोसरी, सुर्यकांत काशिनाथ हजारे- प्रभाग क्रमांक १२, मारुती तुकाराम भालेकर - प्रभाग क्रमांक १२, सरोज राव. यांचे निधन झाल्याने तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा. दत्तात्रय साने** – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर पिंपरी चिंचवड शहरामध्ये खूप मोठी दुर्घटना आपल्या परिसरामध्ये घडलेली आहे पिंपळेगुरव येथे मंदीराच्या सभा मंडपाचे काम चालू असताना त्याठिकाणी जी दुर्घटना घडली त्यामध्ये जवळपास तीन मयत झालेले आहेत आणि आठ ते दहा लोक जखमी झालेले आहेत. मला मा. आयुक्त साहेब आणि मा.महापौर साहेब आपल्या निदर्शनास काही गोष्टी आणून दयायचे आहेत की पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनधिकृत बांधकामांचा एवढा मोठा गंभीर प्रश्न असताना शहरामध्ये एखादया गोरगरीबाने किंवा एखादया कामगार वर्गाने, नागरीकाने घर बांधले, झोपडं बांधलं किंवा पत्राशेड केले तर त्याचं बांधकाम सेकंड मिनिटामध्ये काही वेळेला चोवीस तासाच्या आत नोटीस देवून किंवा त्यांना नोटीस पण दिली जात नाही आणि त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाते. आज एवढी मोठी घटना घडत असताना ज्या बाजूला आपलं स्मशानभूमीचं काम चालू आहे महानगरपालिकेच्या माध्यमातून तिथं काम चालू असताना आपले अधिकारी नियंत्रणाच्या माध्यमातून त्याठिकाणी जात असतील. आणि अस असताना इतक मोठं भव्यदिव्य मंदीर आणि मंदीराच्या जवळ झालेली दुर्घटना त्याला

,

जबाबदारीची भूमिका ही कोणाची असणार आहे. खरतर माझ्या नागरीकांवर भरदिवसा बुलडोझर फिरवला जातो. माझ्या नागरीकांना नाहक त्रास देण्याचे काम केले जाते. आपल्या नदीच्या पात्रामध्ये एवढं मोठं भव्यदिव्य काम करीत असताना त्या विभागाचे अधिकारी झोपले होते का. हा महापौर साहेब, आयुक्त साहेब आपल्याला माझा प्रश्न आहे. मला असं ही कळालं आहे की १३ नोंव्हेबरच्या दिवशी त्यांना आपण काहीतरी नोटीस चिटकवून पण आलेलो आहोत. म्हणजे नोटीस त्यांच्या हातामध्ये न देता तिथे चिटकवून आलेले आहेत. म्हणजे १३ नोव्हेंबरनंतर आज जवळपास दोन ते तीन महिने तुमच्या सर्व अधिका-यांना माहिती असताना जर अशी दुर्घटना आपल्या शहरामध्ये घडत असेल तर महापौर साहेब माझी विनंती आहे. मी तर मा. आयुक्तांना जबाबदार धरुन मनूष्यवधाचा गुन्हा आयुक्तांवर दाखल व्हावा आणि त्याच्यानंतर दुसरे कोणी खालचे अधिकारी असतील त्यांच्यावर पण जबाबदार धरुन गुन्हा दाखल व्हावा अशी मी आपल्याकडे राष्ट्रवादीच्या कॉंग्रेसच्या वतीने मागणी करतो. एखादया सर्वसामान्य नागरीकांना वेगळा न्याय. आणि एखादयाच्या प्रेशरखाली काम चालू असेल तर त्याला वेगळा न्याय हे मला वाटत की योग्य नाही साहेब. तुम्हाला सगळे सारखे आहेत तुम्हाला कायदा सारखा आहे. तुम्हाला नियम सारखे आहेत. आणि हे असताना असं काही तुम्ही जर चुकीचं करीत असाल तर त्याला जबाबदार तुम्हीच आहात. आयुक्त साहेब, मला असं माहित आहे की २००८ नंतर त्या मंदीराला मला वाटतं कुठेही कोर्टामध्ये चॅलेंज नाही. कोर्टाने त्याला काही तरी बंधन केली आहेत. मला वाटतं की त्या बीजलीनगरचे मंदीर पाडण्यासाठी कोर्टाने परत काही तरी निर्णय दिलेला आहे आणि असं असताना तुम्ही त्यांना प्राधान्य का दिल. हाही माझा प्रश्न आहे. आयुक्त साहेब या विषयाचा गांभिर्याने विचार करुन जो कोणी जबाबदार असेल महापौर साहेब मी जबाबदारीने बोलतोय जे कोणी असतील, आयुक्त साहेब असतील. त्यांच्यावर मनूष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा. त्यांची चौकशी व्हावी. त्यांच्या खाली जे संबंधित कोणी अधिकारी असतील बीट निरिक्षकापासून ते संबंधित कोणी असेल त्यांच्यावर कडक कारवाई व्हावी. त्यांच्यावर मनूष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावी अशी या निमित्ताने सांगतो मा. महापौर साहेब. या घटनेमधील तीन मृतांना मी राष्ट्रवादीच्या वतीने भावपूर्ण आदरांजली वाहतो. आणि आपली जी सूस्त यंत्रणा आहे. आपले जे अधिकारी सूस्त झालेले आहेत, जे झोपेत आहेत त्यांची यंत्रणा सुसज्ज करावी. कोणाच्याही प्रेशरखाली काम होऊ नये. अर्थात ज्यांनी कोणी प्रेशर दिला असेल. मला असही महापौर साहेब कळाले आहे की तिथे हे काम स्मशानभूमीचे

,

चाललेले आहे त्या स्मशानभूमीचा पैसा काही कामानिमित्त लागला होता. अशीही मला माहिती मिळाली आहे. मला कायदेशीर ही माहिती मिळालेली आहे. मला ती माहिती मी तुम्हाला सुर्पूत करेल. मला असंही कळाले आहे की महानगरपालिकेचे काही संबंधित विभाग त्या मंदिराला मदत करीत होते. त्यांना काही आर्थिक मानधन पुरवीत होते. असं ही मला कळलं आहे. तीथ जी घडलेली घटना आहे ती दुर्दैवी आहे. महानगरपालिकेच्या या संबंधित विभागांचा मी जाहीर निषेध करतो. आणि त्या तीन मृतांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन थांबतो.

**मा.राहुल कलाटे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह परवाची जी पिंपळेगुरव येथे दुर्घटना झाली ती अतीशय दुर्दैवी आहे. महापौर साहेब आपण लोकांवर कारवाई करतो. त्या भागातल्या काही कार्यकर्त्यांनी मा. महापौरांकडे पत्रव्यवहार केला आहे. एका बाजुला सुप्रिम कोर्टाचे आदेश आहेत की धार्मिक स्थळांवर कारवाई करा. आम्ही मंदीराच सँक्शन घेताना आम्हांला आडीच आडीच वर्षे लागले. लोकांच्या हा भावनेचा विषय आहे. आणि असं असताना जर अशी दुर्घटना घडत असेल तर प्रशासन का गप्प आहे. आणि एवढी तत्परता तुम्ही कालच का दाखविली. तुम्ही दोन-तीन वर्षे दाखविली नाही. महापौर साहेब तुम्ही आदेश दया की याबाबत चौकशी झाली पाहिजे. त्या ठिकाणी दोनतीन गोरगरीबांचा मृत्यू झाला आहे. तो कशामुळे झालाय तर त्या मंदीराच्या सभामंडपाचा स्लॅब कोसळला आहे. त्या मंदीराचे स्ट्रकचरल ऑडीट नव्हते का. त्याला आर्कीटेक्ट नव्हता का. ठेकेदार कोण होता. का स्मशानभूमीचा ठेकेदार हे काम करीत होता. या सगळया गोष्टींची चौकशी करावी. मंदीर हा सर्वांच्या भावनेचा विषय आहे. मंदीराला कोणाचा विरोध नाही. परंतु ज्या पध्दतीने एका बाजूला सर्व सामान्य नागरीकांचे बांधकाम तुम्ही लगेच जाऊन पाडता आणि दुस-या बाजूला एवढं मोठं मंदीर राजरोसपणे सुप्रीम कोर्टाचे आदेश असताना देखील उभे रहात आहे. परंतु कुठेतरी या गोष्टींची चौकशी झाली पाहिजे. आयुक्त साहेबांनी सांगितलं की राजन पाटील साहेब आणि अतिरिक्त आयुक्त साहेब चौकशी करीत आहेत. आता ते काय चौकशी करणार आहेत. मला याठिकाणी उत्तर दया. कोण त्या ठिकाणी स्ट्रकचरल ऑडीट करीत होते आणि तुम्ही कालच तिथे एवढया तत्परतेने का कारवाई केली. त्याठिकाणी ही दुर्घटना घडलीतर काही कायदेशीर बाबी पण असतील. का पोलीसांना तीथ जायचच नव्हत, पंचनामा करायचाच नव्हता, कुठल्याच गोष्टी करायच्या नव्हत्या. तुम्ही लगेच ते मंदीर पाडायला घेतल मग एवढया दिवस तुम्ही झोपले होते का. तिथे शंकराचे मंदीर आहे मंदीराला

,

आमचा आजही विरोध नाहीय. पण एका बाजुला तुम्ही शहरातील गोरगरीबांची घर पाडता आणि दुस-या बाजुला तुम्ही असं का वागताय. खरच स्मशानभूमीचा ठेकेदार होता का, चौकशी करा ना तुम्ही. जो दोषी असेल त्याच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजेत. मी माझ्या पक्षाच्या वतीने निषेध नोंदवितो. निषेध नोंदविताना मी आपल्याला एकच गोष्ट सांगू इच्छितो की ज्यांचा बळी गेलेला आहे ज्यांचा या अपघातामध्ये मृत्यू झालेला आहे. त्यांच्या कुटूंबासाठी आपण काय करणार का त्यांनाही असंच वा-यावर सोडणार. एवढी मोठी दुर्घटना घडली असताना त्याची दखल त्या मानाने घेतली गेली नाही. हे मी महापौर साहेब आपल्या निदर्शनास आणून देत आहे, धन्यवाद.

**मा. शशिकांत कदम -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर परवा पिंपळेगुरवमध्ये जी घटना घडली ती अतिशय दुःखद अशी घटना आहे. परंतु सभागृहामध्ये मी माहिती देऊ इच्छितो की पिंपळेगुरवमध्ये साधारणपणे ४ ते ५ मंदिरे ही जवळजवळ १०० वर्षापूर्वीची मंदीरे आहेत आणि आता हे जे शंकराचे मंदिर आहे ते रोडच्या कडेला येत होते. त्याच्यामुळे संबंधित गावक-यांनी या मंदीराचा जिर्णोध्दार करण्याचे ठरविलं. आणि आमच्या पिंपळेगुरव गावामध्ये एक जिर्णोध्दार कमिटी आहे त्या कमिटीने जवळजवळ चार मंदिरे अशाच प्रकारे जिर्णोध्दार करुन ती पूर्ण केलेली आहेत. आता हे मंदीर रोडच्या बाजूला येत होतं म्हणून शेजारी मंदीराचं काम चालू केलं होतं त्यामध्ये समस्त गावकरी मंडळी सगळयांनी लोकवर्गणी देऊन त्या मंदीराचं काम चालू होतं आणि सभागृहामध्ये मी माहिती देऊ इच्छितो की आपल्या कार्पोरेशनने नोंव्हेबर मध्ये काम चालू केले त्यावेळेस एक नोटीस दिले होते आणि आता सन्मा. सभासदांनी सांगितलं की कुठल्या ठेकेदारांनी पैसे दिले, परंतु तसा काहीही विषय नाही आम्ही सर्व ग्रामस्थ कदम असतील, जगताप असतील, साळुंखे असतील, नवले असतील आणि इतर पिंपळेगुरवमध्ये राहणारे सर्व ग्रामस्थ हयांनी लोकवर्गणी करुन पहिल्यांदा ८ ते १० वर्षापूर्वी भैरवनाथाच्या मंदीराचा जिर्णोध्दार केला, त्याच्यानंतर मारुतीच्या मंदीराचा जिर्णोध्दार केला, त्याच्यानंतर तुळजाभवानी मंदीराचा जिर्णोध्दार केला आणि आता अशाच प्रकारे महादेवाच्या मंदीराचे सुध्दा जिर्णोध्दाराच काम चालू होते. परंतु ही घटना जी घडली ती अतिशय दुर्दैवी आहे आणि त्याच्या सभामंडपाचे काम चालू असताना ही घटना घडणे हे खरोखरच अतिशय दुःखद घटना आहे. आणि मी सभागृहाला विनंती करतो की त्या मंदीराशी आमच्या पिंपळेगुरव मधील ग्रामस्थांच्या सगळया भावना जोडलेल्या आहेत. कृपा करुन मी या सभागृहाला विनंती करतो की या मंदीराच्या भावनेशी न खेळता

,

कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता आपण जे मजुर मृत झाले त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहावी एवढ बोलून थांबतो.

**मा. सचिन चिखले** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह महापौर साहेब दोन ते तीन दिवसांपूर्वी मंदिराचे काम चालू असताना तीन मजूर यांना देवाज्ञा झाली. शहरातील विविध मंडळे असतील सामाजिक संस्था असतील आणि वेगवेगळया देवास्थानांची मंदीरे सुध्दा असतील. खरतर मंदीर म्हणलं की भावनेचा विषय एकत्र येण्याचा विषय आणि एक संस्कृतीचा विषय येत असतो. महापौर साहेब, आपणही काही वर्षापूर्वी चिखली याठिकाणी मंदीर बांधत होतो आणि नंतर ते महानगरपालिकेच्या वतीने तोडण्यात आले. मी आपल्याला विनंती करतो की महानगरपालिकेतर्फे जेवढे शहरातील मंडळे असतील त्यांचा एक सर्व्हे व्हावा. आणि महत्वाची गोष्ट अशी आहे की त्या मंडळाचे महानगरपालिकेतर्फे त्यांना एक रितसर परमिशन मिळावी बांधकामांना. की जी लोक जी मंडळे आपल्याकडे येत नाहीत की ज्यांना आपल्या सार्वजनिक जागेमध्ये बांधणी करायची आहे. आपली प्रोसेस खूप किचकट असल्यामुळे ती लोक आपल्यांकडे येत नाहीत. तर माझी आपल्याला विनंती आहे की त्याची एक प्रोसेस आपण करावी. की जेणेकरुन ती मंडळे लवकरात लवकर महानगरपालिकेकडे येताना किंतु परंतु मनामध्ये शंका न आणता आपल्यापर्यंत पोहोचतील. आणि त्यांना व्यवस्थितपणे रितसर परमिशन मिळेल. कारण का तर आपण पाहतोय गणपती उत्सव असेल, नवरात्र उत्सव असेल विठ्ठलाचे मंदीर असेल असे विविध मंडळांनी बांधलेली समाज मंदीरे असतील. हजारो लोक तिथे जातात आणि दर्शन घेतात आणि आपलं जनजीवन पुढे चालू करतात. तरी मी विनंती करतो की आपण एक त्याची पाहणी करावी आणि जी काही महानगरपालिकेची परमिशन आहे ती सुरळीत करुन लवकरात लवकर मान्यता मिळावी, धन्यवाद.

**मा. अजित गव्हाणे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह पिंपळेगुरव येथे जी काही घटना घडली. त्याबाबत दत्ताकाका साने आणि राहुल कलाटे यांनी याठिकाणी विषय मांडला. मुळात या विषयाचे राजकारण कोणीच करु नये. आम्ही त्यांच राजकारण करणार नाही. हा विषय सगळयांच्या धार्मिक भावनेचा आहे आपण प्रत्येक जण देवाला मानतो. जो जो ज्या समाजाचा आहे त्या त्या समाजाच्या देवाला मानत असतो. आणि अशाच माध्यमातून वेगवेगळया ठिकाणी मंदीरे उभारली जातात. आमच्याही भोसरी गावामध्ये अनेक ठिकाणी जुनी मंदीरे पाडली आहेत आणि नंतर जिर्णोध्दार केला आहे. त्याच पध्दतीने

,

पिंपळेगुरव येथील जुने मंदीर आहे आणि कदमांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी त्याच काम चालू होतं. मुळात आयुक्तसाहेब सचिन चिखले यांनी जो मुद्दा मांडला तो महत्वाचा आहे की आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशी खूप मंदीरे आहेत. आणि मंदीरे बांधत असताना ग्रामस्थ एकत्र येतात. एकत्र वर्गणी करुन त्याठिकाणी मंदीरे उभी करत असतात. हे करीत असताना महापौर साहेब आपल्याकडे धोरण असले पाहिजे. त्यासाठी त्यांना बांधकाम परवानगी अतिशय सुटसुटीतपणे, मुळात बांधकाम परवानगी देताना ज्या अडचणी निर्माण होतात त्या अडचणींना सामोरे जायचे नाही. कागदपत्रे जमा करायला अडचणी येतात म्हणून लोकं अशा पध्दतीने बिगर परवाना बांधकामे करीत असतात. दत्ताकाकांनी आणि राहुलजी यांनी सांगितलं गरीब कामगार, गरीब माणसं जेव्हा घर बांधतात तेव्हा आपण त्यांना नोटीस देऊन त्यांची बांधकामे आपण पाडतो. त्यांच्यावर फौजदारी करतो. परंतु अशा पध्दतीने मंदीरे बांधली जातात. याच्यावरती कुठेतरी आपल्याला मार्ग काढला पाहिजे. कोर्टाचे पण आदेश आहेत की पुढील काळामध्ये अशा पध्दतीचे धार्मिक स्थळे उभी करीत असताना त्याला रितसर परवानगी घेतली पाहिजे. आणि ती परवानगी घेण्यासाठी आपण बिल्डींग परमिशनच्या माध्यमातून तो सुध्दा वेगळा कक्ष करावा कारण का तर ही जी घटना घडली ती खूप दुर्दैवी आहे कारण ती तीन माणसे गरीब असली तरी त्यांच्याही जिवाला महत्व आहे. त्याच्यातून वेडवाकडे काय घडलं असतं फार मोठी दुर्घटना घडली असती त्याच्यामुळे आमची सगळयांची महापौर साहेब, आयुक्त साहेब आपल्याकडे विनंती आहे की तुम्ही या संदर्भात गांभीर्याने लक्ष दया. तुम्ही त्या ठिकाणी व्हिजीट करा आणि पूर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये जी जी मंदीरे बांधायची आहेत तिथले जे ट्रस्ट असेल, किंवा मंडळे असतील त्यांना बोलावून घ्या आणि बिल्डींगच्या परमिशनच्या माध्यमातून, महापालिकेच्या माध्यमातून वेळ पडली तर सभागृहाकडून काही परवानगी घ्यायची असेल तर मंजुरी घ्या, शासनाकडून मंजुरी तुम्ही आणू शकता. आणि कोर्टाच्या आदेशास बांधील राहून आपल्याला हयाच्यातून मार्ग काढला पाहिजे. आणि म्हणून यापुढच्या काळामध्ये अशा प्रकारच्या घटना घडू दयायच्या नसतील तर याच्याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. ज्यावेळेस बांधकाम होत असतं त्यावेळेस त्याठिकाणी आर्कीटेक्चर असतो, कन्सलटंट असतो. हे त्याच्यामध्ये लक्ष देतात आणि त्याच्यातून अशा घटना घडू नयेत यासाठी ते काळजी घेत असतात परंतु बिगरपरवाना बांधकामे जेव्हा होत असतात तेव्हा या सगळया कन्सलटंटची अपॉईंटमेंट होत

,

नसते. त्याच्यामुळे काही गोष्टींचे दुर्लक्ष त्याच्यामध्ये होत असते त्याच्यामुळे या सगळया गोष्टींकडे आपण गांभीर्याने लक्ष घालावे आणि यातून मार्ग काढावा अशी मी विनंती करतो.

**मा. एकनाथ पवार** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर मंदीर या विषयावर राजकरण करु नये. शशिकांत आप्पांनी सांगितलं मला कधी कधी कीव पण येते. पिंपळेगुरव म्हटले की एकही संधी सोडायची नाही अशा पध्दतीची परिस्थिती दुर्दैवाने या सभागृहामध्ये आहे. ऍलर्जी असली पाहिजे एखादया विषयाची म्हणजे मंदीर. खरतर सांगवीमध्ये राहणा-या सर्व नगरसेवकांना माहिती आहे की पिंपळेगुरवचे मंदीर किती वर्षापूर्वीचे होते आणि आपल्या सगळयांना माहिती आहे की अजितभाऊ तुम्ही खूप चांगलं सजेशन दिलं. मंदीराच्या संदर्भामध्ये वेगळा कक्ष केला पाहिजे आणि तुम्हाला माहिती आहे की तुम्ही बांधकाम क्षेत्रामध्ये काम करताय. म्हणजे जेवढे जेवढे या शहरामध्ये मंदीरे आहेत आणि जेवढया जेवढया पदाधिका-यांनी, मंडळांनी बांधले आपल्या सगळयांना कल्पना आहे मंदीराच्या बांधकामासाठी जर परवानगी दयायला लागले तर या महापालिकेमध्ये असं एकही ग्राउंड शिल्लक राहणार नाही की त्याठिकाणी मंदीराची उभारणी होणार नाही. कारण जेवढया जेवढया जागा वापरुन मंदीर केले, गार्डन केले. चांगल्या पध्दतीचे प्रोजेक्ट आपण महापालिकेच्या माध्यमातून राबविले. आपल्या सगळयांना कल्पना आहे की त्यामध्ये लोकांना सुविधा मिळाल्या पाहिजेत. लोकांच्या धार्मिक भावना जपण्यासाठी अशाच पध्दतीचे आहे. एखादी दुर्दैवी घटना घडते ती दुर्दैवाने मंदीराच्या ठिकाणी घडते म्हणजे घटना खरतर जे लोक मंदीर बांधत होते जे गावकरी होते. त्यांच्या मनामध्ये निश्चितच ही वाईट भावना नव्हती. अशा पध्दतीचे मंदीराचे काम होत असताना एखादया मजुराचा दुर्दैवाने अंत व्हावा त्याने तिथे आपले आयुष्य गमवावे. अशी कधी कोणाच्या मनामध्ये भावना नसते. पण कधीकधी एखादया विषयाचं राजकारण करायचं म्हटलं की प्रत्येक गोष्टीला आपल मत व्यक्त केलं पाहिजे दुर्दैवाने या सभागृहाच्या माध्यमतून मी सभागृहाला विनंती करतो की एखादा विषय बोलायचा म्हटलं की त्याच्यावर राजकारणा शिवाय आपण बोलू शकत नाही आणि या सभागृहामध्ये सर्व नगरसेवकाना माहित आहे प्रत्येकाने आपआपल्या भागामध्ये एकएक मंदीर बांधलेले आहे. तुम्ही सगळयांनी मंदीरे बांधलेली आहेत. आणि मंदीर एवढयासाठी बांधतो की कारण का तर त्या मंदीरामध्ये जाऊन आपण नतमस्तक होतो. आपली दिवसाची चांगली सुरवात आपण त्या मंदीराच्या गाभा-यामध्ये जाऊन त्या परमेश्वराचे दर्शन घेऊन आपण चांगल्या पध्दतीने आपला दिवस जावा आपले आयुष्य जावे, यासाठीच खरतर प्रयत्न

,

करतो. त्यामुळे तुम्ही एखादी गोष्ट मांडण्याचा प्रयत्न करता त्यावेळेस अशा पध्दतीची घटना घडते. महापालिकेच्या अधिका-याबाबत आपण बोलले पाहिजे. पालिकेच्या अधिका-याने अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये काय कारवाई केली, नाही केली तुम्हाला सगळयांना माहित आहे. हया सभागृहामध्ये हा विषय नाही. परंतु एक गोष्ट तर निश्चित आहे. एखादया गोरगरीबाचे ज्यावेळेस बांधकाम पाडले जाते. ते आपणच पाडायला लावतो ना. माझ्याकडे अनेक गोष्टी आहेत. या सभागृहाच्या निदर्शनामध्ये अनेक गोष्टी आलेल्या आहेत. आपणच अधिका-यांना सांगण्याचा प्रयत्न करतो की मला कृपा करुन या विषयावरुन राजकारण करायला लावू नका माझी तुम्हाला विनंती आहे. राष्ट्रवादीच्या कॉग्रेसच्या वतीने पिंपळेगुरवच्या विषयाबाबत स्टेटमेंट केले गेले. त्यावेळेस एखादया पार्टीचा नेता एखादया भागामध्ये राहतो. याचा अर्थ अशी परिस्थिती होत नाही की प्रत्येक गोष्टीचे आपण राजकारण केले पाहिजे.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, हा विषय हया सभागृहाच्या माध्यमातून नाही घेतला पाहिजे. मा. महापौर साहेब मी तुम्हाला विनंती करतो की तीन लोक तेथे मृत पावलेली आहेत त्याच्या संदर्भात आपली भावना व्यक्त केली पाहीजे अशी माझी विनंती आहे. सगळयाच विषयामध्ये राजकरण करु नये. धार्मीक विषया विषयाच्या संदर्भामध्ये आपण चांगल्या पध्दतीने विचार केला पाहिजे. मा. महापौर साहेब मी तुम्हाला विनंती करतो की खरतर आता दोन महिन्यामध्ये निवडणुका आहेत, महापौर साहेब विषयांना आपण सुरुवात करावी एवढीच विनंती करतो थांबतो, धन्यवाद.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. महापौर -** जे मंदीर पिंपळेगुरवमध्ये पडलेल आहे ती अतीशय दुर्दैवी घटना आहे. याठिकाणी सदस्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत. विरोधी पक्षनेत्यांनी भावना मांडलेल्या आहेत, गटनेत्यांनी भावना मांडलेल्या आहेत. सर्वांच्या भावनांचा आदर करुन आपण याठिकाणी एक बैठक लावू. ज्या मंदीरांची कामे चालू आहेत किंवा चालू करायची आहेत त्यांना आपण जे बांधकाम परवानगी देणार आहोत. त्या बांधकाम परवानगीमध्ये थोडीशी शिथिलता आणून जे नियम अटी आपले जे रुल्स आहेत ते थोडे कमी करुन व्यवस्थित पणे त्यांना लवकरात लवकर बांधकाम परवानगी देऊन त्याठिकाणी आपण विषय व्यवस्थितपणे सर्वांच्या भावना जपून पुढे ठेऊ या.

,

**मा. नितीन काळजे-** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज दोन दिवसांपूर्वी पिंपळेगुरवमध्ये जी घटना घडली.....

**मा. मंगला कदम** – मा.महापौर साहेब, आहो आता या विषयावर परत चर्चा करायची आहे का. मा. महापौर साहेब बोलले आहेत त्यामुळे आता परत चर्चा करु नये. हा विषय सोडून तुम्ही बोला. तुम्ही तो परत विषय काढू नये.

**मा. नितीन काळजे** – मला हेच सांगायचे आहे की त्या विषयाची कोणी पण चर्चा करु नये. मी काय म्हणतोय तुम्ही दोन मिनिटे ऐका ना....

**मा. मंगला कदम** – मा. महापौर साहेब तुम्ही विषय चालू करा. नाहीतर आम्हाला पण बोलायचे आहे.

**मा. नितीन काळजे** – मा. महापौर साहेब मला या विषयावर बोलायचच नाहीय. उगच आकांडतांडव करु नये. परंतु सगळयांना जर असं वाटत असेल तर मी थांबतो. मला महापौर सांगतील. तुमचा काय संबंध आहे सांगण्याचा. मला मा. महापौरांनी सांगू दया मी दोन मिनिटात खाली बसतो. महापौर साहेबांनी सांगितलं तर मी बोलणार नाही. पण यांनी सांगायची गरज नाही आम्हाला. ठीक आहे सगळेजण म्हणले चर्चा करु नका मी थांबवतो ना. ठीक आहे या विषयावर मी बोलणार नाही.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. सुरेश भोईर** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो-

ठराव क्रमांक - ३७५ विषय क्रमाक- ३

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.बक्षे/स्था/काविज/१२/०४/२०१९ दि.०४/०१/२०१९

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४०९९, दि.२२/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रिय कार्यालयामधील प्रभाग क्र.१८ मधील तपशीला मधील नमुद कामांची मा.सन्मानीय नगर सदस्य यांची मागणी व आवश्यकता लक्षात घेता मनपाचे सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये कामाच्या समोरील रकान्यांमध्ये प्रस्तावात नमुद केलेल्या र.रू.२,५०,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी पन्नास

,

लाख फक्त) तरतूद वर्ग करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२,५०,००,०००/-)

**मा. बाबासाहेब त्रिभुवन** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. अश्विनी चिंचवडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह या विषयाचा मला खुलासा हवा आहे. कारण मागील दोन वर्षापासून बजेटला या विषयासाठी सिमेंट काँक्रीट रोडसाठी तरतूद केली होती. माझ्या प्रभागातला हा विषय आहे म्हणून मी बोलतेय. आणि त्याच्यानंतरही आता हा विषय असा आलेला आहे की तरतूद वर्गीकरण याबाबतची पूर्ण माहिती मला हवी आहे. तसंच चिंचवड गावठाण हे गेली ३० ते ४० वर्षे जुने गावठाण असल्यामुळे तिथे ज्या ड्रेनेज लाईन किंवा इतर ज्या स्ट्रॉम वॉटर लाईन आहेत त्या पूर्णपणे विस्कळीत झालेल्या आहेत आणि त्या विषयाला अनुसरुन सिमेंट काँक्रीट रोडचा मी हा विषय तत्कालीन आयुक्त राजीव जाधव साहेब होते तेव्हा हा मांडलेला होता. तेव्हापासून आजतागायत या विषयावर कुठलीच हालचाल झालेली नाहीय. महापौर साहेब मला या विषयाची पूर्ण माहिती हवी आहे, खुलासा हवा आहे. तसेच ही जर तरतूद वळविणार असाल तर हेरीटेज म्हणून या विषयाची काही मी माहिती घेतलेली आहे. तर हेरीटेज म्हणून तिकडे हा वर्गीकरणाचा विषय आहे. तर हेरीटीजमध्ये लाईट आणि साऊंड शो या विषयाची पण तेव्हा आम्हाला माहिती दिलेली होती. तर तो विषय होणार आहे की नाही. तर ती पण माहिती हवी आहे. तसेच बहुमजली पार्कींग हा विषय पण खुप महत्वाचा आहे. चिंचवड गावठाणामध्ये सगळया जुन्या बिल्डींग असल्यामुळे वाहने सगळी रस्त्यावर लागलेली असतात. तर त्यासाठी बहुमजली पार्कींगचा विषयही या विषयातच होता. तर त्याचही काय होणार आहे. या दोन तीन गोष्टींचा खुलासा मला हवा आहे मा. महापौर साहेब.

**मा.राजेंद्र गावडे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आमच्या प्रभागामध्ये १८ मी. रस्त्याचे एक काम चालू आहे. तर सदर कामासाठी तो नदीच्या कडेला रस्ता आहे. तर नदीच्या कडेने जाणारा रस्ता असून पाण्यामुळे नदीच्या कडेची माती वाहून जाऊन काही भाग पाण्यामध्ये गेलेला आहे आणि रस्ता पूर्ण करण्याच्या कामासाठी त्याठिकाणी गॅबेन वॉल बांधणे आवश्यक आहे. आणि गॅबेन वॉल बांधण्यासाठी तर त्या कामासाठी तरतूद नव्हती म्हणून आपण एक्झीक्यूटीव्ह इंजिनिअर आणि जे काही बाकीचे सदस्य आहेत त्यांच्या माध्यमातून त्या कामासाठी ही तरतूद वर्गीकरणासाठी त्यांना आपण ठराव करण्यासाठी सांगितले होते. आणि सदर कामासाठी ते वर्गीकरण केलेले आहे. त्यानंतर

,

ताईंनी आता सांगितलं की बाकीची जी कामे आहेत. त्याची जी काही टेंडर्स असतील ती वेळोवेळी प्रसिध्द होतील आणि ती कामे सुध्दा होणार आहेत.

**मा. अश्विनी चिंचवडे** – महापौर साहेब दोन वर्षापासून हा विषय पेंडींग आहे त्याची मला पुर्ण माहिती हवी आहे.

**मा. महापौर** – संबंधित अधिकारी यांनी खुलासा दयावा.

**मा. चव्हाण [शहर अभियंता]** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह विषय क्रमांक ३ बद्दल ब क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्रमांक १८ मधील रस्ता अंदाजपत्रकामध्ये तरतुद वर्गीकरणाचा प्रस्ताव आहे या प्रस्तावामध्ये बाकीची कामे पण होणार आहेत. ताईंनी सांगितलेली कामे पण आपण घेतली आहेत आणि मा. राजेंद्र गावडे यांनी सांगितलेली कामे पण त्याच्यामध्ये घेतलेली आहेत. तरतूद कमी पडत होती म्हणून आपण तो प्रस्ताव घेतला आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. सुरेश भोईर** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो-

ठराव क्रमांक - ३७६ विषय क्रमाक- ४

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.बक्षे/स्था/काविज/१२/०५/२०१९ दि.०४/०१/२०१९
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१००, दि.२२/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये मा.नगरसदस्य यांनी नव्याने मागणी केलेल्या कामांचा समावेश नाही. तपशिलामध्ये नमुद सदरचे कामांसाठी मनपा अंदाजपत्रकामध्ये समावेश करून आवश्यक र.रू.१,००,००,०००/- इतकी तरतुद ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पातील वेगवेगळ्या कामांमधुन वर्ग करणे आवश्यक आहे. तरी विषयाच्या सविस्तर

,

तपशिलामध्ये नमुद केलेल्या अनु क्र १ व २ चे कामाचा सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश करून त्या कामासमोरील अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यात प्रस्तावात नमुद केलेल्या रकमेस व ब क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडील अनु,क्र ३ चे कामामधुन र.रू.१,००,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी फक्त) इतकी तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१,००,००,०००/-)

**मा. बाबासाहेब त्रिभुवन** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा. सारीका सस्ते- मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते-

ठराव कमांक – ३७७ विषय क्रमाक- ५

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुजि/६/कावि/१९७/२०१८ दि.१८/१२/२०१८

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४१४०, दि.२२/०१/२०१९

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांनी पिंपरी येथे फुल बाजार चालु करणे करिता मे २०१७ पासून वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. त्या अनुषंगाने मा.आयुक्त सो. यांचे दालनात दि.२८/१२/२०१७ रोजी आणि दि.२८/११/२०१८ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनीधी व महापालिकेचे पदाधिकारी अधिकारी यांचे समवेत बैठक आय़ोजित करणेत आली होती. दि.२८/११/२०१८ रोजी झालेल्या चर्चेमध्ये पिंपरी (क्रोमा शोरुम) शेजारील स.नं.२१० आरक्षण क्रमांक ११७ येथील सुविधा भुखंड क्रमांक २ चे क्षेत्र ५२६.३१ चौ.मी. ही जागा फुल बाजाराकरिता देणेचे निश्चित केले गेले. मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या सुचनेनुसार पिंपरी (क्रोमा शोरुम) शेजारील स.नं.२१० आरक्षण क्रमांक ११७ येथील सुविधा भुखंड क्र.२ मधील क्षेत्र ५२६.३१ चौ.मी. ही जागा फुल बाजारासाठी निश्चित करुन स्थापत्य विभागामार्फत

,

तात्पुरत्या स्वरुपात पत्रा शेडची उभारणी करुन उपसंचालक नगररचना विभागाकडून भाडे दर प्राप्त करुन ह क्षेत्रिय कार्यालायामार्फत ११ महिने कराराने भुई भाड्याने देणेस मा.उप संचालक नगररचना यांचेकडील मुल्यांकनाच्या उमेद मान्यतेने कार्यवाही पुर्ण करून मान्यता देणेत येत आहे.

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्त्यावरील मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर नागरीकांच्या सोईच्या दृष्टिने दिवाबत्ती व्यवस्था करण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने योग्य मोबदला देवून सदरची दिवाबत्ती व्यवस्था..........

**मा. मंगला कदम -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह हा जो विषय आहे तो अकरा महिने कराराचा विषय आहे. भाडेकराराचा विषय आहे. त्याला हा विषय घेऊन तुम्हाला देता येणार आहे का याला उपसूचना. आम्ही म्हणणार नाही की तुम्ही उपसूचना देऊ नका. परंतु त्याला रितसर काही तरी असायला पाहिजे ना. विषय कोणता आहे आणि उपसूचना कोणती. कोणत्याही दुसऱ्या विषयाला दया परंतु या विषयाला ही उपसूचना नसावी. पुढचे विषय आहेत ना त्यावेळेस तुम्ही उपसूचना दया. हयाला कस काय तुम्हाला उपसूचना देता येणार. होत असेल तर सांगा आमच्याही ज्ञानामध्ये भर पडेल. भरपूर वर्गीकरणाचे विषय आहेत त्यावेळेस ही उपसूचना दया ना. वर्षेभर वर्गीकरणच चालू आहे.

**मा. एकनाथ पवार** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर आम्हाला या विषयाची घाई नाही. एखादा विषय आजच झाला पाहिजे अशीही परिस्थिती नाही. खरतर हा विषय चांगला होता. सन्मा. मंगलाताईंची इच्छा नाही त्यामुळे उपसूचनेशिवाय विषय मंजुर करावा अशी मी विनंती करतो.

**मा. महापौर** – विषय क्रमांक ५ मूळ विषय मंजुर.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा. ॲड.मोरेश्वर शेडगे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

ठराव कमांक – ३७८ विषय क्रमाक- ६

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.विलास मडिगेरी, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४२१६, दि.२२/०१/२०१९

केंद्रशासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार दि.०३/०२/२०१६ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना "सर्वांकरिता घरे २०२२" मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात शासनाने कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणूक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR (Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाची छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी तसेच दि.१५/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मागणी सर्वेक्षण बाबतचा अहवाल देणेबाबत कळविले आहे. त्यानुसार सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. पिंपरी स.नं.२२६पै/३अ व २२७पै, आरक्षण क्र.१५९ (HDH) येथील मनपाचे ताब्यातील HDH (Houses for Dis houses) च्या आरक्षित जागेवर प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत EWS घरे बांधणेचा प्रकल्प राबविणेचे नियोजन करणेत आले आहे. सदर घरे ही रस्त्यामुळे बाधित अधिकृत बेघरांकरिता व इतर आरक्षणांमुळे बाधित बेघरांकरिता देणे योग्य होणार आहे. सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील बेघरांसाठी घरे (HDH) या आरक्षणांतर्गत सदर जागा ताब्यात आलेली आहे. या प्लॉटचे क्षेत्रफळानुसार येथे अंदाजे ११० घरे बांधणेचे प्रस्तावित करणेत येत आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत येणा-या संभाव्य खर्चाचा तपशिल तक्ता अ नुसार खालील प्रमाणे आहे.

,

**तक्ता अ**

| अ. क्र | गावाचे नाव | आरक्षण क्र. | स.नं. | जागेचे एकुण क्षेत्र चौ.मी. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र चौ.मी. | होऊ शकणारी संभाव्य घरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी | १५९ (HDH आरक्षित) | २२६पै /३अ, २२७पै | १५०० | १५०० | ११० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. प्लॉट ला संलग्न रस्त्याचे प्रयोजन झालेनंतर निविदा काढण्यात येईल. |

सदर प्रकल्पाचे अंतर्गत पाणी, ड्रेनेज, दिवाबत्ती व इतर सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी येणारा अंदाजपत्रकीय खर्च तक्ता ब नुसार खालील प्रमाणे आहे.

**तक्ता ब**

(सर्व आकडे लक्ष मध्ये)

| अ क्र | ठिकाणाचे नाव | सीमाभिंत दुरुस्ती | रस्ते | पावसाळी गटर व Rain Water Harvesting | पा.पु. | ड्रेनेज | घनकचरा व्यवस्थापन SWM | दिवाबत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर व इतर | एकुण रु. लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ९.०० | ५.०० | २.०० | २.०० | २.०० | २.०० | ५.०० | २७.०० |

सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च (Infra खर्च वगळता) तक्ता क नुसार खालील प्रमाणे:-

**तक्ता क**

| गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | इमारतींचा संभाव्य खर्च र.रु. |
|---|---|---|---|
| पिंपरी स.नं.२२६पै/ ३अ, २२७पै | १५९ | ११० | १२,१०,००,०००/- |

,

प्रत्येक सदनिकेला येणारा संभाव्य खर्च हा र.रु.११,००,०००/- इतका आहे. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. म्हणजेच प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.२०१८/- इतका येत आहे.

सदनिकाच्या खर्चाचे वाटप खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| केंद्र शासन | - | रु.१.५० लक्ष अनुदान |
| राज्य शासन | - | रु.१.०० लक्ष अनुदान |
| लाभार्थी हिस्सा | - | रु.८.५० लक्ष |
| एकुण | - | रु.११.०० लक्ष (प्रति सदनिका) |

सदर प्रकल्पासाठी महानगरपालिका निशुल्क जागा उपलब्ध करुन देणार आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणा-या सध्याच्या रेडीरेकनर नुसार जागेची किंमत, बांधकाम परवानगीचे विकास शुल्क, प्रिमिअमची शुल्क इत्यादी महानगरपालिका लाभार्थ्यांकडून घेणार नाही. पंतप्रधान आवास योजनेकरिता प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल तक्ता ड नुसार खालील प्रमाणे:-

**तक्ता ड**

| अ.क्र. | तपशिल | प्रकल्प खर्च | Infra खर्च | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | १२,१०,००,००० | २७,००,००० | १२,३७,००,००० |
| २ | ५% Contingencies सह | १२,७०,५०,००० | २८,३५,००० | १२,९८,८५,००० |
| ३ | २% Work charges establishment Charges सह | १२,९५,९१,००० | २८,९१,७०० | १३,२४,८२,७०० |
| ४ | ५% भाववाढ (Escalation) | ६४,७९,५५० | १,४४,५८५ | ६६,२४,१३५ |
| एकुण (३ + ४) | | १३,६०,७०,५५० | ३०,३६,२८५ | १३,९१,०६,८३५ |
| एकुण रु. | | १३.६० कोटी | ०.३० कोटी | १३.९१ कोटी |

,

वरील तक्ता - ड नुसार केंद्र शासन, राज्य शासन, लाभार्थी व मनपा यांचे संयुक्त निधी मधून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत अंदाजे ११० सदनिका बांधणेकामी अंदाजपत्रकीय र.रु.१३.६० कोटी व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी येणा-या अंदाजे र.रु.३०.०० लाख असे एकुण र.रु.१३.९१ कोटीच्या सदर प्रकल्पास व संभाव्य खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा. हर्षल ढोरे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह संबंधित कोणी अधिकारी असेल तर माहिती मिळावी.

**मा. महापौर** – संबंधित अधिका-यांनी माहिती दयावी.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, ठिक आहे मंजूर करा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. उषा ऊर्फ माई ढोरे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते-

ठराव कमांक – ३७९ विषय क्रमाक- ७

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृक्ष/४/कावि/५७४/२०१८ दि.३१/१२/२०१८

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४२२०, दि.२९/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ प्रकरण ६ कलम १६ अन्वये मा.वृक्ष प्राधिकरण समितीने सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकास महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब सोबत प्रमाणे मा.वृक्ष प्राधिकरणाने तयार केलेले व मंजुर केलेले अंदाजपत्रक असुन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक र.रू.२८,६७,१६,०००/- (अक्षरी र.रू.

,

अठ्ठावीस कोटी सदुसष्ठ लाख सोळा हजार फक्त) इतके आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**मा. घुले नानी उर्फ हिराबाई -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रेमकुमार ऊर्फ बाबू नायर** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. माझी विनंती आहे की साधारण २८ कोटीचा विषय मंजुर करीत आहोत. त्याची थोडी माहिती साळुंखे साहेबांनी सभागृहाला पण दयावी सदस्यांना पण दयावी अशी मी विनंती करतो. वृक्ष लागवडीसंदर्भात त्यांनी वृक्षगणना मोठा विषय ठेवलेला आहे. किती वृक्ष लागवड झाली आणि किती वृक्ष गणना झालेली आहे आणि तो ही किती आकडा आहे त्याची माहिती सभागृहाला दयावी.

**मा.राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह वृक्ष प्राधिकरणाचा विषय मागच्या वर्षी सुध्दा चर्चा न करता आपण तो मंजुर केला. एका बाजूला आपण शहरामध्ये फ्लाय ओव्हर, रोड हे चांगल्या प्रकारे डेव्हलपमेंट करीत असताना वृक्ष प्राधिकरण समितीचे काय चाललं आहे ते सदस्य म्हणतात की आम्हालाही कळत नाही. परंतु अशा प्रकारे तुम्ही २८ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता देत असताना सभागृहाला पण कळले पाहिजे. शहर देश कुठे ग्लोबल वॉर्मिंगकडे चालला आहे आणि आपल्या शहरात काय नियोजन आहे. कुठे गार्डन प्रस्तावीत आहे किंवा झाडांची काय परिस्थिती आहे. मध्ये काहीतरी आपण झाडांची जनगणना करण्यासाठी त्याच्यावर एक आठदहा कोटीचं टेंडर काढलं होतं. त्याच पुढे काय झालं. आणि संपूर्ण शहरामध्ये गार्डन्स, आजची झाडांची परिस्थिती, दिड दोन वर्षापूर्वीची परिस्थिती याची माहिती सभागृहाला सविस्तरपणे होणे गरजेचे आहे. अशी मी महापौर साहेब आपल्याला विनंती करतो. याची माहिती संबंधित अधिकारी यांनी दयावी.

**मा.सचिन चिखले** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब २८ कोटी ६७ लाख १६ हजार या वृक्ष प्राधिकरण समितीच्या बजेटचे मी मनपासून अभिनंदन करतो. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की मागच्या वर्षी सुध्दा आपण बजेट आणले. बजेट मंजुर केले. पण ते नेमके कुठे खर्च झाले आणि त्याचप्रमाणे शहरामधील उद्याने जर पाहिली आपण खरच चांगली डेव्हलप झाली आहेत का. हा एक प्रश्नचिन्ह आमच्या सर्व नगरसेवकांच्या पुढे आहे. दुसरी एक गोष्ट म्हणजे अशी की अप्पूघर सारखा जो परिसर आहे. रोज सकाळ-संध्याकाळ हजारो लोक तिथे वॉकींगसाठी येतात जातात. परंतु वृक्ष प्राधिकरण

,

समिती तर्फे किंवा तिथे जे कोणी ठेकेदार आहे त्यांच्यातर्फे बिलकूल स्वच्छता तिथे ठेवली गेली नाही. वेळोवेळी ज्येष्ठ नागरीक असतील, डॉक्टर्स असतील. त्या परिसराबाबत मोठया प्रमाणात कंप्लेट्स करीत असतात. त्याच्याकडे सुध्दा थोडेसे लक्ष देणे गरजेचे आहे असे मी तुम्हाला सांगू इच्छितो. मा. महापौर साहेब मागच्या वर्षी आपण शहरातील वृक्षगणना करण्यासाठी सेंट्रलाईज पध्दतीची आपण एक मागणी केली होती त्याला मंजुरी पण दिली होती. मग शहरामध्ये किती वृक्ष आहेत. यावर्षी ते कमी झालेले आहेत. तर त्याची एक माहिती आपल्यासमोर येणे खूप गरजेचे आहे. आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की या शहरामध्ये सर्वात मोठी मागणी आहे वृक्ष छाटणीची सर्व  नगरसेवकांची येत असते परंतु जे कोणी तिथे ठेकेदार असतील, जे कोणते टेंडर आपण ज्या ठेकेदारांना देतो तर त्या ठेकेदाराला किंवा टेंडरवाल्याला जर सांगितलं की एक झाडाची छोटीशी छाटणी करायची आहे. एखादी फांदी असते ती डायरेक्ट लोकांच्या घरामध्ये गेलेली असते. परंतु तो कोणी छाटणारा असेल तो येतो आणि डायरेक्ट मुळासकटच ते झाड छाटून नेतो. असे मोठे प्रमाण या ठेकेदारांकडून केले जाते. मा. महापौर साहेब वेळोवेळी आपण पाहतोय. हळूहळू लोकांची संख्या पहिले १०० वर्ष जगायचे, १५० वर्षे जगायचे, ७० आले ८० आले. आता ५० वर येऊन ठेपलेले आहे. माणसे पण लवकर मरायला लागलेले आहेत. तर माझी अशी तुम्हाला नम्र विनंती आहे की ही महत्वाची गोष्ट आहे याच्याकडे जातीने लक्ष दया. वृक्ष कमी व्हायला लागले आहेत. पर्यावरण दूषित व्हायला लागले आहे. साहेब लोकांना श्वसनाचे आजार होऊ लागलेले आहेत. अटॅकचे प्रमाण वाढलेले आहे. याकरीता अवर्जून लक्ष देणे गरजेचे आहे. नुसते दरवर्षी बजेट मांडणे आणि बजेट मंजुर करणे. हे महत्वाचे नसून त्याच्यावर इंप्लीमेंट किती होतेय याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. शहरातील लहान मुले खेळण्यासाठी उदयानामध्ये येतात. खरच ती उदयाने एकदम चांगल्या पध्दतीची डेव्हलप कलेली आहेत का. एखादया ठेकदाराला पोसण्यासाठी आपण टेंडर देतो, काम देतो. आणि जवळचा कार्यकर्ता असेल तर त्याला सांभाळण्यासाठी देतो. मग तो तेवढया जातीने त्या गार्डनकडे लक्ष देतो का. हे पण पाहणे खूप गरजेचे आहे महापौर साहेब. आज आपण कित्येक लॉन्स लावलेले आहेत. तर ते लॉन्स मागच्या वर्षी लावले या वर्षी ते जळून गेले. मग ते कोण ठेकेदार आहेत. आपण कोणाला पोसतोय या सर्व गोष्टी पाहणे गरजेचे आहे. मा. महापौर साहेब, हा अतिशय गंभीर आणि महत्वाचा विषय आहे. वृक्ष प्राधिकरणाचे साळुंखे साहेब इथ आहेत. माझी मा. महापौर

,

साहेब तुम्हाला नम्र विनंती आहे. हा विषय खूप महत्वाचा आहे याच्याकडे आपण लक्ष दयावे. धन्यवाद.

**मा. संदीप वाघेरे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह उदयान विभाग आणि त्याच्या अंडरमध्ये वृक्षारोपण चालते आणि आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये सर्वात जास्त उदयाने आपल्या इथं आहेत. परंतु त्याची व्यवस्थित देखभाल दुरुस्ती होत नाही. गेली दोन वर्षापासून माझ्या प्रभागामध्ये आल्यापासून मा. महापौर साहेब प्रभागामधील उदयाने सुस्थितीत आहेत. तशी ओव्हरऑल पिंपरी चिंचवडमध्ये बाकीची परिस्थिती नाही. उदयानामध्ये आपण कारंजे वगैरे केलेले आहेत. स्थापत्य उदयानाचे हे काम आहे. सगळे कारंजे बंद आहेत बाकीच्या गोष्टी आहेत. तिथे खेळणी पण आहेत. परंतु चांगल्या अवस्थेमध्ये नाहीत. आणि महापौर साहेब आपण उदयान विभागामार्फत दरवर्षी लाख दिड लाख झाड लावतो. आता मी आजच पेपरला वाचले की आपण ठेका दिलेला आहे. आणि गेल्या दोन वर्षात माझ्या पिंपरी प्रभागात वीस हजार झाड लावली होती दरवर्षी दहा दहा हजार प्रमाणे आणि खरच चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. आणि शासनाची जी टीम आहे सार्वजनिक वनीकरण विभाग. मी म्हणतो ३५ हजार देण्यापेक्षा टोटल त्यांना दिड लाख झाडे लावायला यांनाच दया. प्रायव्हेट ठेकेदार स्वत:च्या फायदयासाठी येणार. झाड जगलं का मेलं हे ते बघत नाहीत. हयांना आपण पैसे दिले. झाडे जगवयाची जबाबदारी वनीकरण विभागावरती तीन वर्षे. तीन वर्षे ते त्या झाडांना पाणी घालून वाढवितात संगोपन करतात आणि एकदा ते तीन वर्षाचे झाड झालं की त्याच्या मुळया जमिनीमध्ये शिरल्या की ते आपोआप वाढतात. आणि बाकी झाडे जर आपण प्रायव्हेट संस्थेला दिली ठेकेदार पध्दतीने लावायला तर आयुक्त साहेब त्याच्यावरती लक्ष घालणार नाही, तो ठेकेदार फक्त माझे पैसे मला कसे भेटतील हे बघणार ते झाड जगल का मेल बघणार नाही. एवढ बोलून थांबतो.

**मा. मंगला कदम** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. वृक्ष प्राधिकरण कमिटीमध्ये आम्ही मागच्या पाच वर्षामध्ये काम केले आहे. या समितीमध्ये वृक्षतोड या विषयाच्या व्यतिरिक्त विषय येत नाही तर त्यामध्ये याच्यापेक्षा या कमिटीमध्ये आताची सुध्दा सदय परिस्थिती अशी आहे की झाडांच्या फांदया जरी छाटायच्या असतील तरी किंवा कुठल्या सोसायटया असतील, नागरीकांच्या समस्या असतील. हया समस्यांना हया कमिटी थ्रू जाऊन ही जी कमिटी आहे त्या कमिटीमध्ये तो विषय जातो. पण सध्याच्याला अशी परिस्थिती झालेली आता पावसाळयाचे दिवस येणार आहेत. मा. महापौर साहेब मी अस

,

सांगेन की प्रत्येक नगरसेवकांनी असं म्हणायचे होते की जो दिवा आहे प्रकाशित झालेला त्याच्या खाली झाडे आहेत. त्या झाडांची छाटणी झाली पाहिजे. नागरीकांची वारंवार मागणी असते की ही छाटणी लवकरात लवकर व्हावी. पाऊस सुरु झाला की ते लोक छाटणी करीत नाहीत. कारण सहा महिने छाटणी करता येत नाही. कारण का तर झाड घसरड होत म्हणून. परंतु हया कमिटीतल्या विषयाच्या नुसार एक जनरल असा विषय जनरल बॉडीने केला पाहिजे की पावसाळयापूर्वी शहरातील दिव्यांच्या खालची जी झाडे आहेत. त्याची छाटणी झाली पाहिजे. फक्त फांदया छाटायच्या. झाड नाही छाटायचे. आख्या शहराच्या दृष्टीकोनातून हा विषय करुन घेतला पाहिजे. जनरल बॉडीमधून हा विषय करुन घ्या. कमिटीमध्ये जर गेला तर तो विषय त्यांनाही काही अटी, बंधने आहेत आणि त्यामुळे त्या झाडांची फांदी त्याचा फोटो मग ते तेथे होते का, त्याची व्हिजीट याच्यामध्ये दोनचार महिने जातात. आणि मग दोनचार महिने झाले की परत आता पावसाळा येईल. तर पावसाळयापूर्वी शहरामध्ये दिव्याच्या खालच्या फांदया आहेत त्या कटींग केल्या पाहिजेत. बजेट आपलं खूप चांगल आहे. मी मध्ये कमिशनर साहेबांना सुध्दा म्हणलं होतं की त्या उदयान विभागाला काहीतरी पूर्ण अधिकार तरी दया. त्या लोकांना फ्री हँड दिले तर ते काम करु शकतील. नाही तर ते काय काम करु शकणार नाहीत. त्या दृष्टीकोनातून मा. महापौर साहेब तुम्ही लक्ष घाला. यांना जर पूर्ण कामाची मुभा दिली तर हे लोक काम करु शकतील. आपल्या शहरामध्ये भरपूर ट्रीटमेंट प्लँट आहेत. त्यांच्या इथला जो गाळ निघतो. गाळाच्या ठिकाणी सुध्दा आपल्याला झाड लावायला आपल्या शहरामध्ये खूप सोर्स आहेत. आपण म्हणतो की हायवेला आपण झाडं लावतो त्याच्याऐवजी वड पिंपळ लावले पाहिजेत. पूर्वीची जी शहराची परिस्थिती होती. आपण ज्या वेळेला ६१ मीटर रोड केला त्यावेळेला आपल्या खूप मोठया प्रमाणावर झाडांची तोड झाली. त्या वेळेला तीस-तीस चाळीस-चाळीस पन्नास-पन्नास वर्षाची झाडे तोडण्यात आली. मग त्या दृष्टीकोनातून मधल्या भागामध्ये सुध्दा जिथ जागा आहे जिथ शक्य आहे तिथं त्या पध्दतीची वड असेल, पिंपळ असेल, कडू लिंबाची झाडे असतील. ती झाडे लावली गेली पाहिजेत. फायकसच झाड आहेत परंतु फायकसच्या झाडापेक्षा सुध्दा दुसरे झाड आहेत. फायकसच्या झाडावर पक्षी बसत नाहीत जेवढे वड आणि पिंपळावर पक्षी बसतात. अशा पध्दतीची ती लागवड केली पाहिजे. त्यांच संगोपन केले गेले पाहिजे. आता माझ्या सहका-यांनी सांगितलं की प्रायव्हेट दिल्यानंतर काय अडचणी निर्माण होतात. आता आमच्याकडे ट्रीटमेंट प्लँट आहे. त्याच्यावर आमची काही गार्डन्स आहेत. ट्रीटमेंट प्लँटमधून

,

पाणी आमच्या गार्डनला थरमॅक्स चौकापासून भोसरी पर्यंत पाणी दिलं जातं. ट्रीटमेंट प्लँटची मोटर बंद झाली की हे सगळं पाणी बंद पडतं. आणि मग त्या झाडांना पाणी मिळत नाही मग ती सगळी लॉन जळते. ती झाडे सगळी जळतात. याच को-ऑर्डीनेशन नीट असलं गेलं पाहिजे. आणि हे को-ऑर्डीनेशन नसल्यामुळे मग कोणी रिमार्क लावला की मग त्यांनी त्याच्यातून पाणी भरायचं किंवा नाही, हयाच्यामध्ये ती झाडे पूर्ण जळून जातात आणि म्हणून अशा पध्दतीच्या आपल्या शहरामध्ये जेवढया ओपन स्पेसेस आहेत. आपण मागच्या वेळेस दोन ठिकाणी देहूरोडला आणि सीएमईला कासारवाडीला आपण त्यांना भरपूर प्रमाणावर झाडे दिली. आपण त्याचे ऑडीट केले गेले पाहिजे. की खरच त्यांनी ती झाडे लावली की नाही, लावली असतील तर अजुन १०० टक्के झाडे लावण्यासाठी दिली पाहिजेत या मताची मी आहे.  एक जर प्लॅस्टीकची पिशवी पडली तर कमीत कमी चौदा वर्षे ती जमीन नापीक होते. अशा पध्दतीचे आजच शहराचे वातावरण आहे. आणि आज जो शहरात हवामानातला ग्लोबल वॉर्निगमुळे मोठया प्रमाणात बदल आहे.  म्हणून झाडे जितकी चांगली लावता येतील जेवढी जास्त प्रमाणात लावता येतील. अशी ठिकाणे शोधून ती झाडे लावली गेली पाहिजेत. आणि ती झाडे लावण्याची मुभा या सगळया गोष्टी, पहील्यांदा आपल्या शहरात जेवढी उदयाने आहेत जेवढे ओपन स्पेस आहेत त्याठिकाणी ती झाडे लावली गेली पाहिजेत. चांगल्याप्रकारची झाडे लावली पाहिजेत. फळांची सुध्दा लावा. आम्ही म्हणलो होतो की काही उदयान अशी करा पण तुम्ही नक्षत्र उदयान पण केलं होतं. आता त्या नक्षत्र उदयानची परिस्थिती कशी आहे. हयाबाबत पण बघितले गेले पाहिजे. मुलांना अभ्यास करण्यासाठी वैदयकीय आर्युवेदीक औषधे तयार करणारी जी मुले आहेत, डॉक्टर्स आहेत त्यांना अभ्यास करण्यासाठी या नक्षत्र उदयानाचा फार मोठया प्रमाणावर वापर केला होता. या वनस्पती फार कमी प्रमाणात मिळतात. आता मध्ये दापोलीच्या साईडला दोन दिवसासाठी वनस्पतींचे प्रदर्शन भरले होते. परंतु आपल्याकडे लोकांना तिथं पण जायची संधी मिळाली पाहिजे. लोकांनी तिथे गेलं पाहिजे. त्या वनस्पती तिथून आणल्या पाहिजेत. आर्युवेदीक वनस्पती आता दुर्मिळ आहेत. आणि म्हणून या पध्दतीने जेवढी झाडे लावली आहेत म्हणजे जागांमध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये जास्तीत जास्त वृक्षारोपन झाले पाहिजे मा. महापौर साहेब उदयान आणि वृक्ष प्राधिकरण हे दोन्ही वेगवेगळे नाहीत आणि म्हणून पहिल्यांदा सगळया उदयांनामध्ये प्लॅस्टीक प्लांट झाला पाहिजे. जोपर्यंत हा प्लॅस्टीक प्लांट होत नाही तोपर्यंत आपल्याला या सगळया गोष्टीवर काम करता येणार नाही. आणि म्हणून जिथं जिथं

,

आपल्याला जागा आहे जिथं जिथं मागणी आहे. आता जसं संदीप वाघेरेंनी सांगितलं त्यांच कौतुक करायला पाहिजे. त्यांनी त्यांच्या प्रभागामध्ये वीस हजार झाडे लावलीत. त्याचे ते संगोपन करतात अशाच पध्दतीने प्रत्येकाने जिथं जिथं जागा आहे. तिथं तिथं झाडं लावली गेली पाहिजेत. विदयानगरमध्ये एक झोपडपट्टी आहे तिथे झाड पूर्ण वाकायला आले आहे. फोटो पाठविले, परमिशन मागितली पण परमिशन लवकर मिळत नाही. पण मग जर दुर्घटना घडली तर मग आपण जागे होणार आहोत. म्हणून या लोकांना काम करण्याचा फ्रीडम दयावा. अशी जर दुर्घटना घडणार असेल तर तत्परतेने काम केले पाहिजे. आणि जर सारथीवर जरी कंप्लेट केली तरी त्याला उत्तर मिळत नाही. आणि अशा पध्दतीने जर तुम्ही काम करीत गेला तर मला वाटते की काही अडचणी येणार नाहीत. वृक्षप्राधिकरण हा विषय मी असं सांगेन की तुम्ही लवकर मंजुर करुन पावसाळया पूर्वी झाडे लागवड व्हायला पाहीजे जुनच्या पहिल्या आठवडयामध्ये ही सगळी लागवड व्हायला पाहिजे. आणि नंतरनंतर ती झाडे टिकतही नाहीत झाडांच्या उष्णतेमुळे. खूप चांगल्या पध्दतीने काम करावे आम्ही नेहमी साळुंखेंना सांगत असतो की आमची जी उदयाने आहेत आज ट्रीटमेंट प्लांट आहे. पक्षनेत्यांच्या वॉर्डामध्ये ट्रीटमेंट प्लांट आहे आणि तिथे खूप मोठया प्रमाणामध्ये झाडे लावावीत. तुम्ही आम्ही मिळून लावू. परंतु तिथे झाडे लावणे गरजेचे आहे. कारण आता ते भकास झालेले आहे. मा. कमिशनर साहेब तुम्ही प्रत्येक उदयानामध्ये अशा ज्या ओपन स्पेसेस आहेत तिथे कॅमेरे बसविण्याचे काम केले गेले पाहिजे. उन्हाळा आहे, गवत वाढलेल आहे. शाळेमधील जी मुले आहेत, सिगरेट ओढणारी मुले, कोणी फिरायला येणारी मुले एक काडी टाकली तरी आखं उदयानच्या उदयान पेटतयं. आणि अक्षरश: आम्ही जेव्हा सकाळी फिरायला जातो त्या वेळेस काल असणारी झाडे दुस-या दिवशी त्यातली बरीचशी झाडे पडलेली असतात. याठिकाणी कॅमेरे जर लावले तर त्या माध्यमातून पोलीस स्टेशनला सुध्दा ती मुले पण सापडतील आणि या पध्दतीने ज्या दुर्घटना घडतात सध्याच्याला त्या घडणार नाहीत अशीच मी विनंती करते. आमच्या इथल्या ज्या ओपन स्पेस आहेत. पक्षनेत्यांच्या इथं आणि आमच्या इथं. आम्ही जातो तिथे रोज चालायला. तिथे मोठया प्रमाणावर कमीत कमी दहा हजार झाडे बसतील. अशा ठिकाणी झाडे लावावीत. अशीच मी विनंती करते आणि थांबते जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.आशा शेंडगे-धायगुडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज वृक्षप्राधिकरणाचे बजेट ही शहराची गरज, देशाची गरज किंबहुना आपला देश, राज्य

,

शहरापेक्षा आख्या विश्वाची गरज म्हणजे वृक्ष आहेत. वृक्ष प्राधिकरणाचे बजेट आज आपण मांडतोय. हयाला मान्यता दिली पाहिजे का तर निश्चितपणे मान्यता दिली पाहिजे. परंतु हया डिपार्टमेंटच्या अखत्यारीमध्ये जी कामे येतात. त्या कामांवर सुध्दा एक नजर टाकणे तितकेच गरजेचे आहे असं या ठिकाणी आर्वजून नमुद करावसं वाटतं. कोणतही काम करत असताना एखादया कामासाठी एखादा सदस्य किती वेळा एखादा कर्मचारी असेल अधिकारी असेल किती वेळा फोन करायचा याला सुध्दा निर्बंध घातले गेले पाहिजेत. अनेक वेळा आम्ही मा. आयुक्तांना सांगतो आमचे एखादे काम सांगतो ते आमचं वैयक्तिक काम नसतं. आमच्या प्रभागातल्या आमच्या शहरातल्या नागरीकाच ते काम असतं. परंतु ते काम सांगितल्यानंतर समजा होणार नसेल तर असं होऊ शकतं की आम्ही काम सांगितलं ते आजच्या आज होणार नाही. त्याची तातडीची गरज काय आहे ते तुम्ही बघितलं पाहिजे. परंतु तुमच्याकडील काही अडचणीमुळे एखादी यंत्रणा उभी राहणार नसेल तर ते कळण सुध्दा गरजेच आहे, परंतु असं कधीच होत नाही. मग आम्ही वारंवार फोन करायचा. आम्ही देखील सभागृहात कामकाज करतो. आम्हाला प्रभागातले हजारो नागरीक काम सांगत असतात. आणि हयाच नागरीकांची कामे त्यांच्या अडचणी आम्ही तुमच्यापर्यंत मांडत असतो. सन्मा. महापौर साहेब मला तुम्हाला सांगावेसे वाटते की झाडे कटींग करा. हे आम्ही एखादया नगरसेवकांने फोन करुन सांगण्याची आवश्यकता आहे का. एखादा अधिकारी कर्मचारी प्रभागामध्ये नेमलेला असतो मग त्याची जबाबदारी नाही का. आपण चार महिन्यांनी तीन महिन्यांनी फांदया काही आज कट केल्यानंतर उदया वाढत नाहीत. त्या कट केल्यानंतर किमान तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागतो त्यावेळेस त्या कटींगला येतात. मग तीन चार महिन्यामध्ये त्या भागामध्ये राऊंड मारायला येत नाही का. आजकाल कॉमन पॅटर्न झालेला आहे. रस्त्यांच्या बाजूला गाडया उभ्या असतात असे आम्हाला कॉमन उत्तर दिले जाते. ताई तुमच्या एरियात झाड कटींगला आलो होतो. गाडया उभ्या आहेत हे कारण सांगण योग्य आहे का. आज दिल, उदया दिल, परवा दिल. किती दिवस आम्हाला हे कारण देणार आहात. जर त्याठिकाणी प्रकाश व्यवस्थित नाही आला, एखादी दुर्घटना घडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार. आपल काम आहे झाड कापण्याचं. आम्ही साळुंखे साहेबांना फोन करायचा मग गायकवाडांना फोन करायचा त्यांनी संबंधित प्रभागातल्या माणसाला फोन करायचा आम्ही त्यांना पर्याय दयायचे. मग नोकरी करतात याठिकाणी कर्मचारी म्हणून काम करतात, अधिकारी म्हणून जबाबदारी पाहतात. समजा तुमची गाडी लागली असेल तर त्याच्यावरती एक फॉरमॅटमध्ये

'

आपण छापलं पाहिजे की दिनांक सो सो सो दिवशी याठिकाणी झाडं छाटणी होणार आहे तर त्या फादयांची छाटणी होत असताना अमुक तारखेला त्याठिकाणी आपण काळजी घ्यावी. आपली गाडी याठिकाणी लागणार नाही. जर काही चुकून एखादी दुर्घटना घडली तर त्या गाडीला काही त्रास झाला तर आम्ही जबाबदारी घेणार नाही. आणि आपलं काम नाही केलं पाहिजे का. कारण सदर ठिकाणी लागलेली गाडी आम्हाला सुध्दा माहित नसते की कोणाची गाडी आहे. मग त्याच्यावरती आम्ही पाठपुरावा करायचा आणि आम्हांला तेच फालतू उत्तर आपले अधिकारी देत असतात. एवढच करुन थांबत नाही साहेब आपल्या इथं झाडांना पाणी घालण्याची व्यवस्था असेल, अनेक वेळेला आम्ही रस्त्यांवर पाहतो आपल्या इथं झाड लावलीत आम्ही फार कौतुकाने वृक्षारोपण करतो. सगळे नगरसेवक आम्ही फेसबुकला फोटो सोडतो आणि त्या झाडांना पाणी घालण्याची जबाबदारी सुध्दा आपलीच आहे यंत्रणा उभी केलेली असते त्याचा सुध्दा फॉलोअप, मग आता असं वाटते की आम्ही सगळे नगरसेवक सगळया अधिका-यांच्या हाताखालच्या कर्मचा-यांपेक्षा वाईट अवस्था आहे. सकाळी उठल्यापासून साहेब हया कामाचं काय झालं, त्या कामाचं काय झाल. पाणी घातल का नाही. फक्त वृक्षप्राधिकरण म्हणून नाही सांगते तर इथ मात्र एखाद दोन दिवस आठ दिवस लेट झालातर आमचं झाड त्याठिकाणी सुकते. झाडाचे संगोपन आम्ही ज्यावेळेस केलेले असते त्याची मात्र पूर्णपणे वाट लागते. म्हणून याठिकाणी संवेदनशीलपणे काम करणे गरजेचे आहे म्हणून याठिकाणी जास्त काळजी घेतली पाहीजे. एवढच करुन थांबत नाही सन्मा. महापौर साहेब यांनी संबंधित सगळया प्रभागामध्ये गार्डन्स असतील उदयाने असतील पाहणी केली सन्मा. महापौर साहेब यांनी बघितले. आदेश सुध्दा दिले गेले की त्याठिकाणी गार्डनमध्ये सिमेंट कॉक्रींटच्या इमारती उभ्या राहीलेल्या आहेत, नागरीकांना बसायला जागा नाही, मुलांना खेळायला जागा नाही, मैदाने राहिलेली नाहीत. अशा वेळेला लोक सगळा वेळ कुठे घालवायचा म्हटलं तर उदयानांमध्ये येऊन घालतात. त्याठिकाणच्या उदयानांमधील झाडांची छाटणी असेल कटींग असेल सुशोभिकरण असेल, तुम्ही कोल्हापूर किंवा कोणत्याही शहरामध्ये जा. कोल्हापूर महानगरपालिका तर आपल्यापेक्षा फार मोठी नाही परंतु त्यांची उदयाने पहा साहेब. तीथ गेल्यानंतर एंट्रस पासून प्रत्येक झाड बघावेसे वाटते. आपल्याकडे काय तर काहीच जमले नाही की लॉन लावायचे. ताईंनी सांगितले की सन्मा. आयुक्त साहेब सन्मा. महापौर साहेब याच सभेमध्ये आम्ही विरोध केला होता की आपण विलायती झाडांची अनेक वर्षे मागणी केली होती. आता दोन चार वर्षापासून आपण भारतीय पध्दतीची झाडे लावण्यास

,

सुरुवात केलेली आहे. माझ्या कासारवाडी प्रभागामध्ये एसटीपी प्लांट आहे त्याठिकाणी सन्मा. महापौर साहेब आपण पुर्णपणे फळझाडांची लागवड केलेली आहे. आज माझ्या प्रभागामध्ये पोपट चिमण्यांसारखे पक्षी किंवा जे पक्षी आपल्याला सहजासहजी पाहायला मिळत नाहीत त्यांचा चिवचिवाट ऐकायला मिळतो. आमच्या प्रभागातल्या नागरीकांचे कौतुक करावसं वाटतं. की हजारोंच्या संख्येने त्याठिकाणी येतात आणि त्या झाडांना त्यांनी दत्तक घेतल. प्रत्येक झाडांना पाणी घातले की नाही, झाड वाढलं की नाही हे बघण्याची जबाबदारी नागरीक घेतात. परंतु त्यावेळेला माझ्याच शहरातील त्या विभागाची जबाबदारी पाहणा-या संबंधित अधिकारी हे उदासीन असल्याचे जाणवते. ती उदासीनता या पुढच्या काळामध्ये कमी व्हावी. झाडांचे संगोपन झालंच पाहिजं यादृष्टिकोनातून वाटचाल व्हावी अशी मी विनंती करते आणि थांबते.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. या वृक्ष प्राधिकरण बजेटच्या विषया संदर्भात सभागृहामध्ये चर्चा करीत असताना मी साळुंखे साहेबांना विनंती करेन की आतापर्यंतच्या झाडाच्या संदर्भातील विषय या बजेटमध्ये आणत असताना झाडे तोडणे, झाडे लावणे, हा सर्वात महत्वाचा विषय आपण चर्चेसाठी आणलेला आहे. महापौर साहेब आपल्याला विनंती करतो की मला साळुंके साहेबांना विचारायचे आहे की २०१७-१८, २०१८-१९ आणि आता साधारणतः २०१९-२० चे बजेट समोर आणत असताना आपण या तीन वर्षामध्ये जी झाडे आपल्या शहरामध्ये लावली गेलेली आहे त्याची तीन वर्षे त्यांच्यावर जबाबदारी दिली असताना किंवा त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली असताना त्यांची परिस्थिती सध्या काय आहे. शहरामध्ये अशी परिस्थिती असताना आतापर्यंत आपण अनेक झाडे लावण्याचा उच्चांक केला असताना आजही ह्या बजेटच्या माध्यमातून अनेक झाडे लावल्याचे आपल्यासमोर दिसतात. रोप आणणे, बियाणे खरेदी करणे अशा माध्यमातून बरेच विषय आपल्या समोर आहेत. साळुंखे साहेब, आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे. आपण अतिरिक्त आयुक्त या नात्याने आपण त्यांचे एचओडी असाल. मला या तीन वर्षामध्ये महानगरपालिकेमध्ये जे वृक्ष खरेदी करुन आपल्या येथे लावले गेलेले आहेत त्याची संख्या मला वाटतं की इथं दिसत नाही. पण ते लावले असतील मला मान्य आहे ती लावले न लावले हा विषय गौण आहे. परंतु आम्हाला असं कळालेले आहे की आपल्याकडे तीन चार नर्सरी आहेत. तिथे झाडं लावतो त्याच्यावर रोप तयार करतो. त्यानंतर त्या ठिकाणी आपण ती वृक्षरोपणासाठी पाठवित असतो. मी आपल्याला जाहीरपणे सांगू इच्छितो की आपण बाहेरुन जवळपास २५ ते २६ लाख रुपयांची झाडे आणले आहेत या झाडांची हिस्ट्री मला

,

मिळाली तर बरे होईल. ती झाडे लावली कुठे. ती लावताना त्या झाडांच्या मूळ रोपाची किंमत काय होती. रोपे खरेदी केली त्यावेळेस किंमत काय होती. अनेक ठिकाणी झाडे लावली जातात. आणि दुस-या दिवशी ती झाडे काढली जातात आणि तीच झाडे दुसरीकडे कुठेतरी लावली जातात. फक्त आमच्या समाधानासाठी किंवा या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरीकांच्या समाधानासाठी या झाडांचे वृक्षारोपण केले जाते. आज हे वृक्षारोपण दुसरीकडे कुठेतरी नेऊन ती झाडे लावली जातात असे अनेक वेळेस या सभागृहामध्ये निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजपर्यंत त्यावर कधीही चर्चा झालेली नाही. जी दहा झाडे आम्ही लावलेली आहेत त्याच्यामधील आठ झाडे जगली आहेत आणि दोन झाडे मेलीतर ते आम्ही मान्य करु. परंतु आठच्या आठ गायब आहेत हे तर तुम्ही आम्ही मान्य करु शकत नाही. असे प्रकार या शहरामध्ये अनेक झालेले आहेत. महापौर साहेब, एक सोपी माहिती घ्या. सन २०१६-१७ च्या किंवा २०१७-१८ किंवा २०१८-१९ च्या दरम्यान किती झाडे लावली गेली. आणि झाडांची प्रत्यक्ष पाहणी केली तर तुम्हाला यामध्ये दुधका दुध पाणी का पाणी होईल हे तुम्हाला आज या निमित्ताने सांगू शकतो. अनेक वेळेला आम्ही तक्रारी केल्या. अनेक वेळेला चर्चा देखील केली. पण एकदा बजेट मंजुर झाल्यानंतर मला वाटतं त्याच्यावर कोणीही कसलीही चर्चा करीत नाही असं मी या निमित्ताने सांगतो. पाम आणि नारळाची झाडे आपल्या सर्वसामान्य नागरीकांच्या घरासमोर आहेत. ती झाडे काही धोकादायक असतील. अनेक वेळा आम्ही त्या संबंधित विभागाला सांगीतल असताना किंवा नागरीकांनी फोटो काढ सगळं कर. जर तो वृक्ष तोडायचा असेल किंवा त्याच्या फांदया छाटायच्या असतील ती ते छाटण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा नाही ही दुर्भाग्याची गोष्ट आहे साहेब आपल्याकडे. नारळाच्या फांदया छाटायला आमच्याकडे माणसे नाहीत किंवा आमच्याकडे यंत्रणा नाही. हया शब्दात माझ्याकडे उत्तरे आलेली आहेत. साहेब नारळाची झाडे आपल्याकडे आहेत. आपल्याकडे अनेक ठिकाणी पामची झाडे आहेत. अनेक ठिकाणी नारळची प्रत्येकाच्या घराच्या समोर एकदोन तरी झाडे आहेत. ही जर झाडे धोकादायक झाली असतील, याच्या फांदया वाढल्या असतील. त्या पडून एखादयाचा काहीतरी ॲक्सीडेंट होणार असेल त्याच्या माध्यमातून सुध्दा विचार करणे गरजेचे आहे. आम्ही ज्या ज्या वेळेस तक्रारी करतो त्या त्या वेळेस तिथं माणस नाहीत असं सांगितलं जातं. मी तर अनेक वेळा बघितल की अप्पूघरच्या ठिकाणी आपण अनेक झाडे लावलेली आहेत. महापौर साहेब चिखलीचे गायरान आहे त्याठिकाणी झाडं आपण मागच्या वेळेस लावली त्याचे पुरावे

,

दाखवले होते. मी उखरले होतं, आयुक्त साहेब झाडे लावताना त्या प्लॅस्टीकच्या कॅरीबॅग काढणे हे आपले कर्तव्य आहे की नाही. प्लॅस्टीकच्या कॅरीबॅगसह ते न काढता झाडे लावणारे महाभाग आपल्या महापालिकेमध्ये आहेत. तिथे आम्ही वृक्षे लावलेली आहेत. आणखी सुध्दा अनेक उदाहरणे मी या सभागृहात सांगितलेली आहेत. त्याच्यावर सुध्दा कधी कारवाई झालेली नाही. आजही ती काही झाडे जळून जात आहेत. मी आलो झाडे लावली ती प्लॅस्टीकची पिशवी फाडली की नाही हे काही माहित नाही. मग हयावर सुध्दा आपल्याला विचार करण्याची गरज आहे. आम्हाला माहिती नाही झाड जळाल की काय. आज एक झाड लावलं दुसरं झाडं जळालं की आम्हांला दुसर मिळतनां अनेक सदस्यांनी सांगीतल की काही काही गार्डन्स आहेत ती गार्डन्स डेव्हलप केलेली आहेत का. त्या गार्डन्सचा मेंटेनन्स होतो का तिथे काही वेळेवर पाणी मारलं जात का. सगळयात महत्वाच म्हणजे महापौर साहेब आपण ज्या रस्त्याने जातो येतो तो जो स्पाईन रोड आहे. मला वाटत की सत्तारुढ पक्षनेत्यांच्या वॉर्ड पासून तो रोड जातो त्या रोडची अवस्था काय आहे. मध्ये कोणीतरी सदस्यांनी फोटो काढण्यासाठी ती झाडे काढली. पण साहेब हा जो स्पाईन रोड आहे त्याच्या दोन्ही बाजूने  झाडांच्या फांदया एवढया बाहेर आहेत तीथे नेहमी ॲक्सीडेंट होण्याची शक्यता आहे, तेथेही आम्ही काही करु शकलो नाहीत. स्पाईनरोडच्या दोन्ही भागात जो ड्रेनेजचा जो ट्रॅक आहे तीथ काय अवस्था आहे. तीथही सांगीतलेल आहे. माझी आपल्याला विनंती आहे की ज्या ज्या ठिकाणी अशा दुर्घटना होतात रोज तीथ तुम्ही आम्ही जातो येतो, आम्ही तुम्हांला सांगतो पण अधिकारी तीथ फिरत नाहीत का. त्यांच्या निदर्शनास येत नाही का. इथ ॲक्सीडेंट होणार आहे, इथे ॲक्सींडेट होणार नाही याची काळजी का आपण घेवू नये. दुर्घटना होणार नाही याची दक्षता आपण का घेवू नये. मी अनेक वेळा सांगीतलेल आहे की आमच्या परीसरामध्ये घटना घडलेली आहे. गणपतीच्या काळामध्ये स्पाईनरोडच्या तीथली काही झाड तोडण्याचा प्रयत्न केला होता.  झाड तोडायला परमीशन दिल असताना तीथ चार टेम्पो सापडले होते. जे झाड चोरी करणारे किंवा वृक्ष तोडणारे चार ते सहा टेम्पो सापडले त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला त्याच्यानंतर पुढे त्याच्यावर काय झाल. कोणी त्याला सांगीतल होतं, आपली झाड तोडून विकणारी लोक कोण होती. कोण टोळी होती याचा काही सभागृहामध्ये विचार केला गेला नाही. त्याच काही विश्लेषण तुम्ही आम्हाला सांगीतल नाही. ही सुध्दा दुर्भाग्याची गोष्ट आहे. आपल्या शहरात बाहेरची मंडळी येवून आपली वृक्ष तोडून घेवून जातात, आपल्या वृक्षाची छाटणी केली जाते. आज प्रदूषण एवढ वाढल असताना,

,

शहरामध्ये आपल्या या बीआरटीच्या माध्यमातून अनेक वृक्ष तोडले गेलेले आहेत. लोकांना ऑक्सिजन मिळाला पाहीजे, हवा चांगली मिळणार आहे अस याच्यामध्ये एकपण झाड दिसल नाही. या वृक्ष प्राधिकरणमध्ये असं केलेल नाही का की आम्ही ही ही झाड लावणार आहेत, याच्यापासून माणसाला फायदा होणार आहे अशी कल्पना आपल्याकडे आली नाही. अधिका-यांना याच्यावर काही सुचलेल नाही. तुम्हांला कधी कोणी सुचवल नाही का की ही चार झाड चांगली लावलीतर माणसाचे आरोग्य चांगल राहील किंवा कोणी सांगीतल नाही का. आज आपल्या शहरामध्ये कॉंक्रीटच जंगल झालेल आहे. पुर्णपणे जमिनीचा किंवा वृक्षाचा -हास झालेला आहे. त्या माध्यमातून आपण कुठले झाड लावणार आहोत यातून शहरातील लोकांना कसा फायदा होणार आहे असे एक आपल्या लक्षात आल नाही का. मला वाटत मडिगेरी साहेब आपल्या वॉर्डांत वृक्ष तोड झालेली आहे त्याची पण आम्हांला माहिती दयावी. मा.महापौर साहेब, आपण ज्यावेळेस एखाद धोकादायक वृक्ष मग ते फळाच असेल, किंवा काटेरी असेल किंवा अन्य काही असेल किंवा दोन घराच्यामध्ये एखाद झाड आहे तो म्हणतो फांदी माझ्याकडे आली. आमच्या भागात अशा घटना आहे म्हणजे झाड माझ्या जागेत आहे आणि ते दुस-या बाजुला झुकेलेल आहे अशा काही घटना आहेत. मुळ मालकाच झाड आणि त्याचे फळ दुसराच खातो असा जो काही प्रकार आहे याच्यामध्ये जर काही अटि शर्ती आपण शिथील केल्यातर बरे होईल कारण आमच्याकडे दोघही येतात. अशा घटनेमध्ये आपण त्यांना लवकरात लवकर परमीशन देवून दोघांचा समझोता करुन, म्हणजे त्यांना झाड तोडायच असेलतर परमीशन दया. एक झाड तोडा आणि पाच झाड दहा झाड लावायला सांगा. मला झाड तोडायच असेल, मला परमीशन लागत असेलतर तस माझ्याकडन लिहून घ्या की पाच झाड लाव आणि सहाव झाड तोड. अशा माध्यमातून निर्णय घेतलातर यामध्ये काहीतरी मार्ग निघेल. साळूंखे साहेब आपण फक्त बजेटच्या संदर्भातंच पुढे येता. परंतु आपल्या कृतीतून आम्हांला, नागरीकांना अपेक्षीत आहे त्या पध्दतीने आपल काम व्हाव अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर वृक्षप्राधिकरणाच्या बजेटला मंजुरी देण्याचा हा विषय आहे सगळयांच्या मनामध्ये चांगल्या भावना आहेत. खरतर मी महापौरांचे माझ्या बोलण्याला सुरुवात करताना खूप खुप अभिनंदन करेन. सगळया गार्डनला व्हिजीट करुन तिथल्या गार्डनची, झाडांची परिस्थिती कशी आहे. कुठल्या पध्दतीची झाडे लावली पाहिजेत. आणि अजुनही पुढच्या काळामध्ये हे शहर खरतर

,

हिरव हिरव दिसल पाहिजे अशा पध्दतीची मनस्थिती प्रामाणिकपणाची इच्छा मा. महापौरांची आहे. मंगलाताईंचे अभिनंदन करतो. कधीकधी आमच्या विषयाला सगळयाच काही पाठींबा देत नाहीत. तर त्यांनी सांगितलं की चांगल्या पध्दतीचे शहर हिरवगार झालं पाहिजे. हे बजेट मंजुर करावे. ताई मी खरतर मनापासून तुमचं अभिनंदन करतो. खरतर मागच्या वर्षीची जस्ट माहिती घेतली होती. दत्ताकाकांचे उदबोधन जेव्हा ऐकत होतो. तर मी जस्ट माहिती घेतली की मागच्या वर्षी आपण साठ हजार झाडे लावली. त्याच्या अगोदरच्या वर्षी पन्नास हजार झाडे लावली. पुढच्या वर्षी खरतर दत्ताकाका आपल्याला दिड लाखांच टारगेट आहे. आणि आपण खरतर सगळे जण शेतकारी आहोत. म्हणजे आपण जेवढी झाड लावतो. आपल्यालाही कल्पना आहे की सगळीच्या सगळी झाडे तशाच पध्दतीने वाचतील असे नाही. आणि जेवढे झाडे लावली तेवढी टिकविण्याची जबाबदारी वृक्षप्राधिकरणाची खरतर अधिका-यांची आहे. आपण सगळयांनी मनापासून एका गोष्टीचा विचार केला पाहिजे की मी माझ्या भागामधील सगळया भागामधली जी झाडे आहेत ती टिकण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. खरतर उदयान विभाग हा त्यांच्या पध्दतीने काम करेल. ताईंनी खूप चांगले सांगीतल की ग्लोबल वॉर्मिंग. म्हणजे ग्लोबल वॉर्मिंगच्या दुनियामध्ये आपल्याला खरतर आपल्या शहराचं चांगल आरोग्य टिकवायच असेल तर झाडंही तेवढीच जगविण्याची गरज आहे. म्हणजे झाड जगविण्याची जबाबदारी महापालिकेचे नगरसेवक, पदाधिकारी यांची खरतर ही असली पाहिजे की नाही, तर असलीच पाहिजे. परंतु १०० टक्के आपले सगळे अधिकारी, नगरसेवक पदाधिका-यांवर जर आपण सोडले तर माझी या विभागाला सर्वांच्या माध्यमातून ही विनंती आहे की लोक चळवळ वृक्षप्राधिकरणाच्या संदर्भामध्ये खरतर आपल्याला निर्माण करण्याची गरज आहे. ज्यावेळेस लोकांचा सहभाग एखादया ठिकाणी झाडे लावली आपल्याला माहित आहे की आज आपल्या शहरामध्ये जी जी मोकळी जागा आहे. म्हणजे मोकळया जागेची जर परिस्थिती बघितली तर सगळया मोकळया जागेमध्ये जर झाडे लावली तर ती झाड टिकविण्याच्या जबाबदारीमध्ये आपण खरतर लोकांचा सहभाग असेल, महिला बचत गट असेल, वेगवेगळया सामजिक संस्था असतील. वेगवेगळया एनजीओ असतील या सगळयांना आपल्याला पुढच्या काळामध्ये सोबत घेण्याची गरज आहे. आणि तुम्ही दोनतीन चांगल्या सजेशन दिल्या. खरतर आपल्याला माहित आहे की आपण ज्या समाजामध्ये राहतोय भावबंदकी आपल्याला सगळयांना नडलेली आहे. म्हणजे एक झाड लागल तर कधी कधी पाच फुटाच्या जागेमध्ये एखादा माणूस झाड लावतो तर पुढच्या काळामध्ये दुस-याच्या

,

कंपौडमध्ये  ते झाड जाते. महापौर साहेब खरतर ही परिस्थिती निश्चितच आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की वृक्ष प्राधिकरणाच्या माध्यमातून झाडे तोडण्याच्या संदर्भामध्ये ताईंनी खरोखरच एक खूप चांगली सूचना केली. नितीन आप्पा मला सांगत होते. नितीन आप्पा बोलायला लागले की ताईंना थोडासा राग येतो तर ताई तुम्हीही महापौर होता. खरतर मला आनंद वाटला परंतु नितीन आप्पा सुध्दा माजी महापौर आहेत. खरतर मला कधी कधी अभिमान वाटतो की तुम्ही असेल, अपर्णाताई असतील वैशाली ताई असतील. खरतर सगळया माजी सन्मा. महापौरांचा रिसपेक्ट आपण ठेवला पाहिजे. आणि तुम्ही ज्या पध्दतीने सांगितले की वृक्षप्राधिकरणाबाबत. ताई मी तुमचे अभिनंदन करीन. म्हणजे ज्यावेळेस मी त्या प्रभागाचा प्रतिनिधी नव्हतो, मैला शुध्दीकरण केंद्रामधील पाणी वेगवेगळया गार्डनमध्ये नेण्याचे काम खरतर तुमच्या माध्यमातून झालं. म्हणजे मी ज्यावेळेस असं म्हणलं तर उदया मला नितीनआप्पा हेच म्हणतील. बरोबर आहे दादा तुम्ही ताईंचे कौतुकच केले.  ते म्हणणारच आहेत हे लक्षात ठेवा. खरतर पुढच्या काळामध्ये आपल्याला दोघांना एकत्रित फिरायच आहे. तर माझी या सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे या पुढच्या काळामध्ये सचिन तुमचे म्हणणे बरोबर आहे. अजूनही तुम्ही त्याच्यावरती काम करणार आहेत. हे लिंबाचे झाडे आहे की नाही, हे कडूलिंबाचे झाड आहे, हे आंब्याचे झाड आहे. हे आपल्या पुढच्या पिढीला दाखविण्यासाठी ते ही करण्याची गरज आहे. मला माहिती आहे की आपण दुर्गा देवी टेकडीच्या उदानामध्ये मागच्या काळामध्ये म्हणजे हे झाड कुठल्या जातीचे आहे. त्या ठिकाणी औषधी वनस्पती निर्माण करणार असेल.  शत्रुघ्न बापूंची खूप चांगली सुचना आहे. म्हणजे आपण म्हणतो की झाड जगल पाहिजे झाड टिकल पाहिजे. सन्मा. सभागृहाच्या प्रत्येक नगरसेवकांनी जरी ठरवलं मी १०० झाडं दत्तक घ्यायची. बापू मला वाटतं की १०० पेक्षा १० तर घेऊ दया. उरलेले एनजीओला दया. हे शहर हरीत होण्यासाठी निश्चितच मदत होईल. आपल्या सगळयांना कल्पना आहे की आपले पहीले महापालिकेचे आयुक्तसाहेब मा.हारनामसिंग होते. म्हणजे आपल्या सगळयांना माहीत आहे की आज रस्त्याच्या आजूबाजूला कडेला जी झाडे दिसतात काही मोठी झाडे झाली असतील ३० वर्षाची झाडे झाली. मला असं वाटत की त्याच थोड क्रेडीट आपण हारनामसिंग यांच्या माध्यमातून  केल गेल पाहिजे.  मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की आपण खरतर हाडांचे शेतकरी आहात. आपणही हया शहरातल्या वेगवेगळया भागामध्ये जाऊन गार्डनची पाहणी केलेली आहे. हे शहर चांगल सुधारण्यासाठी या शहरामध्ये आपल्या ग्लोबल वॉर्निंग पासून

,

आपल्याला मुक्त करण्यासाठी तुमचा सातत्याने प्रयत्न आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की वृक्षप्राधिकरणाचे जे बजेट आहे ते आपण मंजुर करुन पुढच्या विषयाला आपण सुरुवात करावी. खूप खूप धन्यवाद.

मा. महापौर – साळुंके साहेब खुलासा दया.

**मा. साळुंके [मुख्य उदयान अधिक्षक]** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह वृक्ष संर्वधन समितीचे जे अंदाजपत्रक आहे सन २०१८-१९ चे सुधारित व २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक आहे. यामध्ये वृक्ष प्राधिकरण समितीने जे बजेट केलेले आहे याच्यामध्ये चालू वर्षी वृक्षारोपनसाठी दिड लाख ठेवलेले आहे. दिड लाखमध्ये आपण औंध आणि मिलीटरी कँप मध्ये पस्तीस हजार करणार आहोत. देहूरोड मिलीटरी कँप मध्ये आपण तीस हजार वृक्षारोपण करणार आहोत. आणि दिघी डोंगराच्या कडेने आपण पस्तीस हजार वृक्षारोपण करणार आहोत. आणि प्रभागनिहाय पंचेचाळीस हजार वृक्षारोपण करणार आहोत. मेट्रोमार्फत आपण पाच हजार वृक्षारोपण करणार आहोत. नर्सरीमध्ये आपण दिडलाख रोपे तयार करणार आहोत. प्रभागनिहाय वृक्षारोपणासाठी जे आपल्याला रोपे लागणार आहेत ती पाच हजार रोपे आपण खरेदी करण्याची निविदा मागविलेली आहे. तसेच दुर्गादेवी, तळवडे गायरान पर्यावरण संस्कार उदयान किंवा अजून ज्या ओपनस्पेसेस असेल तिथे सुबाभूळ आहे. त्या काढून त्याठिकाणी झाडे लावणेत येणार आहे हे कामकाज आपण हाती घेतल आहे. वृक्ष गणणेबाबत जे म्हटले होते. आपली जी वृक्षगणना आहे त्याची निवीदा काढून ते काम आपण इंडिया प्रा. लि. या कंपनीला पाच वर्षासाठी देत आहोत. त्यामध्ये पहिल्या दोन वर्षासाठी त्यांनी वृक्षगणना करायची आणि नंतर तीन वर्षासाठी त्यांनी त्याची देखभाल करायची. वृक्षगणना जी करायची आहे ती त्यांनी प्रायोगिक तत्वावर वॉर्ड क्रं. २७ तिथे त्यांनी वृक्षगणना सुरु केलेली आहे. आणि त्याच कामकाज अजुन सध्या चालू आहे. आणि गेल्या वर्षी जे आपण वृक्षारोपण केले होते. मागच्या वेळेस स्टँडींग कमिटीमध्ये सांगितले होते की आपण मागच्या वर्षी जे वृक्षारोपण केल त्या त्या वृक्षारोपणाची तुम्ही पाहणी करुन घ्या. आणि त्या पाहणीनुसार जानेवारीमध्ये जेवढे गेल्या वर्षी आपले उद्दिष्ट होतं साठ हजार त्यापैकी आपण एकोणसाठ हजार वृक्षारोपण केले. एकोणसाठमधले आपण जे वृक्षारोपण मोजले ते ९०.३८ टक्के आले होते. त्याच्या आदल्या वर्षी पन्नास हजार उद्दिष्टे होते. त्यावेळेस आपल्या वृक्षारोपणाची टक्केवारी ८५ टक्के होते. त्याच्या अगोदर २०१६-१७ ला पण पन्नास हजार वृक्षारोपण केले होते. त्यावेळेस टक्केवारी ८४ टक्के होती. तर असं हे

,

अंदाजपत्रक आहे. आणि झाडे तोडण्यासाठी जी आपण एजन्सी नेमली होती. त्या एजन्सीला आपण झाडाच्या फांदया तोडायला ऑर्डर दिली. ती एजन्सी झाडांच्या फांदया न तोडता ते झाड खालूनच तोडायची त्याच्यामुळे ऑगस्टमध्ये नाही झालं. साहेबांनी सगळीच टेंडर कॅन्सल केली आणि आता आपण असं टेंडर काढलयं अ ब क ड प्रभागात त्यांनी लोक आणि वाहने पुरवायची. झाडांच्या फांदया किंवा ते झाड तोडायच त्यांनी त्या फांदया जमा करायच्या त्यांनी घेऊन जायच्या नाहीत. त्यामुळे पहिल काय व्हायचं त्यांनी आपल्याला पैसे दयायचे असं होतं. त्याच्यामुळे आता आपण टेंडर कालच ओपन केलेले आहेत. चारचार प्रभागांसाठी दोन निविदा काढलेल्या आहेत आणि आता पावसाळयापूर्वी फांदया तोडायच्या याची पुर्णपणे जबाबदारीने कारवाई करु.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मत पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. कमल घोलप** – मा.महपौर साहेब, विषय क्रमांक ८ मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमाक- ८

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कर/मुख्य/९/कावि/१०८/२०१९ दि.२९/०१/२०१९
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४३२२
दि.५/०२/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ च्या तरतूदी अन्वये खालील नमूद केलेले दर महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील मिळकतींवर सन २०१८ करिता २०१९-लागू केलेले आहे तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली शासनाने ठरवून दिलेल्या दराने शासनाचे करिता केली जाते .सन २०१९ या २०२०-सरकारी वर्षाकरिता दिनांक २० फेब्रुवारी २०१९ पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ अन्वये सन २०१९ या २०२०-वित्तिय

,

वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी / शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्ताव : सन २०१९ या २०२०-सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत

अ. करांचे दर

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन २०१८-१९ चे प्रचलीत दर (सध्याचे ) | | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/-ते 12000/- | 13% | 14% | 13% | 14% |
| | | रक्कम रुपये 12001/ ते - 30000/- | 16% | 17% | 16% | 17% |
| | | रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | 24% | 24% | 24% | 24% |
| ब1 | साफसफाई कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 4 | रस्ता कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेष साफसफाईकर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय, | करयोग्यमूल्यावर | -- | 2% | -- | 2% |

,

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन २०१८-१९ चे प्रचलीत दर (सध्याचे ) | | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| | सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | | | | | |
| 6 | वृक्षकर | करयोग्यमूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |

वरील करांव्यतिरिक्त " नाटयगृह कर " (करमणूक कर) खालीलप्रमाणे वसूल केला जातो.

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन २०१८-१९ चे प्रचलीत दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|---|
| 7 | नाटयगृहा वरील कर करमणूक ) (कर | 1. सिनेमा | | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | प्रती दिवस रु.250/- |
| | | ब) मराठी सिनेमा | करमाफी | करमाफी |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | प्रती दिवस रु.350/- |
| | | 2. नाटक | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 3. सर्कस (कॉन्व्हिल पेट्स) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 4. तमाशा | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 5. संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थिएटरमधील | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |

,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | किंवा थिएटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | | |
| | | 6. कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास रु.50/- | प्रती प्रयोगास रु.50/- |
| | | 7. वरील खेरील इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस रु.100/- | प्रती दिवस रु.100/- |

ब. सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| 1 | माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वत: रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या, स्वत :रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 3 | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% |

,

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| | असणा-या मिळकतीस | 50% रक्कम सूट | रक्कम सूट |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>2. बिगरनिवासी/ मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस - 5% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>2. बिगरनिवासी/ मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस - 5% रक्कम सूट |
| 5 | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती<br>ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>· 3 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 10% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>· 3 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 10% रक्कम सूट |
| | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या |

,

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| | प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकर्तींना सामान्य करात सूट | · 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 15% रक्कम सूट | · 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 15% रक्कम सूट |
| 6 | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे मालमत्तांना करातून सूट (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट |
| 7 | वरील योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकतधारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्यकरातील सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी - दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी - दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष |
| 8 | थकबाकीसह एक रक्कमी | 1. दि.1/4/2018 ते 30/6/2018 | 1. दि .1/4/2019 ते 30/6/2019 अखेर |

,

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| | मिळकतकराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणा-या मिळकतधारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्य करात सवलत | 2. अखेर सर्वसाधारण करात 5%<br>3. दि.1/7/2018 ते 31/3/2019<br>4. अखेर सर्वसाधारण करात 2% | सर्वसाधारण करात 5%<br>2. दि .1/7/2019 ते 31/3/2020 अखेर सर्वसाधारण करात 2% |

क. करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर

| अ.क्र. | नाव | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्यमूल्यावर 5% | करयोग्यमूल्यावर 5% |
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवा शुल्क | प्रति बीलास 10/- रूपये | प्रति बीलास 10/- रूपये |

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे कर व करेत्तर बाबींचे दर निश्चित करतेवेळी मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ८१७, दिनांक २०/०२/२०१६ अन्वये करयोग्यमूल्य निर्धारणासाठी जे अ, ब, क, ड असे विभाग करुन वेगवेगळे दर निश्चित करणेत आलेले आहेत त्याची पुर्नरचना करणेबाबतचा ठराव केलेला होता. त्यानुसार पुर्नरचना खालीलप्रमाणे

,

सध्याचे करयोग्यमूल्य निश्चितीसाठीचे अ, ब, क, ड विभाग

| अ विभाग | ब विभाग | क विभाग | ड विभाग |
|---|---|---|---|
| 1. निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, पिंपरीवाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br>2. फुगेवाडी दापोडी व भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व गट (सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) | 1. सांगवी, थेरगाव या विभागीय कार्यालयातील सर्व गट (सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) | 1. च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br>2. सांगवी - गट क्रमांक 9 रक्षक सोसायटी<br>3. थेरगाव - गट क्रमांक 7 भुजबळ वस्ती, गट क्रमांक 8 वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती व गट क्रमांक 9 पुनावळे गावठाण<br>4. फुगेवाडी दापोडी - गट क्रमांक 7 बोपखेल<br>5. भोसरी - गट क्रमांक 15 साईपार्क आदर्शनगर, गट क्रमांक 16 दिघी गावठाण, गट क्रमांक 17 गजानन महाराज मंदिर<br>6. झोपडपट्टया : अ, ब व क विभागातील झोपडपट्टया (झोनिपुमार्फत सेवाआकार वसूली) | 1. थेरगाव या विभागीय कार्यालयातील सर्व गट क्रमांक १० जीवननगर, गट क्रमांक ११ निंबाळकर नगर व गट क्रमांक १२ ताथवडे गावठाण |

,

पुनर्रचना करुन करयोग्यमूल्य निश्चितीसाठीचे अ, ब, क विभाग

| अ विभाग | ब विभाग | क विभाग |
|---|---|---|
| 1. निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, सांगवी, पिंपरीवाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन, फुगेवाडी दापोडी, भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट व थेरगाव या विभागीय कार्यालयातील सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून उर्वरीत गट | 1. थेरगाव – गट क्रमांक 7 भुजबळ वस्ती, गट क्रमांक 8 वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती<br>2. दिघी बोपखेल (भोसरी) –<br>गट क्रमांक 1 - (15) साईपार्क आदर्शनगर, गट क्रमांक 3 - (16) दिघी गावठाण, गट क्रमांक 2 - (17) गजानन महाराज मंदिर | 1.-च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br>2. थेरगाव गट क्र. 9 पुनावळे गावठाण, गट क्र.10 जीवननगर,गट क्र. 11 निंबाळकर नगर,गट क्रमांक 12 ताथवडे गावठाण<br>3. दिघी बोपखेल (फुगेवाडी दापोडी) - गट क्रमांक 4 (7) बोपखेल<br>4. झोपडपट्टया : अ, ब व क विभागातील झोपडपट्टया (झोनिपु मार्फत सेवा आकार वसूली) |

वरील प्रमाणे सन २०१९-२०२० करिता दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

सन २०१९-२०२० या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी / शुल्क तसेच पुनर्रचना करून करयोग्यमुल्य निश्चित करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने शहरातील कर आकारणी न झालेल्या मिळकतींची संबंधीत मिळकत धारक ज्या त्या वर्षी माहिती देत नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान होऊन विकासकामांना गती देणे शक्य होत नाही. तरी यासाठी शहरातील नव्याने बांधकाम झालेल्या अथवा बांधकाम होऊनही सदर मिळकतींची करआकारणी झाली नाही अशा शहरातील सर्व मिळकतींची करआकारणी केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्नात वाढ

,

होणार आहे. यासाठी नागरीकांनी मिळकत शोधून दिल्यास सदर नागरीकांना प्रोत्साहनात्मक भत्ता म्हणून बक्षिस योजना राबविणे आवश्यक आहे. सदर योजना खालील प्रमाणे राबविणेत येणार आहे.

शहरातील करआकारणी न झालेल्या निवासी/ बिगरनिवासी मिळकतींची मिळकत धारकांचे नाव व संपूर्ण पत्यासह सविस्तर माहिती देणा-यास बक्षिसाची रक्कम मिळकतीचे सामान्य कराचे १०% इतकी मिळकती शोधणा-या लाभार्थ्यास अदा करण्यास मान्यता देणेस तसेच महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत दिव्यांग शाळांच्या इमारतींना मालमत्ता कर बिगरनिवासी दराचे निम्या दरा ऐवजी आकरणी करताना मिळकतीचे बांधकाम स्वरूपानुसार व आकारणीचे वेळी जे प्रचलित निवासी दर होते त्याचे ५०% दराने दि.०१/०४/२०१९ पासून वार्षिक करयोग्यमुल्य निश्चित करून त्यावर निवासी दराने मिळकत कर आकारणी करणेस मान्यता देणे.

**मा. अनुराधा गोरखे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा. नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६, दि.३१/१०/२०१८ अन्वये झोपडपट्टीतील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामीचे धोरण मा. महापालिका सभेने मंजुर केलेले आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांनी आदेश क्र. पापु/मुख्य/१४०/२०१८ दि.२९/११/२०१८ नुसार अंमलबजावणीसाठीचे आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार झोपडपट्टीतील अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करणेसाठी रक्कम निश्चित केलेली आहे. शहरातील विविध भागात चाळींचे प्रमाण अधिक आहे. अनाधिकृत नळजोड नियमित करण्याच्या मोहिमेस चाळधारकांकडुन अधिक चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी वरील ठराव तसेच आदेश यान्वये झोपडपट्टयांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करण्यास जे धोरण आहे तेच धोरण चाळींमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामी लागु करणेसाठी मा. महापालिका सभेची मान्यता देणेत यावी तसेच, जे ग्राहक दि.३१ मार्च २०१९ पुर्वी पाणी बीलाची संपुर्ण थकबाकी भरतील त्या ग्राहकांना थकबाकीच्या रकमेवर १० टक्के रक्कम सवलत देणेस मान्यता देणेत यावी.

**मा. शशीकांत कदम** – मा.महापौर साहेब, उपसूचनास मी अनुमोदन देतो.

**मा.कमल घोलप -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपूसचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

,

ठराव क्रमांक – ३८० विषय क्रमांक – ८

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कर/मुख्य/९/कावि/१०८/२०१९ दि.२९/०१/२०१९
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४३२२
दि.५/०२/२०१९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९९ च्या तरतूदी अन्वये खालील नमूद केलेले दर महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील मिळकतींवर सन २०१८-२०१९ करिता लागू केलेले आहे तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली शासनाने ठरवून दिलेल्या दराने शासनाचे करिता केली जाते. सन २०१९-२०२० या सरकारी वर्षाकरिता दिनांक २० फेब्रुवारी २०१९ पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ९९ अन्वये सन २०१९-२०२० या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे करांचे आणि करेत्तर बाबींचे फी / शुल्काचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्ताव : सन २०१९-२०२० या सरकारी वर्षाकरिता कराचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत

अ.करांचे दर

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन २०१८-१९ चे प्रचलीत दर (सध्याचे ) | | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/-ते 12000/- | 13% | 14% | 13% | 14% |
| | | रक्कम रुपये 12001/ ते - 30000/- | 16% | 17% | 16% | 17% |
| | | रक्कम रुपये 30001/- व | 24% | 24% | 24% | 24% |

,

| अ.क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन २०१८-१९ चे प्रचलीत दर (सध्याचे ) | | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| | | त्यापुढील | | | | |
| ब1 | साफसफाई कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 4 | रस्ता कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेष साफसफाईकर (फक्त मॉल्स, लॉजिंग बोर्डिंग, मंगल कार्यालय, सभागृह, रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मिळकतींस) | करयोग्यमूल्यावर | -- | 2% | -- | 2% |
| 6 | वृक्षकर | करयोग्यमूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |

वरील करांव्यतिरिक्त “ नाटयगृह कर ” (करमणूक कर) खालीलप्रमाणे वसूल केला जातो.

| अ. क्र. | कराचे नाव | करआकारणी पध्दत | सन २०१८-१९ चे प्रचलीत दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|---|
| 7 | नाटयगृहा | 8. सिनेमा | | |

,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वरील कर करमणूक ) (कर | आ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | प्रती दिवस रु.250/- |
| | | ब) मराठी सिनेमा | करमाफी | करमाफी |
| | | ख) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | प्रती दिवस रु.350/- |
| | | 9. नाटक | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 10. सर्कस (कॉन्व्हिल पेट्स) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 11. तमाशा | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 12. संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थिएटरमधील किंवा थिएटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- | प्रती प्रयोगास रु.100/- |
| | | 13. कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास रु.50/- | प्रती प्रयोगास रु.50/- |
| | | 14. वरील खेरील इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस रु.100/- | प्रती दिवस रु.100/- |

ब. सामान्यकरातील सवलत योजना : सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + साफसफाई कर + अग्निशामक + मनपा शिक्षण उपकर हे कर समाविष्ट आहेत)

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| 1 | माजी सैनिक व | चालू सरकारी वर्षाचे | चालू सरकारी वर्षाचे चालू |

,

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे स्वतः रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सूट | चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 2 | फक्त महिलांचे नावे असलेल्या, स्वत :रहात असलेल्या फक्त एका निवासी घरास सामान्य करात सुट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 3 | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या अंध, अपंग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर यांच्या नावावर असणा-या मिळकतीस | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर रक्कमेच्या 50% रक्कम सूट |
| 4 | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता सामान्य करात सुट देणे | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>2. बिगरनिवासी/ मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस - 5% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>1. स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - 10% रक्कम सूट<br>2. बिगरनिवासी/ मिश्र / औद्योगिक /मोकळया जमिनी इ. मिळकतीस - 5% रक्कम सूट |

,

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| 5 | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मिळकती<br>ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>· 3 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 10% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>· 3 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 10% रक्कम सूट |
| | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममध्ये 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्पांना बांधकाम परवानगी विभागामार्फत अंतिम भोगवटा पत्रक व अंतिम ग्रीन बिल्डींग Certificate प्राप्त झालेल्या मिळकतींना सामान्य करात सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>· 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 15% रक्कम सूट | चालू सरकारी वर्षाचे चालू मागणी तील देय सामान्यकर रक्कमेच्या<br>· 1 Star Rating - 05% रक्कम सूट<br>· 2 Star Rating - 08% रक्कम सूट<br>· 3 Star Rating - 10% रक्कम सूट<br>· 4 Star Rating - 12% रक्कम सूट<br>· 5 Star Rating - 15% रक्कम सूट |
| 6 | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवा तसेच अविवाहीत शहीद सैनिकांचे नामनिर्देशितांचे मालमत्तांना करातून सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) सूट |

,

| अ.क्र. | योजना | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता (प्रस्तावित दर) |
|---|---|---|---|
| | (शासन निर्णयानुसार) | | |
| 7 | वरील योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकतधारकास घेता येईल तसेच वरील योजनेचा सामान्यकरातील सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण बिलाची रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणेची मुदत (बिल मिळो अथवा न मिळो) | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी - दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष | अ.क्र. 1 ते 5 मधील सवलत योजनांसाठी - दिनांक 30 जून अखेर<br>अ.क्र. 6 चे सवलत योजनेसाठी संपूर्ण वर्ष |
| 8 | थकबाकीसह एक रक्कमी मिळकतकराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणा-या मिळकतधारकास चालू आर्थिक वर्षाचे सामान्य करात सवलत | 1. दि.1/4/2018 ते 30/6/2018<br>2. अखेर सर्वसाधारण करात 5%<br>3. दि.1/7/2018 ते 31/3/2019<br>4. अखेर सर्वसाधारण करात 2% | 1. दि .1/4/2019 ते 30/6/2019 अखेर सर्वसाधारण करात 5%<br>2. दि .1/7/2019 ते 31/3/2020 अखेर सर्वसाधारण करात 2% |

क. करेत्तर बाबींचे फी / शुल्कांचे दर

| अ.क्र. | नाव | सन २०१८-२०१९ चे प्रचलित दर (सध्याचे) | सन २०१९-२०२० करिता प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 1 | मिळकत हस्तांतरण नोंद नोटीस फी | करयोग्यमूल्यावर 5% | करयोग्यमूल्यावर 5% |

,

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | थकबाकी नसलेचा दाखला फी | प्रती दाखला 10/- रूपये | प्रती दाखला 10/- रूपये |
| 3 | मिळकत उतारा | प्रती उतारा 20/- रूपये | प्रती उतारा 20/- रूपये |
| 4 | प्रशासकीय सेवा शुल्क | प्रति बीलास 10/- रूपये | प्रति बीलास 10/- रूपये |

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे कर व करेत्तर बाबींचे दर निश्चित करतेवेळी मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ८१७, दिनांक २०/०२/२०१६ अन्वये करयोग्यमूल्य निर्धारणासाठी जे अ, ब, क, ड असे विभाग करून वेगवेगळे दर निश्चित करणेत आलेले आहेत त्याची पुर्नरचना करणेबाबतचा ठराव केलेला होता. त्यानुसार पुनर्रचना खालीलप्रमाणे

सध्याचे करयोग्यमूल्य निश्चितीसाठीचे अ, ब, क, ड विभाग

| अ विभाग | ब विभाग | क विभाग | ड विभाग |
|---|---|---|---|
| 1. निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, पिंपरीवाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br>2. फुगेवाडी दापोडी व भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व गट (सन | 1. सांगवी, थेरगाव या विभागीय कार्यालयातील सर्व गट (सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) | 1. च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br>2. सांगवी - गट क्रमांक 9 रक्षक सोसायटी<br>3. थेरगाव - गट क्रमांक 7 भुजबळ वस्ती, गट क्रमांक 8 वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती व गट क्रमांक 9 पुनावळे गावठाण<br>4. फुगेवाडी दापोडी - | 1. थेरगाव या विभागीय कार्यालयातील सर्व गट क्रमांक १० जीवननगर, गट क्रमांक ११ निंबाळकर नगर व गट क्रमांक १२ ताथवडे गावठाण |

,

| | | | |
|---|---|---|---|
| 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) | | गट क्रमांक 7 बोपखेल<br><br>5. भोसरी - गट क्रमांक 15 साईपार्क आदर्शनगर, गट क्रमांक 16 दिघी गावठाण, गट क्रमांक 17 गजानन महाराज मंदिर<br><br>6. झोपडपट्टया : अ, ब व क विभागातील झोपडपट्टया (झोनिपुमार्फत सेवाआकार वसूली) | |

पुनर्रचना करुन करयोग्यमूल्य निश्चितीसाठीचे अ, ब, क विभाग

| अ विभाग | ब विभाग | क विभाग |
|---|---|---|
| 1. निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, सांगवी, पिंपरीवाघेरे, पिंपरीनगर, मनपाभवन, फुगेवाडी दापोडी, भोसरी या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट व थेरगाव या विभागीय कार्यालयातील सन 1997 मध्ये नवीन समाविष्ट झालेला | 1. थेरगाव –<br><br>गट क्रमांक 7 भुजबळ वस्ती, गट क्रमांक 8 वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती<br><br>2. दिघी बोपखेल (भोसरी) –<br><br>गट क्रमांक 1 - (15) साईपार्क आदर्शनगर, गट क्रमांक 3 - (16) दिघी गावठाण, गट क्रमांक 2 - (17) गजानन महाराज मंदिर | 1. -च-होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे या विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट<br><br>2. थेरगाव गट क्र. 9 पुनावळे गावठाण, गट क्र.10 जीवननगर,गट क्र. 11 निंबाळकर नगर,गट क्रमांक 12 ताथवडे गावठाण<br><br>3. दिघी बोपखेल (फुगेवाडी दापोडी) - गट क्रमांक 4 (7) बोपखेल<br><br>4. झोपडपट्टया : अ, ब व |

,

| | | |
|---|---|---|
| ग्रामीण भाग वगळून उर्वरीत गट | | क विभागातील झोपडपट्टया (झोनिपु मार्फत सेवा आकार वसूली) |

वरील प्रमाणे सन २०१९-२०२० करिता  दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

सन २०१९-२०२० या वर्षाकरिता महानगरपालिका करांचे दर आणि करेत्तर बाबीची फी / शुल्क तसेच पुनर्रचना करून करयोग्यमुल्य निश्चित करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने शहरातील कर आकारणी न झालेल्या मिळकतींची संबंधीत मिळकत धारक ज्या त्या वर्षी माहिती देत नसलेने मनपाचे आर्थिक नुकसान होऊन विकासकामांना गती देणे शक्य होत नाही. तरी यासाठी शहरातील नव्याने बांधकाम झालेल्या अथवा बांधकाम होऊनही सदर मिळकतींची करआकारणी झाली नाही अशा शहरातील सर्व मिळकतींची करआकारणी केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे. यासाठी नागरीकांनी मिळकत शोधून दिल्यास सदर नागरीकांना प्रोत्साहनात्मक भत्ता म्हणून बक्षिस योजना राबविणे आवश्यक आहे. सदर योजना खालील प्रमाणे राबविणेत येणार आहे.

शहरातील करआकारणी न झालेल्या निवासी/ बिगरनिवासी मिळकतींची मिळकत धारकांचे नाव व संपूर्ण पत्यासह सविस्तर माहिती देणा-यास बक्षिसाची रक्कम मिळकतीचे सामान्य कराचे १०% इतकी मिळकती शोधणा-या लाभार्थ्यास अदा करण्यास मान्यता देणेस तसेच महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत दिव्यांग शाळांच्या इमारतींना मालमत्ता कर बिगरनिवासी दराचे निम्या दरा ऐवजी आकरणी करताना मिळकतीचे बांधकाम स्वरूपानुसार व आकारणीचे वेळी जे प्रचलित निवासी दर होते त्याचे ५०% दराने दि.०१/०४/२०१९ पासून वार्षिक करयोग्यमुल्य निश्चित करून त्यावर निवासी दराने मिळकत कर आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६, दि.३१/१०/२०१८ अन्वये झोपडपट्टीतील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामीचे धोरण मा. महापालिका सभेने मंजुर केलेले आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांनी आदेश क्र. पापु/मुख्य/१४०/२०१८ दि.२९/११/२०१८ नुसार अंमलबजावणीसाठीचे आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार झोपडपट्टीतील अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करणेसाठी रक्कम निश्चित केलेली आहे.

,

शहरातील विविध भागात चाळींचे प्रमाण अधिक आहे. अनाधिकृत नळजोड नियमित करण्याच्या मोहिमेस चाळधारकांकडुन अधिक चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी वरील ठराव तसेच आदेश यान्वये झोपडपट्टयांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करण्यास जे धोरण आहे तेच धोरण चाळींमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामी लागु करणेसाठी मा. महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे. तसेच, जे ग्राहक दि.३१ मार्च २०१९ पुर्वी पाणी बीलाची संपुर्ण थकबाकी भरतील त्या ग्राहकांना थकबाकीच्या रकमेवर १० टक्के रक्कम सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा. माधवी राजापुरे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर पढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमाक- ९

दिनांक- २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.विलास मडिगेरी, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४३२७

दि.५/०२/२०१९

केंद्र शासनाच्या धर्तीवर व राज्य वेतन सुधारणा समितीचे शिफारशींचे आधारे राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार राज्य शासनाने शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र./सेवा ९ दि.३० जानेवारी २०१९ अन्वये सुधारित वेतनसंरचना लागू केली आहे. तसेच शासन निर्णय क्र.सनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४ दि. २४ जानेवारी २०१९ अन्वये सेवानिवृत्त झालेल्या निवृत्त वेतन धारकांच्या व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांच्या वेतनात ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचा-यांनाही राज्य शासकिय कर्मचा-यांप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचना/वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेतील वरीष्ठ अधिका-यांची वेतन पुनर्रचना समिती गठीत करणेत

,

आली आहे. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे मागणीनुसार व महापालिका वेतन पुर्नरचना समितीचे शिफारशींचे अहवालाधिन महापालिका आस्थापनेवरील पात्र कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना महापालिकेने ६ व्या वेतन आयोगानुसार लागू केलेली वेतनश्रेणी विचारात घेऊन सदर पदांना शासनाकडील ७ व्या वेतन आयोगानुसार समकक्ष सुधारीत वेतनश्रेणी / वेतनसंरचना लागू करणे, सुधारित आश्वासित प्रगती योजनेनुसार ३ लाभांची वेतन संरचना लागू करणे, मनपाने महागाई भत्याबाबत केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे लागू केलेले धोरण यापुढेही कायम ठेवणे, घरभाडे भत्ता, पुरक भत्ता, वाहतुक भत्ता, रोखरक्कम हाताळण्याचा भत्ता, एन.पी.ए. व इतर राज्यशासनाचे धोरणानुसार लागू असलेने राज्यशासन वेळोवेळी सुधारणा करेल त्याप्रमाणे लागू करणे, मनपा कर्मचा-यांना विद्यमान लागू असलेले भत्ते उदा. वाहन भत्ता, धोका भत्ता, धुलाई भत्ता, वैद्यकीय भत्ता, व इतर भत्ते एल.एस.जी.डी, एल.जी.एस. इ. वेतनवाढीबाबतचे धोरण यापुढेही कायम ठेवणे, ७ व्या वेतन आयोगानुसार फरकापोटी देय रक्कम शासकीय कर्मचा-यांप्रमाणे पाच समान हस्यात तथापि मनपाचा भविष्य निर्वाह निधी स्वतंत्रपणे असल्याने बँकांकडून मिळणारे व्याज व मनपा कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी खात्यावर द्यावे लागणारे व्याज विचारात घेऊन भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे / रोखीने देणे याबाबत वेतन पुनर्रचना समितीचे शिफारशीनुसार कार्यवाही करणे, तसेच या संदर्भात काही त्रुटी व सुधारणा असल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देणे इ.बाबींना मान्यता देणेस व त्यापोटी येणा-या खर्चास धोरणात्मक बाब म्हणून मान्यता देणेत यावी.

**मा.चंदा लोखंडे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा. नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- १.राज्य शासकीय कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून लागु करण्यात आलेला आहे व प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१ जोनवारी, २०१९ पासुन मंजुर करण्यात आलेला आहे. तरी मनपा कर्मचा-यांना सदरचा सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणीचा प्रत्यक्ष लाभ माहे एप्रिल-२०१९ पेड इन मे-२०१९ पासुन लागू करणेस राज्य शासनाच्या उमेदमान्यतेवर मान्यता देण्यात यावी. तसेच सेवानिवृत्त वेतन धारकांना माहे एप्रिल-२०१९ पेड इन मे-२०१९ प्रत्यक्ष लाभ देण्यास मान्यता देणेत यावी.

,

२. मनपातील खालील पदांच्या वेतनश्रेणींमध्ये त्रुटी आहेत. त्यांचे वेतनश्रेणीत खालीलप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व ग्रेड पे | सहाव्या वेतन आयोगानुसार आवश्यक वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | फायरमन | ५२००-२०२००, ग्रेड पे - १९०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० |
| २ | लिडींग फायरमन | ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - २८०० |
| ३ | भांडारपाल | ९३००-३४८००, ग्रेड पे - ४२०० | ९३००-३४८००, ग्रेड पे - ४३०० |
| ४ | भांडार अधिकारी | ९३००-३४८००, ग्रेड पे - ४४०० | ९३००-३४८००, ग्रेड पे - ५४०० |
| ५ | माळी | ५२००-२०२००, ग्रेड पे - १९०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० |
| ६ | एम. पी. डब्ल्यु | ५२००-२०२००, ग्रेड पे - २८०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - ४३०० |

तसेच मनपाने मा. महापालिका सभेच्या मंजुरीने काही पदांसंदर्भात सहाव्या वेतन आयोगातील त्रुटींबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविला असून सदर पदांना सातवा वेतन आयोग लागु करताना सदर पदांबाबत राज्य शासनाकडे पाठविलेल्या प्रपत्र - ब मध्ये नमुद केलेप्रमाणे वेतनश्रेणी गृहित धरुन सातवा वेतन आयोग लागु करणेस मान्यता देणेत यावी व महानगरपालिकेने काही नविन पदांची निर्मिती केली असून सदर पद निर्मितीचा प्रस्ताव शासन मंजुरीसाठी प्रलंबित आहे. या पदांना देखील सातवा वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागु करणेस मान्यता देणेत यावी.

३. राज्य शासनाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान पेन्शन योजना लागु केली असुन त्याच धर्तीवर, मनपा कर्मचा-यांना अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु करण्यात आलेली आहे. तथापि मनपा कर्मचारी महासंघाचे मागणीनुसार सदर अंशदान निवृत्तीवेतन योजनेऐवजी महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पुर्वीची सेवानिवृत्ती वेतन योजना लागु करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

,

**मा.दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मा.महापौर साहेब, हा विषय चांगला आहे पण जी उपसूचना वाचली तेवढीच ग्राहय धरावी असे मला वाटते. महापौर साहेब, आपल्याला एक विषय नमुद करावयाचा आहे. काल महापालिकेमध्ये एक घटना घडलेली आहे. की राहुल कलाटे संबंधित या सभागृहाचे नगरसेवक आणि त्या माध्यमातून नगररचनाच्या किंवा काही विषयामध्ये एका अधिका-याबरोबर काही शाब्दीक चर्चा झाली असेल, नसेल त्यामध्ये कोणताही पुरावा नसताना एखादया नगरसेवकावर गुन्हा दाखल होणे आणि गुन्हा दाखल करताना एक दिवस अगोदर घडलेला घटनाक्रम बघीतलातर तीस-या दिवशी गुन्हा दाखल होतो. असा प्रकार सध्या महानगरपालिकेमध्ये चालू झालेला आहे त्याचा मी पहिल्यांदा जाहीर निषेध करतो. दुसर महत्वाचं आयुक्त साहेब, प्रकरण काय आहे हे त्या संबंधित दोन व्यक्तींनाच माहिती आहे. पण प्रकरणाचा जो काही कर्मचा-यांनी लेखणी बंद आंदोलन केले होते आणि त्या आंदोलनामध्ये एक व्यक्ती जो कोण त्यांनी अतिशय सुंदर भाषण केले. मी माझ्या सर्व सन्मा. नगरसदस्यांना सांगतो. एखादा नगरसेवक ज्यावेळेस असं कृत्य करणारा असेल असं काही झालं की नाही मलाही माहीत नाही, त्यालाही माहिती नाही आणि त्या अधिका-यांलाही माहिती नाही. पण अशी काही घटना घडली तर नगरसेवकांना चोपडले पाहिजे, मारले पाहिजे. अशी जर का एखादया महानगरपालिकेमध्ये समोरच्या आपल्या महानगरपालिकेच्या आवारामध्ये शब्द वापरत असेल तर मला वाटतं या नगरसेवकांच्या उदया मला वाटतं आम्ही सुध्दा सभागृहामध्ये येताना एक तर सेफ्टीगार्ड घालून यावं की काय. उदया आमच्या अंगावर जखमा होऊ नयेत किंवा एखादे प्रोटेक्शन घेऊन यावे की काय. किंवा आयुक्तसाहेब आपल्याला विनंती करतो की आमच्या १२८ प्लस पाच यांना प्रोटेक्शन देण्याची गरज आहे. आम्ही १२८ प्लस पाच १३३ आणि ते सातआठ हजार. आम्ही विचार केला तर ते आम्हाला कुठे ही हाणून टाकतील. आम्ही विचार केला असता तुमची संख्या आणि नगरसेवकांची संख्या याच्यामध्ये जर बघितल तर नक्कीच मला वाटत की आमच्या नगरसेवकांना शक्य आहे ते. हे तुम्ही बोलल्याप्रमाणे ते होऊ शकते. किंवा कोण अधिकारी बोलला तर त्याप्रमाणे ते होऊ शकते. पण साहेब हया अशा विषयाला अशा घटनेला माझ्या सर्व नगरसेवकांच्या वतीने एक पहिला प्रशासनाचा आणि त्या अधिका-याचा तीव्र शब्दात मी निषेध करतो. हे सभागृहाची दोन चाके आहेत. आम्ही काय आमची घरची कामे नाही सांगत साहेब. आम्ही ज्यावेळेला काही शाब्दीक चर्चा करतो. काही आमचे शब्द चांगले वाईट जात असतील, तुमचेही आम्हाला येत असतील. त्यामध्ये तुमचा आमचा

,

काही बांधाला बांध नाही. दत्ता सानेचा काही तुमच्या बांधाला बांध नाहीय. एखादया नगरसेवकाला नागरीक बोलत असला तर त्यांची कामे होत नसतात, त्याबद्दल नागरीक विचारतात. नगरसेवकांना चांगलेवाईट बोलतात. साहेब हे साफ चुकीचे आहे. हे चांगल नाहीय साहेब. जर तुम्ही भूमिकेमध्ये असाल तर ठीक आहे नगरसेवक चुकत असेल तर मान्य करु. अधिकारी ज्यावेळेला एखादया नगरसेवकावर गुन्हा दाखल करतो. त्याच्या कायदयामध्ये काहीतरी आहे ना. गुन्हा दाखल करताना आदरनीय आयुक्तांचे काहीतरी परिपत्रक त्याला दयावे लागत. मा. आयुक्तांनी सांगितले आहे का गुन्हा दाखल करायचा. ज्या वेळेस महानगरपालिकेमध्ये एखादा कर्मचारी काम करतो तो बीपीएमसी ॲक्टच्या माध्यमातून काम करीत असतो. त्याच्यावर काहीतरी बंधन असेल, त्याचा बॉण्ड असेल. चोपून काढणे ही भाषा. तो राहुल कलाटेंना बोलला. महापौर साहेब तुम्ही पण त्याच्यामध्ये आहात. चोपटून काढण्याची ही भाषा एखादा अधिकारी किंवा कर्मचारी करीत असेल ही कुठली पध्दत आहे साहेब. कुठे नेऊन ठेवलींय आपली महापालिका. उदया आम्ही इथं यायचं की नाही. आम्ही सभागृहात यायच की नाही हा प्रश्न पडतोय आम्हाला. चुकीचं जर कोण बोलत असेल तर ठीक आहे. गुन्हा दाखल झाला काही हरकत नाही पण ज्यावेळेस गुन्हा दाखल करताना त्याची सत्यता पडताळणे गरजेचे आहे. तुमची मेडीकल व्हायला पाहिजे. मेडीकल करताना त्याच्यामध्ये कुठेतरी आलं पाहिजे ना. की बाबा लागलं, मारलं, हाणलं हे कुठे तरी आलं पाहिजे ना. असं काहीही झालं नाही. मला असं कळलं की मा. आयुक्त म्हणाले की मला माहीत पण नाही. कोण अधिका-याची भांडण झाली कोणाचं काय झालं. मला माहीत नाही. ही घटना घडली त्यावेळेस आम्ही सगळे बाहेर गेलो. संबंधित नगरसदस्य पण बोलले नाही माझ्याकडून काय झालं नाही. ठिक आहे नगरसेवक चुकला असेलतर सत्तारुढ पक्षनेते आहेत, महापौर आहेत, आयुक्त आहेत. एकत्र बसून त्याच्यावर चर्चा करु शकतो ना. की बाबा ठीक चुकू दया आम्ही म्हणत नाही. नगरसदस्य चुकला, नाही चुकला, अधिकारी चुकला नाही चुकला. त्याच्याबद्दल दुमत नाही. हे होऊ शकतं होणार. मी तर काय कोणी काय घरच येऊन काम सांगत नाही कोणी कोणाला. की दत्ता सानेंच्या घरी किराणा भरला नाही म्हणून मी अधिका-याला मारल, असलं तर काय होणार नाही. किंवा कुठल्या नगरसेवकांचा स्वत:चा किराणा माल आणला नाही, म्हणून त्यांनी मारलं हाणलं असं तरी कधी होणार नाही. साहेब अशा जर घटना होत असतील तर सभागृहाला जर हे वळण लावायचं असेल तर सत्तारुढ पक्षनेते पवारसाहेब, महापोरसाहेब मी तुम्हाला विनंती करतो या जर घटना होणार असतील

,

तर इथून पुढे असे चालत असेल तर आमच्या प्रभागात पाणी आले नाही म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेसने आंदोलन केले तर तो आमचा अधिकार आहे. आंदोलन करणं आमचा अधिकार आहे. आम्ही ते गेट बंद केले तर आमच्यावर अधिकारी गुन्हा दाखल करतात. अधिका-याला विचारले तर काही नाही आम्ही कोणी सांगितलं नाही. या महानगरपालिकेचे आम्ही पाच वर्षे विश्वस्त आहोत. विश्वस्तांची ही महानगरपालिका आहे. आमचा नैतीक अधिकार मांडण्यासाठी आम्ही येथे आलेलो आहोत. ज्या नागरीकांनी आम्हाला निवडून दिलंय त्यांच्या समस्या मांडण्यासाठी हे सभागृह आहे त्यासाठी आम्ही येथे भांडतो. या माध्यमातून तर अशा घटना होणार असतील, चुकीच्या माध्यमातून जर अशा घटना होत असतीलतर महापौर साहेब, पक्षनेते मी तुम्हाला विनंती करतो कोण अधिकारी आहे त्याला ताबडतोब निलंबित करा. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याची व्हीडीओ क्लिप सुध्दा सगळीकडे व्हायरल झाली आहे. मी त्याच्याबद्दल सर्वपक्षीय नगरसेवकांना घेवून पोलीस आयुक्तांनाही कंप्लेट केलेली आहे. आयुक्तांनाही कंप्लेंट केलेली आहे त्याची व्हीडीओ क्लिप दिलेली आहे. महापौर साहेब तुम्ही हे किती गांर्भियाने घेताय मला माहीत नाही. आज राहूल कलाटेवर ही वेळ आली उदया तुमच्या आमच्यावर अजून कोणावरही वेळ येइल. एखादा निर्णय चुकत असेलतर चुकीला माफी पण आहेनां. डायरेक्ट फाशी दिली असं एखाद उदाहरण मला सांगा. तो एक मिनीटात चुकला आणि दुस-या मिनीटाला त्याला फाशी दिली असं एखाद उदाहरण दया. मा.महापौर साहेब, माझी अंतकरणापासून विनंती आहे मी दत्ता काका म्हणून बोलत नाहीतर १३३ नगरसेवकांच्या वतीने मी बोलतो. हा विषय खुप गंभीर आहे. हा खुप गांभीर्याने घ्यावा. अधिका-यांनी अधिका-याच्या पध्दतीने राहाव. आम्ही मान्य करतो नगरसेवकांनी नगरसेवकांच्या पध्दतीने रहाव. पण चुक असेलतर एखादी कमिटी येथून पुढ बनवावी. आपल्या नियमात आहे तसं आयुक्तंनी त्याला परमीशन दयाव. कुठल्याही कर्मचा-यावर कुठलीही घटना घडलीतर मला वाटत आयुक्तांच्या परमीशन शिवाय तो पोलीस चौकीमध्ये जावुच शकत नाही असा नियम आहे. जर या घटना घडत असतीलतर या घटना साफ चुकीच्या आहेत मी या घटनेचा जाहीर निषेध करतो. या घटना येथून पुढे होणार नाहीत याची मा.आयुक्त साहेब आपण दखल घ्यावी. याबाबत आपण काय करणार आहोत ते सांगाव, मा.महापौर साहेब आपण आदेश दयावा. आयुक्त साहेब आपण काय कारवाई करणार आहोत ते सभागृहात सांगाव अशी तुम्हांला विनंती करतो. कारण या विषयाच आपण गांभीर्य घेतल

,

नाहीतर येथून पुढे प्रत्येक नगरसेवकांवर ही वेळ येणार आहे. म्हणून याची गांभीर्याने दखल घेवून त्याच्यावर कडक कारवाई करावी अशी मी विनंती करतो.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता दत्ता काकानी सांगीतल्याप्रमाणे जो काही प्रकार संबंधित अधिका-यांचा झाला २४ तासानंतर संबंधित अधिकारी पोलीस स्टेशनला कम्प्लेंट करायला गेला आणि राहूल कलाटेवरती दखलपात्र गुन्हा झाला. त्या अधिका-यांचे जे वरीष्ठ आहेत त्यांनाही काही कल्पना नाही किंवा महापालिकेचे आयुक्त पालक म्हणून आहेत त्यांनाही कल्पना नाही. त्या अधिका-याची पुर्वकल्पना अधिका-यांनी संबंधित विभागाना दिली पाहीजे. त्यांना कल्पना न देता त्या अधिका-यांनी चोवीस तासानी परस्पर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. तीन दिवसानंतर त्या अधिका-याला असेही आठवल की आपल्यावरती ऍट्रोसिटीचे कलम लावू शकतो आणि त्या हिशोबानी राहूल कलाटेवरती गुन्हा दाखल करायचा. संबंधित पोलीस प्रमुख सीपी साहेब त्याला म्हणाले की तुला हे तीन दिवसानी कळल का, म्हणजे हे पहील्या पासून बघीतलतर ही एक स्टोरी आहे आणि स्टोरी प्रमाणे एक एक पात्र त्यात जोडत गेले. राहूल कलाटेवर जो गुन्हा दाखल केला तो अदखलपात्र गुन्हा आहे. संबंधित व्यक्ती बरोबर जे काही झाल तेथे इंगळेसाहेब कार्यकारी अभियंता उपस्थित होते. ते जाबजबाब देतील पण नंतर जी येथे महासंघाच्या वतीने सभा घेण्यात आली तेथे संबंधित अधिकारी डायरेक्ट म्हणाला की नगरसेवकांना चोपल पाहीजे. आमच्या आई-बापानी आम्हांला मार खाण्यासाठी ईथ पाठवल का. आम्ही लोकांची काम घेवून येथे येतोत, लोकांची काम करण्यासाठी आम्हांला ईथ निवडून दिलेल आहे, लोकांची बाजू मांडण्यासाठी ईथ येतो. आम्ही दत्ता काकाला त्याच दिवशी म्हणल होतं की आपण महात्मा गांधी सारख एक गाल नाहीतर दुसरा गाल पण पुढ करतो. कारण आपण मारच खाण्यासाठी येथे आलोत ते पण करतो. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की संबंधित अधिकारी त्या दिवशी म्हणला होता चोपणार आहे त्या अधिका-यांनी सभागृहामध्ये येवून सभागृहाची माफी मागावी. नाहीतर त्याला तीन महीन्यासाठी निलंबन कराव ही विनंती करतो आणि थांबतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच दत्ताकाका साने असतील, आमचे मीत्र वाघेरे साहेब असतील संबंधित जो काही प्रकार झाला त्या दिवशी मी असेल, दत्ताकाका साने असतील, राहूल कलाटे असतील आणि केसरीचे जे ज्येष्ठ पत्रकार आहेत आम्ही सगळे त्या दिवशी विरोधी पक्षनेत्यांच्या केबीनमध्ये होतो. कलाटे साहेबांनी

,

आम्हांला येवून सांगीतल की माझ डोक दुखतय मी विचारल की काय झाल. ते म्हणाले की संबंधित अधिकारी आहे त्याच्याशी शाब्दीक झाली, शिव्या दिल्या. एवढ झाल्यानंतर तीस-या दिवशी डायरेक्ट वर्तमानपत्रामध्ये येत की राहूल कलाटे वरती गुन्हा दाखल झाला. मा.महापौर साहेब, संबंधित जो कोणी राऊत म्हणून अधिकारी आहे त्यांना आम्ही दुस-या दिवशी बोलावल. दत्ता काका असतील, मी असेल आम्ही त्यांना विचारल की खरच हा प्रकार झाला का. त्यांनी सांगीतल की समोर ईंगळे साहेब होते आणि राहूल कलाटेनी खुर्ची उचलली आणि माझ्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला ती खुर्ची मी माझ्या एका हाताने धरली नाहीतर माझ्या डोक्यात पडली असती. मा.महापौर साहेब, जो काही प्रकार झाला तो ईंगळे साहेबांच्या समोर झाला. नक्की काय प्रकार झाला याची शहानिशा होणं गरजेच होतं. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की ज्या दिवशी हा प्रकार झाला त्या दिवशी गुन्हा दाखल होणं गरजेच होतं पण त्या दिवशी गुन्हा दाखल न होता तीस-या दिवशी गुन्हा दाखल होतो, याच्या मागच कारण काय. मी याठिकाणी आपल्याला सांगू इच्छितो की, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष असतील त्यांची समिती आहे. तरी संबंधित अधिकारी, कर्मचा-यांने महासंघाच्या अध्यक्षाकड जायला पाहीजे होतं. त्यांनी सगळयांनी मिळून आयुक्तांकड यायला पाहीज होती आणि आयुक्तांनी त्याची दखल घ्यायला पाहीजे होती आणि नंतर सर्वपक्षीय गटनेत्यांची मिटींग घेवून नक्की हा प्रकार झाला की नाही झाला त्याची शहनिशा करुन, चर्चा करुन मग पुढचा प्रकार व्हायला पाहीजे होता. पण तसे काही न होता लगेच आम्ही चिंचवडे असतील, बबनराव झिंजूर्डे असतील त्यांना बोलावल आणि त्यांना विचारल की संबंधित जो व्यक्ती आहे तो तुमच्याकड आला का तर त्यांनी आम्हांला सांगीतल की हा व्यक्ती आमच्याकड न येता परस्पर गुन्हा दाखल केला. तरी संबंधित व्यक्तीला आयुक्त साहेब असतील, कर्मचारी महासंघ असेल त्याला महत्वाच वाटल नाही का की आपण त्यांच्याकड जाव आणि जी काय गोष्ट घडली ती त्यांना सांगावी म्हणून. मा.महापौर साहेब, जो काही प्रकार घडला त्या प्रकाराची व्यवस्थितपणे शहनिशा होवून जर खरच राहूल कलाटेंच चुक असेलतर गुन्हा दाखल करण्यास हरकत नव्हती. प्रभागात काम करत असताना एक नगरसेवक पन्नास हजार लोकांच लोकप्रतिनीधी म्हणून काम करत असतो. काम सांगताना एखादा नगरसेवक फ्रस्टेटमध्ये येतो आणि कदाचित त्या अधिका-यानी ऐकल नाहीतर तो अरेरावीची भाषा करतो तरी माझी सगळयांना विनंती आहे की तुम्ही तेवढच महत्व नगरसेवकांना पण दिल गेल पाहीजे. एकच काम दोन दोन तीन तीन वेळा न सांगता प्रभाग मोठा आहे,

,

लोकप्रतिनीधी लिमीटेड असल्यामुळे लोकांचे काम व्हावीत जेणे करुन अशा प्रकारचे गुन्हे होणार नाहीत आणि तक्रारी वाढणार नाहीत. प्रशासन म्हणल की ते गाडयाची दोन चाक आहेत आणि ती समांतर आपल्याला चालवावी लागतात. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की जो कोणी व्यक्ती असेल त्याच्याशी व्यवस्थित चर्चा करावी त्याचप्रमाणे सर्वपक्षीय गटनेत्यांची एक बैठक घ्यावी नक्की तो विषय काय आहे तो व्यवस्थितपणे समजून घ्यावा आणि कुठेतरी मार्ग काढून जे गुन्हे दाखल झालेल आहेत ते कसे मागे घेता येतील ते पहाव अशी मी माझ्या पक्षाच्या वतीने नम्र विनंती करतो. दुसरी गोष्ट म्हणजे जो व्यक्ती बाहेर म्हणाला की नगरसेवकांना चोपून काढल पाहीजे, त्या व्यक्तीशी तुम्ही बोला कारण की त्याच छोटस कुटूंब असेल, आमची पण कुटूंब आहेतना. १२८ नगरसेवक आणि दहा हजार कर्मचारी एकत्र आलेतर ते बरोबरीच युध्द होणार नाही. आम्ही सुध्दा लोकांची काम करतोना. लोकांच्या कामासाठी आम्ही या सभागृहामध्ये येतो. आमच असं वयक्तीक मत आहे की कोणाच नुकसान होऊ नये. पण येथून पुढ अशा गोष्टी होवू नयेत याच्यासाठी आपण आयुक्त साहेब काळजी घ्यावी. जर एखादी घटना झालीच तर संबंधित जे कोणी कर्मचारी असतीलतर त्यांनी महासंघाकड जाव. आयुक्तांकड तक्रार करावी आणि त्याच्यानंतर सर्वपक्षीय गटनेत्यांची त्याच्यावर मिटींग व्हावी आणि त्याच्यानंतर गुन्हा दाखल व्हावा अशी आपणास नम्र विनंती करतो आणि येथून अधिकारी वर्गानी सुध्दा अशा पध्दतीने काही करणार नाहीत याची आपणही दखल घ्यावी एवढ बोलून थांबतो, धन्यवाद.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. पहील्यांदा मी हा जो प्रकार झाला त्याचा निषेध व्यक्त करतो. कारण हे असच होत राहीलतर १२८ नगरसेवक आणि चार हजार कामगार असतील. परंतु १२८ नगरसेवका बरोबर २५ लाख जनता आहे त्या जनतेनी आपल्याला इथ पाठवल आहे. मा.महापौर साहेब तुम्ही तीथून खाली उतरता त्यावेळेस तुम्ही सुध्दा एक नगरसेवक असतात. अधिकारी घरातून बाहेर पडल्यास रस्त्यावरुन येता जाताना तो एक सर्वसामान्य नागरीक असतो. ईथ आल्यानंतर अधिकारी होतो. आपण नगरसेवक आहोत आपल्याला ईथ कोणी फुकट पाठवलेल नाही. जनतेनी त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी अपल्याला ईथ पाठवलेल आहे. आपल्या घरातले प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला ईथ पाठवलेल नाही. जर अस होत असेलतर प्रत्येकाला स्वत:साठी एक व्हीडीओ कॅमेरा घेवून फिराव लागेल प्रत्येक नगरसेवकांना प्रत्येक केबीनमध्ये जाताना. प्रत्येक अधिका-या बरोबर बोलताना एक कॅमेरा घेवून जाव लागेल. त्याच कारण जो आता

,

राहूल कलाटे बरोबर प्रकार झाला तो. साहजीकच आहे माझ्या बरोबर सुध्दा काही वाद होतो मी सुध्दा काही शब्द बोलू शकतो. पण सकाळी सहा वाजल्यापासून शेकडो फोन प्रत्येक नगरसेवकाला असतात. तो नगरसेवक त्याच्या वॉर्डातले पन्नास हजार लोकांचे प्रश्न एका अधिका-याकडे मांडत असतो आणि पन्नास हजार लोक त्यांच्या वॉर्डातील एका नगरसेवकांकडे मांडत असतो. सकाळी सहा वाजल्यापासून शेकडो फोन येत असतात त्यावेळेला त्या नगरसेवकांवर किती प्रेशर येत असेल हा सर्वांचा अनुभव आहे. तो काही स्वत:च काम करत नाही आणि अशी जर परिस्थिती असेलतर त्या नगरसेवकांनी व्हीडीओ कॅमेरा घेवून फिरायचा का. मी माझे अनुभव सांगतो ज्यावेळेस एखादया अधिका-याकड जावुन आपण सांगतो, बोलतो त्यांना विनंती करतो, हात जोडून विनंती करतो पण ज्यावेळेस चार चार वेळेस विनंती केली जाते आणि पाचव्या वेळेस तो म्हणतो हे काम झाल पाहीजे. शब्दाचा रोख वेगळा असतो, दर्डावून बोलल जातं त्यावेळेस जर प्रत्येक अधिका-यांनी प्रत्येक नगरसेवकांवर गुन्हा दाखल करायच ठरवलतर नगरसेवकांची ईथ गरज काय राहणार आहे. आणि असच होणार असेलतर, आपण प्रत्येकाला पाठीशी घालत असूतर तुमची आमची किमंत पुढच्यावेळेस शुन्य असणार आहे. म्हणून जो जाणून बुजून तक्रार करेल आणि जो जाणुन बुजून नगरसेवकांला चोपून काढायच म्हणेल अशा अधिका-यावरती शंभर टक्के कारवाई झाली पाहीजे, अशा अधिका-याला सस्पेन्ड केल पाहीजे. मी निषेध करुन मागणी करतो की असल्या अधिका-यांना किंवा कर्मचा-याला सस्पेन्ड केल पाहीजे. उदया ज्यावेळेस आपल्यावरती बारी येईल त्यावेळेस त्यातल कोणी नसणार की यांना थांबवा म्हणून. तरी मी तीव्र शब्दात निषेध करतो आणि या कर्मचा-याची निलंबनाची मागणी करतो, धन्यवाद.

**मा.शत्रुघ्न उर्फ बापू काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. खरतर दत्ताकाकांच मनापासून अभिनंदन. त्यांनी चांगल्या विषयाला वाचा फोडली. मा.महापौर साहेब, आतापर्यंत महापालिकेमध्ये असे प्रकार होत नव्हते. तो प्रकार कसा घडला काय घडल्या याच्या पाठीमागे न जाता हा प्रकार घडलेला असताना महासंघाची मिटींग झाली, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबनराव झिंजूर्डे यांच जर भाषण पाहीलतर त्यांनी एकदम सुस्थितीत लोकशाहीचा गाढा कसा हाकायचा हे सांगण्याचा प्रयत्न ते करत होते. अशातच नगररचनेचा कर्मचारी त्यांनी माईक घेतला आणि तो जोश मध्ये बोलला का कसा बोलला माहित नाही. त्याची व्हीडीओ क्लिप आहे तो म्हणाला प्रत्येक नगरसेवकाला चोप दिला पाहीजे. खरतर काकानी सांगीतल आहे अशा अधिका-याच निलंबन झाल पाहीजे. त्याच्याही मागे परीवार

,

असेल आम्हांला वाटत नाही निलंबन व्हाव म्हणून तरी निलंबन न करता त्याला सभागृहात बोलवून असं का केल याचा खुलासा करायला लावावा आणि त्यांच्याकडून माफी मागायला लावावी यामुळे पुढे असे होणार नाही. राहूल कलाटेंचा जो प्रकार झाला तो प्रकार दोघानाचं माहिती आहे. हे पवीत्र अस सभागृह आहे पहीलीच अशी केस आहे की पोलीस स्टेशनमध्ये गेलेली आहे. उदया कुठल्याही नगरसेवकांचा वाद झालातर प्रत्येक वेळेस पोलीस स्टेशनमध्ये जाणार का. आयुक्त म्हणून त्यावर काही अंकुश आहे का नाही. या गोष्टी आयुक्तांपर्यंत गेल्या नाहीत का. संबंधित अधिका-याची मिटींग घेवून किंवा संबंधित नगरसेवकाला बोलवून आपल्याकडे पक्ष नेते आहेत, विरोधी पक्षनेते आहेत, गट नेते आहेत, महापौर आहेत. उदया सात हजार कामगार आणि १३३ नगरसेवक यांच्यामध्ये आपण लोकांच काम करताना कुठेना कुठेतरी वाद होणारच. अशावेळेस आपण काहीतरी निर्णय घेतला पाहीजे. वाद का होतात त्या मागचे कारण काय आहेत. नगरसेवकांच काम का होत नाही कोणी काही कोणाच्या घरच काम सांगत नाहीत. पंचवीस लाख लोकांसाठी आपण सभागृहात येतोत, सगळे नगरसेवक विश्वस्त म्हणून महापालिकेचे काम करतात. प्रत्येकजण आपल काम करत असताना आपल्या भागाची डेव्हलपमेंट, आपल्या नागरीकांच काम याच्यावर लक्ष देतो म्हणून अधिका-यांना ते बोलले असतील. प्रशासनाने काय कारवाई केली याच्यावरती. वैयक्तिक राहूल कलाटे यांचा तर वाद नाही. याच्या मागची कारणही शोधली पाहीजे. अशा गोष्टी परत झाल्या नाही पाहीजे. सभागृह चालवायच म्हणलतर पोलीसाना मध्ये घ्यावा लागेल आपल्याला. त्याच्यावर गुन्हा दाखल झाला का, त्या अधिका-याच काही झाल का, त्या नगरसेवकाच काही झाल का याच गोष्टी बघाव्या लागतील. काम वेळेत झाली पाहीजेत. नागरीक नगरसेवकांना विचारतात नगरसेवक अधिका-यांना विचारतात दोन चार वेळेस विचारल आणि काम झाल नाहीतर चिडून बोलल्या जात असे प्रकार झालेतर आपण पोलीस स्टेशनला नाही गेले पाहीजे. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब आपण यावर अंकुश ठेवावा. जो कोणी कर्मचारी नगरसेवकांना चोप देवू म्हणतो त्याला सभागृहासमोर बोलून खुलासा करावा व त्याला माफी मागायला सांगावी.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. याठिकाणी सर्वांनीच आपआपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. याच्या मुळाशी आपण गेलोतर हे का घडल. त्याठिकाणी इंगळे साहेब उपस्थित होते त्यांच्या समोर ही घटना घडली असं आम्ही सगळयांनी ऐकल. परंतु खरोखरच ते काम त्या अधिका-यानी मद्दामहून टाळल होतं का

,

आणि मुद्दामहून टाळल असेलतर का टाळल आणि त्यानंतर कुठलाही नगरसेवक असो किंवा समान्य कार्यकर्ता असो ज्यावेळेस त्याच काम होत नसतं तेव्हा त्याच्याकडन काहीतरी बोलल जातं. आयुक्त साहेब, याच्या खोलात तुम्ही गेलं पाहीजे. आता सगळयांनी हा विषय सांगीतला एवढे वर्षे काम करताना आपल्यालाही माहिती आहे की अनेकदा असे प्रकार घडतात की आपण सांगीतलेल एखाद काम अधिका-यांकडन होत नाही. त्याच्या मागची कारण आपणही समजून घेतली पाहीजेत. ब-याच ठिकाणी असंही घडत की काही अधिकारी मुद्दामहून काम करत नाहीत. अशाप्रकारे महापालिकेत अनेक लोक अशी काम करतात की ती कामात टाळाटाळ करतात. ते परसेन्टेज कदाचित कमी असेल परंतु याच्यात जर राऊत नावाची व्यक्ती चुकले नसतीलतर त्यांच्यावर अन्याय झाला नाही पाहीजे परंतु चुकल असतीलतर आयुक्त म्हणून त्यांना समज देण्याची गरज आहे. आज याठिकाणी आयुक्त साहेब पाहीजे होते. ही जी काही घटना घडली, पोलीस स्टेशन पर्यंत ही गोष्ट गेली. आपण या समाजात काम करतो तेव्हा एखादया ठिकाणी वाद होतो, कुटूंबात वाद होतो, मा.महापौर साहेब, आपल्याला अनेक वाद येतात तेव्हा आपण काय करतो पोलीस स्टेशनला न जाता आपल्यात तो मिटवण्याचा प्रयत्न करत असतो. आपल्याला जनतेनी निवडून दिलं आहे आपण त्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करतो आणि आपल्यावरतीच असा प्रसंग घडत असेलतर याचा अर्थ आपण कुठेतरी कमी पडतो. प्रशासन आणि आपण ही एका गाडीचे दोन चाक आहोत. आपण जर अशा पध्दतीने केल एक त्या बाजूला आणि एक या बाजूलातर मला वाटत नाही की येथून पुढच्या काळामध्ये आपल्याला चांगल काम करता येईल. जर येथून पुढे असे घडलतर एक वेगळया प्रकारे वळण लागेल. खर म्हणजे आयुक्त साहेबांनी किंवा सिटी ईंजिनीअरनी किंवा ईंगळे साहेबांनी त्या संदर्भात मिटींग घ्यायला पाहीजे होती. संबंधित वरीष्ठांच्या कानावर हा विषय घालायला पाहीजे होता. कर्मचारी महासंघाला पण याच्यामध्ये विश्वासात घ्यायला पाहीजे होते. हे सगळ करत असताना यातून खर-खोट आणि जो चुकला असेल त्याला समज दिली गेली पाहीजे हाती. राहूल कलाटे सारख्या एका जबाबदार नगरसेवकांवरती अशाप्रकारची कम्प्लेन्ट होती हा त्यांचाही याच्यात कुठेतरी कमीपणा आहे. आणि त्यानंतर जर कोणी अधिकारी, कर्मचारी अस स्टेटमेंट करत असतील की नगरसेवकांना चोपून काढल पाहीजे म्हणत असेलतर ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. त्यामुळे खरच असं घडल असेलतर संबंधित माणसाकडन खूलासा घेतला पाहीजे. आयुक्त साहेब, येथून पुढच्या काळामध्ये अशाजर घटना आपल्याला घडू दयायच्या नसतीलतर तुम्हाला तुमच्या एचओडीबरोबर मिटींग घ्यावी लागेल

,

आणि त्यांनी त्यांच्या खालच्या विभागाना सक्त ताकीद दिली पाहीजे. कुठलही काम आडवल नाही पाहीजे अणि जर आडवत असेलतर त्याच्या मागच खर कारण सांगीतल पाहीजे. जर चुकीच काम नगरसेवक सांगत असतीतर निश्चितपणे त्यानी वरिष्ठाना सांगीतल पाहीजे की संबंधित नगरसेवक आम्हांला चुकीच्या पध्दतीने काम सांगतो त्यामुळे मला हे करता येत नाही. परंतु योग्य काम असेल आणि ते वेळेत जर करत नसतीलतर त्या संबंधित कर्मचा-यांवरती कारवाई झाली पाहीजे. मा.महापौर साहेब, अशा पध्दतीची भूमिका घेतली गेली पाहीजे. येथून पुढच्या काळामध्ये असे अनेक प्रकार घडणार आहेत. अनेकांच्या बाबतीत असे प्रसंग घडले आहेत मला सुध्दा असे अनुभव आलेले आहेत की नगरसेवकांनी ही काम सांगून सुध्दा काही वेळेला काम लवकर झालेल नाही किंवा टाळाटाळ झालेली आहे. असे प्रत्येकाला अनुभव येत असतात. जर असं घडलतर पुढच्या काळामध्ये नगरसेवकांना काम करण अवघड जाईल. काही ठिकाणी चुकीच काम सांगीतल जात त्याठिकाणी त्या अधिका-याला काम करण अवघड जातं. त्यामुळे दोन्ही बाजू आपण तपासल्या पाहीजेत. कोणावरतीही अन्याय झाला नाही पाहीजे. मा.महापौर साहेब, अशा अनेक घटना घडलेल्या आहेत येथून मागच्या काळात महापालिकेमध्ये अधिका-यांचे हात-पाय काढायची पण भाषा झालेली आहे परंतु त्याही वेळेस अशा पध्दतीची भूमिका प्रशासनाने घेतली नाही, आयुक्तांनी त्याच्यामध्ये मध्यस्थी करुन विषय मिटवलेला आहे. त्याच्यामुळे मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब आणि पक्षनेते आणि विरोधी पक्षनेते सर्वानीच याच्यामध्ये लक्ष घातल पाहीजे. येथून पुढच्या काळामध्ये अशा घटना घडू नयेत आणि अगदी सामान्य माणसाने सांगीतलेल काम त्वरीत व्हाव अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. खरतर हे सभागृह बावीस लाख शहरातील नागरीकांच भविष्य घडविण्यासाठी या प्रक्रीयेत महत्वाच स्थान निभावत असतं. या नगरसेवकांच्या भविष्या विषयी आपणच ही चर्चा सभागृहामध्ये करत आहोत हे खर दुर्दैव आपल आहे. मी पंचवीस वर्षे या सभागृहामध्ये आहे पण इतक मोठ गुन्हा दाखल करण्यापर्यंत किंवा भाषाशैलीच ज्या पध्दतीच वातावरण आज त्या शैलीमुळ झालेल आहे ते आजपर्यंत असं कदाचित घडलेल नाही. वारंवार या सभागृहामध्ये कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असो सभागृहात प्रवेश केल्यानंतर आपण विश्वस्त म्हणून सर्व एकत्रितरीत्या असतो ही भावना ठेवून आजपर्यंत जे जे घडल त्या वेळेस मी या सभागृहामध्ये आवाज केलेला आहे. प्रश्न असा येतो की अनेक वर्षाच्या मोहानंतर आता हे

,

महानगरपालिकेच स्वरुप असं बदलत चालल की ही प्रायव्हेट लिमीटेड कंपनी झाली की काय असं मला समोर निदर्शनास येवू लागल आहे. ही महानगरपालिका काही टाटा-बिर्ला, अंबाणीची कंपनी नाही, महापालिका ही प्रायव्हेट लिमीटेड कंपनी नाही. हे नागरीकांच्या सोईसाठी जवळच माध्यम म्हणून महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे आणि त्याचे विश्वस्त म्हणून आम्ही काम करत असताना एक लक्षात आल की सातत्याने एखादया खुर्चीवर अनेक वर्षे एखादा अधिकारी बसल्यानंतर हाळूहाळू असं वाटत की मी नगरसेवकाच काम करत नाहीतर मी त्याच्यावर उपकार करतो या भावनेनी त्याची वृत्ती तयार झालेली असते. खरतर तुम्ही सर्व अधिकारी महीन्यातून एकदा किंवा सहा महीन्यातून एकदा इगतपुरीला जाऊन विपश्यनाला जाऊन बसत जा, आत्मचिंतन करत जा स्वत:. मी आजपर्यंत अधिका-याला शब्द काढलेला नाही. पण गेल्या दोन महीन्यामध्ये माझ्यासाठी सुध्दा अशीच सभा झाली असती या अवस्थेमध्ये मी गेलो होतो, म्हणजे चांगल्या अवस्थेमध्ये, पुष्पगुच्छ घेवून मी व्यवस्थीत गेलो होतो. आयुष्यभर फुल पडतील अशा पध्दतीने मी फुल घेवून गेलो होतो पण मला तो अधिकारी भेटला नाही. एवढी मस्ती कशाची, तुम्हांला मस्ती आलीतर आम्हांला थोडी जनतेच्यासाठी मस्ती येत असते. कारण कोणत्या वातावरणातून आम्ही ईथपर्यंत प्रवास केलेला असतो हे अधिका-यानी एकदा ग्रामपंचायतीची निवडणूक लढवून बघा म्हणजे कळेल तुम्हांला. नगरसेवकांचा तुम्ही अपमान करता, तुम्ही सगळे एकत्र येता आम्ही मात्र एकमेकांबद्दल बाहेरुन जरी बोलत असलोतरी आतून एक असतो. अधिकारी तुम्ही या शहराचे सर्व्हन्ट आहात तुम्ही त्याच पध्दतीचे काम करायच. आम्ही पगारावर नाहीतर मानधनावर आहोत. अधिका-यानी अधिका-याचा धर्म पाळलाच पाहीजे, उपकार करत नाहीत तुम्ही, तुम्ही त्याच पध्दतीने वागले पाहीजे कितीही सभा घ्या बाहेर काही फरक पडत नाही. आम्ही फार गरीब आहोत पण आमचे कार्यकर्ते गरीब नाहीतना. कार्यकर्त्याची काम घेवून तुमच्याकड येतो. तुम्हांला का म्हणून सर, प्लिज, सर, एक्सक्यूज मी म्हणायच, तरी हवेतच तो. मोठया माणसाच्या चार दोन टाळक्याना सांभाळायच म्हणजे आख्खे नगरसेवक सांभाळयागत झालं का. कोणत्या मस्तीत राहताय तुम्ही. घ्या माझ्या विरुध्द सभा काही फरक पडत नाही. मी पंचवीस वर्ष बांधकाम व्यावसायामध्ये आहे. पंचवीस वेळा पण बांधकाम परवानगी विभागात गेलो नाही. कोणत्याही अधिका-याला चुकीच काम सांगीतलेल नाही. एकदाच परवाच्या दिवशी गेलो होतो पण तो सापडला नाही. त्याच कारण चुकीला माफी नाही. आम्ही येथे आलोत ती जनतेच्या

,

कामासाठी आलेलो आहोत तुमच वर्चस्व स्विकारण्यासाठी आम्ही आलेलो नाहीत आणि आजिबात स्विकारणार नाहीत. तुमच्या तीन तीन वर्षानी बदल्या होतात आमची स्मशानभूमी ईथच आहे. आम्हांला ईथच उत्तर दयायची आहेत. सर्वनी नीट वागायच आम्हीही वेळेला कधीही एकत्र होवू शकतो, निवडणूकीत नाही, निवडणूकीत नाही पण वेळेला एकत्र होवू शकतो. त्याच कारण काय, काय यातना असतात ते त्यांना विचारा. अशी जाहीर भाषा कधीच झाली नाही, आमच्या सारख्या घाबरट माणसावर कशाला तुम्ही अन्याय करता. घराच्या बाहेर पडताना आम्हांला दोन माणस बाहेर पाठवावे लागतात कोण आल का बघरे बाहेर असं सांगाव लागत. इतक्या भयभीत वातावरणामध्ये आम्ही आहोत. या सगळया परिस्थितीच भान ठेवा, आयुक्त साहेब हे चालणार नाही. बावीस लाख लोकसंख्येच्या शहराच भविष्य आम्ही या सभागृहातून घडवितो. सर्वानी नीट वागायच. नगरसेवक पहील्यांदा निवडून आले का दुस-यादां निवडून आले हे आजीबात नाही त्या नगरसेवकांचे सन्माना बरोबर आदरानेच काम झाले पाहीजेत. उपकार करत नाहीत त्याची फि घेता, पगार घेता. म्हणून महापौर साहेब, लेचपेच राहू नका गाजवा तुमच काहीतरी. पाच-पाच सात-सात वर्षे एका खुर्चीवर बसतात एमटेक झालेल्या माणसाला विचारतात तुला आक्कल आहे का, कोणत मुल्यमापन करतात. काही शैक्षणीक अर्हता आहे का नाही. मस्तीमध्ये राहू नका. आम्ही माफ करु आम्ही सीसी कॅमेरामध्ये असतो, जनता सीसी कॅमेरामध्ये नाही. नगरसेवकांना या पध्दतीने बोलतात त्याच कारण काय चोप हा प्रकार आजपर्यंत कोणीही बोलले नाही. आम्ही पण रागावलोत काही अधिका-यांवर ईथ सभागृहात वाभाडे काढलेत पण अस नाही म्हणलो याला मारु, त्याला मारु. श्रीखंड पुरी आहे का वडापाव आहे कोणीपण कोणाला मारायला निघाले लगेच. आम्ही संघटीत नाहीत म्हणून आमच्या बद्दल बोलतात, तुम्ही संघटीत आहेत म्हणून तुम्ही बोलता का. आम्ही पण संघटीत होवू. अनेक नगरसेक्कांना कळत असेल की अधिकारी तुमच्या बरोबर कसे वागतात. काही जण त्यांचे राजकीय पण वरदहस्त असतात. भाऊसाहेब ऐकत नाहीतर मग फोन करायला लावायचा मग तो ऐकतो. अरे, पण त्याला जनतेला उत्तर दयायच आहेनां. असे काही अधिकारी मस्तीत असतीलतर डोक्यातून हावा काढा. कारण सगळेच सगळयांच ऐकतात असं नाही, मी तर अजीबात नाही. त्यामुळे माझा जो अनुभव येईल तो या सभागृहात व्यक्त करेल परंतु तो माझ्या सुसंस्कृत भाषेत. सुसंस्कृत भाषा मी टिकून ठेवलेली आहे. मा.महापौर साहेब, आदेश दया, तुम्ही गुन्हा दाखल करत असताना आयुक्तांची परवानगी घेतली होती का. सभागृहाच्या या प्रिमायसेसमध्ये

,

महानगरपालिकेच्या अंतर्गत कोणताही गुन्हा दाखल होत असताना आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते आणि मंग तो गुन्हा दाखल करावा लागतो. ती परवानगी घेतली का त्याचा पण खुलासा या ठिकाणी झाला पाहीजे. नाहीतर आतून एक वेगळ करायच बाहेरुन एक वेगळ करायच आमच्या समोर चित्र वेगळ करायच हे अजीबात चालणार नाही. सर्व नगरसेवकांनी ही गांभीर्याने गोष्ट घ्यावी. वेळ प्रत्येकावर येणार आहे. प्रत्येक अनुभवातून तुम्ही अजून प्रगल्भ होत जाताल त्यावर सांगाल तुम्ही मी मागे शांत बसलो त्याच प्रायश्चित आज भोगतोय, किंवा आज मी भोगतो आहे. हे गांभीर्याने घ्याव, कोणीही हे विनोदात्मक घेवू नका. याठिकाणी फार त्यांच कौतूक करण्यात काही मजा नाही. आपल्यासंग जो चांगला तो चांगला. आपल्यासंग जो वाईट कारण आपण जनतेतून आलेलो आहोत बावीस लाख जनतेला उत्तर दयायच आहे. ही महापालिका हाळू हाळू प्रायव्हेट लिमिटेड होवू पाहते आहे त्याला कुठेतरी आळा घाला. प्रशासनाने कोणी समजायच कारण नाही मला अधिकारी म्हणून त्या खुर्चीवर कोणी बसवलय, माझा कोण वरदहस्त आहे. कोणीच माफ करणार नाही. अधिकारी तुम्ही शहराचे आहेत, कोणाच्याही वशील्यान या ईथ. पण काम करत असताना नगरसेवकांचा आदर ठेवलाच पाहीजे अशी भावना याठिकाणी व्यक्त करतो.

**मा.नितीन (अप्पा) काळजे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. तस पाहीलतर महापालिकेत काम करत असताना नगरसेवक आणि प्रशासन हे रथाचे दोन चाक आहेत आणि ती एकत्रीतरीत्या नाही चाललीतर आपण जनतेच काम करु शकणार नाहीत. हे काम करत असताना आमचे सहकारी मित्र राहूल कलाटे यांच्यावरती गुन्हा दाखल झाला. सगळयानीच सांगीतल तस आयुक्तांची सुध्दा परवानगी घेणे आवश्यक होतं. त्यांच्या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या अध्यक्षाकड हा झालेला प्रकार सांगायला हवा होता परंतु तसे न होता तो गुन्हा दाखल केला. अधिकारी असेल, पदाधिकारी असेल जनतेच काम करत असताना त्यावेळेस असे प्रसंग येतात की पदाधिका-यांकडून सांगीतलेल काम अधिका-यांकडून लवकर होत नाही. त्या माध्यमातून त्यावेळेस अधिकारी असेल, नगरसेवक असेल थोडी शाब्दीक बाचाबाची सुध्दा होत असते. परंतु हा प्रकार झाला असेल, त्यांच्या हातून जर असं काही घडल असेलतर व गुन्हा दाखल केलातर आम्ही पण काही म्हणणार नाहीत. पण त्याची पुर्ण चौकशी व्हायला पाहीजे होती. आयुक्तांनी त्याची चौकशी लावून त्याची शहानिशा करायला हवी होती. परंतु तो डायरेक्ट गुन्हा दाखल केला. प्रभागामध्ये चार नगरसेवक काम करत असतात, अधिकारी सुध्दा असे सांगतात की आम्हांला या नगरसेवकांनी सांगीतल

,

म्हणून त्या नगरसेवकाच ऐकल. दोन्ही नगरसेवकाच चांगल असत त्यावेळेस अधिकारी त्यांचा दोघाचाही फायदा घेवून वेगळ काम केल जातं. त्यामुळेही कधीकधी असे प्रकार घडतात. नासमंजस्य पणाने पण कधी कधी प्रकार घडतात. त्यावेळेस अधिकारी असो किंवा पदाधिकारी असो त्या दोघांनीही सामंजस्यपणा घेतला गेला पाहीजे. ज्यावेळेस हा सर्व प्रकार घडला त्यानंतर महापालिकेच्या गेटवरती सर्व संघटनेनी त्यांच्या अधिका-यांनी नगरसेवकांचा निषेध केला. राहूल कलाटेनी हा गुन्हा केलेला तो तर काही सिध्द झालेलाच नव्हता. तुम्ही राहूल कलाटेशी जरी बोलल असतंतर चाललं असतं. परंतु या शहरातील बावीस लाख लोकसंख्येनी ईथ १२८ नगरसेवक पाठविलेले आहेत त्यावेळेस तुम्ही बोलाताना थोडाफार विचार करायला पाहीजे होता. बोलताना तुम्ही म्हणाले की या सर्व नगरसेवकांना चोपून काढल पाहीजे. हे काही लोकशाहीला पण धरुन नाही आणि कुठल्याच नियमाला पण धरुन नाही, असे मला वाटते. निश्चित जो बोलला त्याच्यावर कारवाई झालीच पाहीजे. परंतु मा.महापौर साहेब, त्याचाही प्रपंच असेल पुर्ण एकदम कारवाई करावी अशी आमची मागणी नाही, त्यांना सभागृहासमोर बोलून झालेल्या प्रकाराबद्दल जर त्यांनी दिलगीरी व्यक्त केलीतर हे योग्य ठरेल. कारण जर आपण त्याच्यावरती गुन्हा दाखल करायचा म्हणलतर आपल्यात आणि त्याच्यात काय फरक झाला. म्हणून एवढा कडक निर्णय न घेता त्यांनी ही माहिती आपल्या सभागृहासमोर दयावी आणि आपल्याला विनंती करतो की त्यांना एक संधी देवून आपण हा विषय संपवावा.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. खरतर दोन तास आपण या विषयावर चर्चा करतो आहोत. खरतर मी एक कामगार नेता आहे आणि कामगारांवर झालेला अन्याय मलाही माहित आहे. भाऊसाहेब तुम्ही ज्या पध्दतीने सांगत होते, राहूल कलाटेंच्या संदर्भातील घटना आहे या घटनेच्या निमीत्ताने मा.महापौर साहेब आपल्याला मी विनंती करतो लोकप्रतिनिधी ज्यावेळेस निवडून येतो त्यावेळेस लोकप्रतिनिधीची पण दोन प्रकारची जबाबदारी आहे. आपण खरेतर लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी या सभागृहात येतो या महापालिकेमध्ये येतो. ही घटना खरी आहे खोटी आहे कशी घडली या संदर्भामध्ये मा.आयुक्तांनी सखोल चौकशी केली पाहीजे. पण ज्यावेळेस सभागृहामध्ये एखादया विषयावरुन मला माहिती आहे की ज्यावेळेस द्वार सभा झाली आणि एखादा कर्मचारी नगरसेवकांना चोपण्याची भाषा करतो, ही पध्दत अत्यंत चुकीची आहे. भाऊसाहेब मी तुमच्या मताशी शंभर टक्के सहमत आहे. काही काही अधिका-यांना अशा पध्दतीची गुरमी आणि

,

मस्ती शंभर टक्के आहे. मला अनेक नगरसेवक सांगतात की दादा आम्ही यांच्याकडे तीनवेळा गेलो, चारवेळा गेलो आमच म्हणण सुध्दा ऐकूण घेत नाहीत. ते ठरावीक पाच दहा जणांचे म्हणण ऐकूण घेत असतील. नगरसेवक आपल्या प्रभागाचा प्रॉब्लेम त्यांना जर सांगतोय. मी खरतर या सभागृहाच्या माध्यमातून एवढच सांगेल की अधिका-यांनी सुध्दा आपल्या जबाबदारीच भान ठेवल पाहीजे. या संदर्भात चौकशी निश्चितच झाली पाहीजे. एखादयावर अन्याय झाला मग तो कर्मचारी असेल किंवा नगरसेवक असेल त्याच्या पाठीशी आपल्याला उभ राहण आवश्यक आहे. माझी या निमीत्तान सगळया अधिका-यांना विनंती आहे, मा.महापौर साहेब एखादा विषय मनात आणतात आणि सांगतात की दादा हा नीट अधिकारी ऐकत नाही, ही परिस्थिती आहे. तेव्हा अधिका-यांना माझी एक विनंती आहे. या महापालिकेमध्ये आपण नोकरी करतो. सभागृहामध्ये एवढे नगरसेवक आहेत त्यांच्याही भावनेचा कधी कधी विचार केला पाहीजे. त्यांच म्हणण काय आहे, आपण त्यांच म्हणण डावलायच आणि मी माझ्याच पध्दतीने करेल अशा पध्दतीच्या उर्मीमध्ये अविर्भावामध्ये खरतर कोणीही राहण्याची गरज नाही. एखादा नगरसेवक, एखादा टोकाचा निर्णय घेतो तो का घेतो याच्याही दृष्टिने विचार करण्याची गरज आहे. खरतर सगळयांना बोलायच होत, मा.मंगलाताई तुम्हांलाही बोलायच होत पण माझी एवढीच या निमीत्तान मा.महापौर साहेब आपणाला विनंती आहे की त्यादिवशी ती घटना घडली खरतर लाईव्ह चॅनेल खुप आहेत त्यावर मी बघीतल एक कर्मचारी, निश्चितच त्याच्या भावना असतील, पाणीपुरवठयाच्या संदर्भातला अधिकारी असेल, आरोग्याच्या संदर्भामधला अधिकारी असेल, स्थापत्याच्या संदर्भामधला अधिकारी असेल यांच्या बद्दलची एक परिस्थिती शंभर टक्के असू शकते की मी सांगीतलेला कचरा साफ करु शकले नाही. पाणीपुरवठया संदर्भामध्ये एखादया पाण्याची लाईन तुटली किंवा पन्नास-शंभर लोक फोन करतात. लोक अधिका-यानां कमी बोलतात नगरसेवकांना खुप वाईट भाषेत बोलतात. आपण त्यांच्या मतामुळे आज या महापालिकेमध्ये आहेत. मा.महापौर आणि मा.आयुक्तांना माझी विनंती आहे की अधिका-यांना सुध्दा आपण जबाबदारीची जाणीव दिली पाहीजे. पुढच्यावेळेस ते अशाप्रकारची अरेरावी, अशाप्रकारच वक्तव्य स्टेजवर करणार नाहीत. मीही कामगार नेता आहे मलाही माहिती आहे युनियन चालविली पाहीजे. खरतर बबनराव झिंजूर्डेना मी दुस-या दिवशी सांगीतल की बबनराव खरतर आम्ही तुमच्या सगळयांच्या बरोबर निश्चितच ताकदीन उभा आहोत. पण एखादा कर्मचारी जर चुकीच्या पध्दतीने वागत असेल, नगरसेवकाना जर चोपण्याची भाषा करत असेलतर त्यान

,

माफी मागण्यान आमच खरतर समाधान नाही होणार. या सभागृहात त्यांने माफी मागीतली पाहीजे, त्याला निलंबीत केल पाहीजे अशीही आमची भावना नाही. पण कामगार नेत्यांनी अपल्या प्रतिनीधीला एक सांगण्याची गरज आहे बाबारे, तुझ्या एखादया वक्तव्यामुळे एखादया संघटनेला मान खाली घालावी लागते हे त्यांनी सांगण्याची गरज आहे. आपण त्याला निलंबन करन, त्यानी माफी मागण हे आपल्या सगळयाला अपेक्षीत नाही. हा सभागृहाचा वेळ एखादया कर्मचा-यासाठी एवढा मोठा नाही की त्याच्यावर दोन दोन तास चर्चा झाली पाहीजे. पण माझी दुसरी एक सगळया नगरसेवकांना विनंती आहे की एखादया विशिष्ठ लिमीटपर्यंत, खरतर नगरसेवकांनी सुचना केली याठिकाणी महापौर आहेत, सगळया पक्षाचे गटनेते आहेत. आमदार असतील, खासदार असतील एखादा अधिकारी जर नीट ऐकत नसेलतर त्याच्याबद्दलच काय करायच हे आपण सगळेजण ठरवत जाऊ. आपल्याला माहिती आहे की उत्तम हिरवेच उदाहरण डोळया समोर आहे. टोकाला जावुन आपण एखादी घटना करतो त्याचे परिणाम हे उत्तम हिरवे आहेत. माझी सगळयांना विनंती आहे की ठिक आहे एखादया विषयावर आपण बोलण हे शंभर टक्के बरोबर आहे आपण लोकांच्या प्रश्नासाठी या महापालिकेच्या सभागृहात येतो. प्रश्न नाही सुटलातर त्या लोकांना आपल्याला उत्तर दयायच आहे. परंतु एखादया अधिका-याकड आपण कशा पध्दतीने गेल पाहीजे म्हणजे राहूल कलाटेंच्या संदर्भामध्ये किंवा अनिल राऊतच्या संदर्भामध्ये घटना असेलतर आयुक्त साहेबांना विनंती आहे की त्यामध्ये कोणावरही अन्याय झाला नाही पाहीजे. परंतु जे कर्मचारी या महानगरीमध्ये एखादया ठिकाणी वादग्रस्त वक्तव्य करतात हे योग्य नाही. माझी सगळया अधिका-यांना विनंती आहे की माझ्यातला ॲग्रीसिव्ह हा काय आहे हे खरतर सगळयांना माहीती आहे. एखादया पदाधिका-याला, नगरसेवकाला एखादा अधिकारी जर जुमानत नसेल तर त्याच्यावर कारवाई करावी लागेल. मा.महापौर साहेब, मी विनंती करतो की अशा चुकीच्या पध्दतीने ज्यांन स्टेटमेंट केल आहे, खरतर त्यास निलंबन करण्यामध्ये आमचा खुप मोठेपणा आहे अशी परिस्थिती नाही त्यानी माफी मागावी एवढया कमी मनाचे आम्ही नाहीत. पण अशा पध्दतीच्या कर्मचा-याला चांगल्या पध्दतीची समज दिली पाहीजे, की बाबारे यापुढच्या काळामध्ये आपण एका जबाबदार संघटनेच काम करतो, या जबाबदार महापालिकेमध्ये काम करतो आपल्या वक्तव्यामुळे सभागृहाचा दोन-दोन, तीन-तीन तासाचा वेळ आपण वाया घालवतो अशाप्रकारच वर्तन यापुढच्या काळामध्ये कुठल्याही कर्मचा-यांकडून होणार नाही याची जाण त्या कर्मचा-याला दयावी. मा.महापौर साहेब, विनंती करतो या

,

विषयाला अनेक नगरसेवकांनी वाचा फोडल्या, कमी जास्त प्रमाणात सगळयांच्या भावना सारख्या असतील परंतु या भावनेला आपण कुठेतरी ट्रिट करुन देण्याच काम केल. मा.महापौर साहेब, विनंती करतो की या विषयाची चर्चा आपण थांबवून पुढच्या विषयाला सुरुवात करावी एवढी विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.महापौर-** उपस्थित सर्व सभागृह. सर्व सभागृहातील नगरसेवकांनी आपआपल्या भावना मांडलेल्या आहेत. जो विषय शिवसेनेचे गटनेते राहूल कलाटे यांच्या बरोबर त्या अधिका-यांचा झाला त्यानंतर कर्मचारी महासंघाने मिटींग घेवून त्याठिकाणी काही चुकीचे आरोप केले आणि काही नगरसेवकांबद्दल विचीत्र शब्द त्याठिकाणी वापरले. मी आयुक्तांना सुचना करतो की त्याठिकाणी आतापर्यंत जे झाल ते झालं. परंतु कर्मचा-यांनी आपली पात्रता न सोडता आपली जबाबदारी ओळखून जर काम केलंतर ही वेळ येणार नाही. त्यामुळे आपण आपल्या पध्दतीन मर्यादीत राहून या पिंपरी चिंचवड शहराचा व्यवस्थितपणे विकास करुन, या नगरसेवकांना बावीस लाख लोकांनी या सभागृहामध्ये पाठवलेलं आहे. या पवित्र सभागृहामध्ये काम करत असताना अन्य जनतेचही आम्हांला खुप काही ऐकूण घ्याव लागतं. त्यामुळे संबंधित जे अधिकारी आहेत त्यांना व्यवस्थित सुचना देवून व्यवस्थित त्यांनी त्यांच्या जबाबदारीने भविष्यामध्ये काम कराव.

**मा.माधवी राजापूरे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक- ३८१ | विषय क्रमांक -९ |
| दिनांक – २२/२/२०१९ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.विलास मडिगेरी, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४३२७
दि.५/०२/२०१९

केंद्र शासनाच्या धर्तीवर व राज्य वेतन सुधारणा समितीचे शिफारशींचे आधारे राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार राज्य शासनाने शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र./सेवा ९ दि.३० जानेवारी २०१९ अन्वये सुधारित वेतनसंरचना लागू केली आहे. तसेच शासन निर्णय क्र.सनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४ दि. २४

,

जानेवारी २०१९ अन्वये सेवानिवृत्त झालेल्या निवृत्त वेतन धारकांच्या व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांच्या वेतनात ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारणा करण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचा-यांनाही राज्य शासकिय कर्मचा-यांप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचना/वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेतील वरीष्ठ अधिका-यांची वेतन पुनर्रचना समिती गठीत करणेत आली आहे. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे मागणीनुसार व महापालिका वेतन पुर्नरचना समितीचे शिफारशींचे अहवालाधिन महापालिका आस्थापनेवरील पात्र कर्मचा-यांना तसेच प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना महापालिकेने ६ व्या वेतन आयोगानुसार लागू केलेली वेतनश्रेणी विचारात घेऊन सदर पदांना शासनाकडील ७ व्या वेतन आयोगानुसार समकक्ष सुधारीत वेतनश्रेणी / वेतनसंरचना लागू करणे, सुधारित आश्वासित प्रगती योजनेनुसार ३ लाभांची वेतन संरचना लागू करणे, मनपाने महागाई भत्याबाबत केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे लागू केलेले धोरण यापुढेही कायम ठेवणे, घरभाडे भत्ता, पुरक भत्ता, वाहतुक भत्ता, रोखरक्कम हाताळण्याचा भत्ता, एन.पी.ए. व इतर राज्यशासनाचे धोरणानुसार लागू असलेने राज्यशासन वेळोवेळी सुधारणा करेल त्याप्रमाणे लागू करणे, मनपा कर्मचा-यांना विद्यमान लागू असलेले भत्ते उदा. वाहन भत्ता, धोका भत्ता, धुलाई भत्ता, वैद्यकीय भत्ता, व इतर भत्ते एल.एस.जी.डी, एल.जी.एस. इ. वेतनवाढीबाबतचे धोरण यापुढेही कायम ठेवणे, ७ व्या वेतन आयोगानुसार फरकापोटी देय रक्कम शासकीय कर्मचा-यांप्रमाणे पाच समान हस्यात तथापि मनपाचा भविष्य निर्वाह निधी स्वतंत्रपणे असल्याने बँकांकडून मिळणारे व्याज व मनपा कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधी खात्यावर द्यावे लागणारे व्याज विचारात घेऊन भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे / रोखीने देणे याबाबत वेतन पुर्नरचना समितीचे शिफारशीनुसार कार्यवाही करणे, तसेच या संदर्भात काही त्रुटी व सुधारणा असल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देणे इ.बाबींना मान्यता देणेस व त्यापोटी येणा-या खर्चास धोरणात्मक बाब म्हणून मान्यता देणेत येत आहे. तसेच १.राज्य शासकीय कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून लागु करण्यात आलेला आहे व प्रत्यक्ष लाभ दिनांक ०१ जोनवारी, २०१९ पासुन मंजुर करण्यात आलेला आहे. तरी मनपा कर्मचा-यांना सदरचा सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणीचा प्रत्यक्ष लाभ माहे एप्रिल-२०१९ पेड इन मे-२०१९ पासुन लागू करणेस राज्य शासनाच्या उमेदमान्यतेवर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सेवानिवृत्त

,

वेतन धारकांना माहे एप्रिल-२०१९ पेड इन मे-२०१९ प्रत्यक्ष लाभ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

२. मनपातील खालील पदांच्या वेतनश्रेणींमध्ये त्रुटी आहेत. त्यांचे वेतनश्रेणीत खालीलप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी व ग्रेड पे | सहाव्या वेतन आयोगानुसार आवश्यक वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | फायरमन | ५२००-२०२००, ग्रेड पे - १९०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० |
| २ | लिडींग फायरमन | ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - २८०० |
| ३ | भांडारपाल | ९३००-३४८००, ग्रेड पे - ४२०० | ९३००-३४८००, ग्रेड पे - ४३०० |
| ४ | भांडार अधिकारी | ९३००-३४८००, ग्रेड पे - ४४०० | ९३००-३४८००, ग्रेड पे - ५४०० |
| ५ | माळी | ५२००-२०२००, ग्रेड पे - १९०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० |
| ६ | एम. पी. डब्ल्यु | ५२००-२०२००, ग्रेड पे - २८०० | ५२००-२०२००, ग्रेड पे - ४३०० |

तसेच मनपाने मा. महापालिका सभेच्या मंजुरीने काही पदांसंदर्भात सहाव्या वेतन आयोगातील त्रुटींबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविला असून सदर पदांना सातवा वेतन आयोग लागु करताना सदर पदांबाबत राज्य शासनाकडे पाठविलेल्या प्रपत्र - ब मध्ये नमुद केलेप्रमाणे वेतनश्रेणी गृहित धरुन सातवा वेतन आयोग लागु करणेस मान्यता देणेत येत आहे व महानगरपालिकेने काही नविन पदांची निर्मिती केली असून सदर पद निर्मितीचा प्रस्ताव शासन मंजुरीसाठी प्रलंबित आहे. या पदांना देखील सातवा वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागु करणेस मान्यता देणेत येत आहे.

३. राज्य शासनाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी नवीन अंशदान पेन्शन योजना लागु केली असुन त्याच धर्तीवर, मनपा कर्मचा-यांना अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु करण्यात आलेली आहे. तथापि मनपा

,

कर्मचारी महासंघाचे मागणीनुसार सदर अंशदान निवृत्तीवेतन योजनेऐवजी महानगरपालिकेतील सर्व कर्मचा-यांना दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पुर्वीची सेवानिवृत्ती वेतन योजना लागु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -१०

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.संगिता ताम्हाणे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.७८, दि.१८/०१/२०१९

मौजे पिंपळे निलख प्र.क्र.२६ मधील महादेव मंदिर ते बाणेर पुलापर्यंतचा रस्ता डांबरीकरणाने विकसीत करणेसाठी कामाचे आदेश दि.०६/०२/२०१८ रोजी देणेत आलेले असून काम चालू आहे. सदर कामात पिंपळे निलख मधील महादेव मंदिर ते बाणेर पुलापर्यंतचा रस्ता(७०० मी.) व पिंपळे निलख स्मशानभूमी ते STP प्लांन्ट पर्यंतचा (५५० मी.) रस्ता विकसीत करणेचा अर्त:भाव करण्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्यावर वाहतूकीची वर्दळ मोठया प्रमाणात असते तसेच स्मार्ट सिटी अन्वये भविष्यातील वाहतूकीचा विचार करता सदरचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. सदर रस्ता डांबरीकरणाने विकसीत करणेच्या कामाची निविदा र.रु.७,४४,२९,०६१/-(अक्षरी र.रु.सात कोटी चव्वेचाळीस लाख एकोणतीस हजार एकसष्ठ फक्त) इतकी आहे. त्या अनुषंगाने वरील कामांर्तगत अं.५०० मी.लांबीच्या रस्त्याचे कॉंक्रीटकरण करणे शक्य होणार आहे. तरी प्रभाग क्रमांक २६ मधील ताब्यात आलेले डी.पी.रस्ते विकसीत करणेच्या कामातून डांबरीकरणाच्या कामाऐवजी कॉंक्रीटीकरणाने रस्ता विकसीत करणेच्या फेर बदलास मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- १) प्रभाग क्र. ७ च-होली, दत्तनगर (काळीभिंत रस्ता) विकास आराखडयातील रस्ता १८ मी. विकसीत करणे.

,

(निविदा क्र. ५२/२-०१७/१८) या कामाचा मुळ अलाईमेंट मध्ये अशंतः बदल करुन सदरचा १८ मी. रस्ता पुणे-आळंदीकडे करणेऐवजी वडमुखवाडी सर्व्हे क्र. १९६ ते १४८ कडे करणेस मान्यता देणेत यावी. २) प्रभाग क्र. ६ डुडूळगाव येथील १८ व २४ मी. विकास आराखडयातील मोशी आळंदी रस्ता ते माऊलीनगर ते पुणे आळंदी रस्ता विकसित करणे (निविदा क्र. ६६/६-२०१८/१९) या कामाचा मुळ अलाईमेंट मध्ये वन विभागाची जागा ताब्यात येण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर ठिकाणचा रस्त्याऐवजी चोविसावाडी सर्व्हे क्र. ३९ ते ४३ पर्यंतचा १८ मी. रस्ता करणेस मान्यता देणेत यावी. ३) प्रभाग क्र.७ च-होली बुर्डेवस्ती मुख्य रस्ता ते सर्व्हे नं. ८७ येथील विकास आराखडयातील १८ मी. रस्ता विकसीत करणे – (निविदा क्र. ५२/३-२०१७-१८) या कामास अंतर्भुत रस्ताचा काही भाग कलम ३७ अन्वये मान्यता घेणेकरीता प्रस्तावीत असल्याने सदर कामाऐवजी सदरचा कामातून सदर ठिकाणी जलनिःसारण, फुटपाथ, डिव्हायडर इ. कामे करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी. तसेच जुना प्रभाग क्र.३२ सँण्डविक कॉलनी येथे भोसरी दिघी शिवेवरील रस्ता विकसित करणेसाठी निविदा नोटीस क्र.३०/१८-२०१७/१८ करणेत आलेली आहे. तथापि या रस्त्याची काही भागातील जागा मनपाच्या ताब्यात नाही. यासाठी प्रभाग क्र. ५ गवळीनगर व  सँण्डविक कॉलनी मधील ओमसाई पार्क व इत्यादी ठिकाणचे रस्त्याने जाणारे जवळपास २००० हजार लोकांची लोक वस्ती आहे. सदर नागरिकांना जाणेकरीता डांबरी रस्ता नसल्याने, रस्ता करणेबाबत तेथील मा. नगरसदस्य व नागरीक वारंवार मागणी करीत आहेत. सदर रस्त्याची जागा नुकतीच मनपाच्या ताब्यात आली आहे. तथापि सदर रस्त्याचा समावेश अंदाजपत्रकात नाही. अंदाजपत्रकात कामाचा समावेश करुन प्रस्तुत काम करणेस बराच कालावधी लागू शकतो, त्यामुळे सदर निविदा नोटीसीच्या कामातून ओमसाई पार्क व इत्यादी ठिकाणचे डि.पी. ९.०० मी व १२.०० मी रुंद रस्ता करणेचा प्रस्तावास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. २६ येथील महादेव मंदिर ते बाणेर पुल तसेच त्याला लागुन पिंपळे निलख स्मशान भूमीपर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणेकरीता विद्युत विषयक कामे करणेकरीता मनपा विद्युत विभागाने निविदा मागविण्यात येऊन कामाचे आदेश दिलेले आहेत परंतु या रस्त्याचे मुळ डिझाईन बदलुन स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने या रस्त्याचे डिझाईन करणेत येत असल्यामुळे या रस्त्या दिवाबत्ती व्यवस्था करणेकरीताचे कामातही बदल करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे या रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्था करणेकरीताचे कामातही होणारे बदलांनुसार या कामास अंदाजे

,

र.रु. १ कोटी इतका खर्च अपेक्षीत असल्याने, प्रभाग क्र. २६ येथील महादेव मंदिर ते बाणेर पुल तसेच त्याला लागुन पिंपळे निलख स्मशान भुमीपर्यंतचा १८ मी. डी.पी रस्ता विकसीत करणेकरीता विद्युतविषयक कामे करणेकरीताचे सुधारीत खर्च र.रु. १ कोटी यांस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच सदर रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्था स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ३१ पिंपळे गुरव येथील आ. क्र. ३४४ खेळाचे मैदान या कामाचे निविदा काढुन काम सुरु करण्यात आले होते. सदर आरक्षणाचा विकास स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत विकसित करावयाचा असल्याचे निश्चित झाले असुन स्मार्ट सिटी प्रकल्प विभागाकडुन सदर ठिकाणी चालु असणारे काम बंद करण्याबाबतचे दि.२९/०१/२०१९ जा.क्र. स्मा.सि.लि./स्था/१०/२०१९ नुसार सुचना दिल्या आहेत. तरी या ठिकाणी सदरचे काम करणे उचित होणार नाही. परंतु प्रभाग क्र. ३१ मध्ये अशा कामाची आवश्यक्ता असुन प्रभागातील विविध ठिकाणी कामे करणे आवश्यक असल्याने सदर निविदेतील उर्वरीत काम मा. नगरसदस्य यांचे मार्फत सुचविण्यात येणाऱ्या ठिकाणी आवश्यक्तेनुसार निविदा नोटीस ७४/६/२०१६-१७ चे काम प्रभागां अंतर्गत आवश्यक कामे करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपूसचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३८२ विषय क्रमांक -१०

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.संगिता ताम्हाणे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.७८, दि.१८/०१/२०१९

मौजे पिंपळे निलख प्र.क्र.२६ मधील महादेव मंदिर ते बाणेर पुलापर्यंतचा रस्ता डांबरीकरणाने विकसीत करणेसाठी कामाचे आदेश दि.०६/०२/२०१८ रोजी देणेत आलेले असून काम चालू आहे. सदर कामात पिंपळे निलख मधील महादेव मंदिर ते बाणेर पुलापर्यंतचा रस्ता(७०० मी.) व पिंपळे निलख स्मशानभूमी ते STP प्लांन्ट पर्यंतचा (५५० मी.) रस्ता विकसीत करणेचा अर्त:भाव करण्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्यावर वाहतूकीची वर्दळ

,

मोठया प्रमाणात असते तसेच स्मार्ट सिटी अन्वये भविष्यातील वाहतूकीचा विचार करता सदरचा रस्ता कॉँक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. सदर रस्ता डांबरीकरणाने विकसीत करणेच्या कामाची निविदा र.रु.७,४४,२९,०६१/-(अक्षरी र.रु.सात कोटी चव्वेचाळीस लाख एकोणतीस हजार एकसष्ठ फक्त) इतकी आहे. त्या अनुषंगाने वरील कामांर्तगत अं.५०० मी.लांबीच्या रस्त्याचे कॉँक्रीटकरण करणे शक्य होणार आहे. तरी प्रभाग क्रमांक २६ मधील ताब्यात आलेले डी.पी.रस्ते विकसीत करणेच्या कामातून डांबरीकरणाच्या कामाऐवजी कॉँक्रीटीकरणाने रस्ता विकसीत करणेच्या फेर बदलास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) प्रभाग क्र. ७ च-होली, दत्तनगर (काळीभिंत रस्ता) विकास आराखडयातील रस्ता १८ मी. विकसीत करणे. (निविदा क्र. ५२/२-०१७/१८) या कामाचा मुळ अलाईमेंट मध्ये अशंतः बदल करुन सदरचा १८ मी. रस्ता पुणे-आळंदीकडे करणेऐवजी वडमुखवाडी सर्व्हे क्र. १९६ ते १४८ कडे करणेस मान्यता देणेत येत आहे. २) प्रभाग क्र. ६ डुडूळगाव येथील १८ व २४ मी. विकास आराखडयातील मोशी आळंदी रस्ता ते माऊलीनगर ते पुणे आळंदी रस्ता विकसित करणे (निविदा क्र. ६६/६-२०१८/१९) या कामाचा मुळ अलाईमेंट मध्ये वन विभागाची जागा ताब्यात येण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर ठिकाणचा रस्त्याऐवजी चोविसावाडी सर्व्हे क्र. ३९ ते ४३ पर्यंतचा १८ मी. रस्ता करणेस मान्यता देणेत येत आहे. ३) प्रभाग क्र.७ च-होली बुर्डेवस्ती मुख्य रस्ता ते सर्व्हे नं. ८७ येथील विकास आराखडयातील १८ मी. रस्ता विकसीत करणे – (निविदा क्र. ५२/३-२०१७-१८) या कामास अंतर्भुत रस्ताचा काही भाग कलम ३७ अन्वये मान्यता घेणेकरीता प्रस्तावीत असल्याने सदर कामाऐवजी सदरचा कामातून सदर ठिकाणी जलनिःसारण, फुटपाथ, डिव्हायडर इ. कामे करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच जुना प्रभाग क्र.३२ सँण्डविक कॉलनी येथे भोसरी दिघी शिवेवरील रस्ता विकसित करणेसाठी निविदा नोटीस क्र.३०/१८-२०१७/१८ करणेत आलेली आहे. तथापि या रस्त्याची काही भागातील जागा मनपाच्या ताब्यात नाही. यासाठी प्रभाग क्र. ५ गवळीनगर व सँण्डविक कॉलनी मधील ओमसाई पार्क व इत्यादी ठिकाणचे रस्त्याने जाणारे जवळपास २००० हजार लोकांची लोक वस्ती आहे. सदर नागरिकांना जाणेकरीता डांबरी रस्ता नसल्याने, रस्ता करणेबाबत तेथील मा. नगरसदस्य व नागरीक वारंवार मागणी करीत आहेत. सदर रस्त्याची जागा नुकतीच मनपाच्या ताब्यात आली आहे. तथापि सदर रस्त्याचा समावेश अंदाजपत्रकात नाही. अंदाजपत्रकात कामाचा समावेश करुन प्रस्तुत काम करणेस बराच कालावधी लागू शकतो,

'

त्यामुळे सदर निविदा नोटीसीच्या कामातून ओमसाई पार्क व इत्यादी ठिकाणचे डि.पी. ९.०० मी व १२.०० मी रुंद रस्ता करणेचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे तसेच प्रभाग क्र. २६ येथील महादेव मंदिर ते बाणेर पुल तसेच त्याला लागुन पिंपळे निलख स्मशान भूमीपर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणेकरीता विद्युत विषयक कामे करणेकरीता मनपा विद्युत विभागाने निविदा मागविण्यात येऊन कामाचे आदेश दिलेले आहेत परंतु या रस्त्याचे मुळ डिझाईन बदलुन स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने या रस्त्याचे डिझाईन करणेत येत असल्यामुळे या रस्त्या दिवाबत्ती व्यवस्था करणेकरीताचे कामातही बदल करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे या रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्था करणेकरीताचे कामातही होणारे बदलांनुसार या कामास अंदाजे र.रु. १ कोटी इतका खर्च अपेक्षीत असल्याने, प्रभाग क्र. २६ येथील महादेव मंदिर ते बाणेर पुल तसेच त्याला लागुन पिंपळे निलख स्मशान भुमीपर्यंतचा १८ मी. डी.पी रस्ता विकसीत करणेकरीता विद्युतविषयक कामे करणेकरीताचे सुधारीत खर्च र.रु. १ कोटी यांस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच सदर रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्था स्मार्ट सिटीच्या अनुषंगाने करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ३१ पिंपळे गुरव येथील आ. क्र. ३४४ खेळाचे मैदान या कामाचे निविदा काढुन काम सुरु करण्यात आले होते. सदर आरक्षणाचा विकास स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत विकसित करावयाचा असल्याचे निश्चित झाले असुन स्मार्ट सिटी प्रकल्प विभागाकडुन सदर ठिकाणी चालु असणारे काम बंद करण्याबाबतचे दि.२९/०१/२०१९ जा.क्र. स्मा.सि.लि./स्था/१०/२०१९ नुसार सुचना दिल्या आहेत. तरी या ठिकाणी सदरचे काम करणे उचित होणार नाही. परंतु प्रभाग क्र. ३१ मध्ये अशा कामाची आवश्यक्ता असुन प्रभागातील विविध ठिकाणी कामे करणे आवश्यक असल्याने सदर निविदेतील उर्वरीत काम मा. नगरसदस्य यांचे मार्फत सुचविण्यात येणा-या ठिकाणी आवश्यक्तेनुसार निविदा नोटीस ७४/६/२०१६-१७ चे काम प्रभागां अंतर्गत आवश्यक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३८३ विषय क्रमांक -११
दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/३८/२०१९ दि.२३/१/२०१९
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.७९, दि.०१/०२/२०१९

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्रमांक ८० दिनांक २५/०१/२०१९ अन्वये मनपा १५ बॅडमिटन हॉलचे २० कोर्ट सराव, प्रशिक्षण व स्पर्धेसाठी आरक्षण देणेकामी तसेच भविष्यात होणारे मनपा बॅडमिंटन हॉल अनुषंगाने सुधारित क्रीडाधोरणास सोबतचे प्रपत्र "अ" व "ब" प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.प्रियंका बारसे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज हा बॅडमिटन हॉलचा विषय आलेला आहे. माझी शंका आहे की या बॅडमिंटन हॉलमध्ये फक्त बॅडमिंटनचा खेळच चालणार की याठिकाणी क्लासेस, कराटे असे बरेच बाकीचे पण उपक्रम चालत असतात. त्याबद्दलची माझी शंका आहे की याठिकाणी आपण या संदर्भात काय करणार आहात आणि दुसरा प्रश्न असा आहे की तुम्ही याठिकाणी क्रिडा संकुलन किंवा फौंऊडेशन अशा पध्दतीनेच मुलांना याठिकाणी खेळ खेळायला देणार आहात, प्रायव्हेटवाल्यांना तुम्ही त्याठिकाणी फि लावलेली आहे आणि नगरपालिकेचे विदयार्थ्यी किंवा क्रिडा संकुलामार्फत येणारे विदयार्थी त्याना फ्रि ठेवलेल आहे मग हे क्रिडा संकुल या विदयार्थ्यांकडून फि घेणार का त्यासंदर्भात माझी एक शंका आहे आणि दुसरा विषय असा आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये जेवढे बॅडमिंटन हॉल आहेत किंवा कोणतेही आरक्षण आपण डेव्हलप करत असू तर त्याठिकाणी आपण नामकरण करताना कला, क्रिडा आणि शैक्षणिक क्षेत्रात किंवा कोणत्याही चांगल्या क्षेत्रामध्ये कार्य करणारांचा त्याठिकाणी नामकरण करताना विचार केला जावा असे धोरण आपण तयार कराव अशी सूचना मी याठिकाणी देवू इच्छते. सूचना देताना मी माझ्या प्रभागामध्ये आलेला अनुभव सभागृहाला सांगू इच्छिते. मी ठराव मांडला, माझ्या ठरावावरती ई-प्रभागामधील एका नगरसेवकांनी

,

अनुमोदन दिले त्यानंतर ठराव मंजूर झाला. घरी गेल्यानंतर त्यांना स्वत:ला उपरन्ती झाली किंवा करुन दिली असेल की या नावाला आपल्याला विरोध करायचा. त्यानंतर आठ दिवसानी त्यांनी ई-प्रभागाच्या अध्यक्षाना हे नाव आम्हांला मंजूर नाही, आम्हांला दुसरे नाव दयायचे आहे, ठिक आहे तुम्ही दिलं नाव पण ई-प्रभागाच काम होतं की ते मला कळविणे आवश्यक होते. कारण ठराव मंजूर झालेला होता. एक वर्षानी मी जेव्हा जेव्हा विचारत होते माझा ठराव नामकरणाचा तुम्ही मंजूर केलेला आहे मग तुम्ही ते नाव बॅडमिंटन हॉलला अजून का देत नाहीत, तर आज देवू उदया देवू  असे करत करत वर्षे गेले. आणि वर्षभरानी मला असं कळल की तुमचा ठराव त्याच महीन्यामध्ये दुसऱ्याने त्याला विरोध दर्शविला जे अनुमोदक आहेत त्यांनी. तर हे चुकीचे आहे. हा विषय परत सभेपुढे येतो वर्षभरानी त्यावेळेस सभेतले सगळे नगरसेवक एका बाजुला आणि एका बाजूला मी एकटी. मला एकटी पडल्याच दु:ख नाही मला माझ्या आईवडीलांनी वाघीन म्हणून जन्माला घतलेल आहे आणि मी वाघीन म्हणूनच याठिकाणी काम करते. मला दु:ख एकट पडल्याच नाही परंतु हे चुकीच आहे की तुम्ही गाववाले नाहीत म्हणून तुमच नाव देणार नाहीत. आता भाऊनी शब्द उच्चारला की पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही प्रायव्हेट लिमीटेड कंपनी नाही. मग का याच व्यक्तींची नाव आपल्या आरक्षणाला दिली जावी. आरक्षण देताना फुकट जमीनी महापालिकेला दिलेल्या आहेत का. त्यांनी सरकारी नियमानुसार जी काही रक्कम असेल ती रक्कम त्यांना मिळालेलीच असेलनां मग ते त्यांचा मालकी हाक्का साठी का सांगतात. सभागृहामध्ये मी हे सुध्दा सांगते  त्याच बॅटमिंटन हॉलमध्ये, त्याच गार्डन मध्ये तुम्हीं वाढदिवसाला गार्डन देता, बारशासाठी हॉल देतात, असे ठिकाणी तुम्ही पैसे पण घेता, म्हणजे हे पुर्णपणे आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये चुकीची क्रिया चाललेली आहे हे पण आपल्या निदर्शनास आणून देते. आणि कोणतेही आपले आरक्षण डेव्हलप असेलतर, आणि त्याठिकाणी जर अशाप्रकारचे छान छान गार्डन असतीलतर त्या गार्डनमध्ये साखरपुडे होतात आणि ते संपुर्ण गार्डन आपल्याला, नागरीकांना दुसऱ्या दिवशी घाण झालेले पाहीला मिळतं. नागरीक म्हणतात की सडलेला, कुजलेला वास आम्हांला सकाळी तीथ मॉर्नींग वॉकला गेलो की तो वास घ्यायला मिळतो. या सर्व गोष्टीवरती प्रशासनाने ठोस निर्णय घ्यायला पाहीजे. त्याठिकाणी जे वॉचमेन आपण नेमलेले असतील त्यांना सुध्दा आपण याबाबतीत कठोर असे निर्णय घ्यायला लावले पाहीजेत. याठिकाणी अशा खासगी कार्यक्रमाला कोणीही परवानगी दिली नाही पाहीजे. आणि एखादया चांगल्या कार्यक्रमाला दिलीचतर त्याठिकाणची स्वच्छता

,

पण झाली पाहीजे. अक्षरशा: एखादा सांस्कृतीक हॉल आहे असे समजून त्या ठिकाणी रोज रोज कार्यक्रम होतात. याकडे प्रशासनाचे अजीबात लक्ष नाही किंवा आपण त्याकडे जाणुनबुजून दुर्लक्ष करत आहात असं मला वाटत. आपण बोलू दिलं त्याबद्दल धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झालचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, विषय क्रमाक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३८४ विषय क्रमांक -१२

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/३/कावि/५६/२०१९ दि.२९/०१/२०१९

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.८०, दि.२९/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात. या व्यावसायिकांकडून परवाना फी प्रति वर्षी वसूल करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतुदीस आधीन राहून प्रति वर्षी परवाना फीचे दर निश्चित करण्यात येतात. त्यानुसार प्रपत्र अ, ब व क नुसार प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे १) सन २०१९-२० साठी सन २०१८-१९ साठी अस्तित्वात असणा-या दरामध्ये ३०% दरवाढ सर्व प्रस्तावात नमूद तिन्ही प्रकारच्या परवान्यासाठी करणेत यावी. २) परवाना नुतनीकरण विलंबाने करणा-या व्यावसायिकांसाठी परवाना फी वर दरमहा १०% नुसार विलंब शुल्क आकारण्यात यावी मात्र त्याची कमाल मर्यादा असणा-या विलंब शुल्क १२०% नुसार आकारणीच्या सध्याच्या दरामध्ये वाढ न करता ते कायम ठेवणेत येऊन ३० जुन नंतर नुतनीकरण न केल्यास एप्रिल पासून प्रस्तावात नमूद केले नुसार विलंब शुल्क

,

आकारणी कायम ठेवण्यात यावी. याप्रमाणे मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.साधना मळेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -१३

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.राजेंद्र लांडगे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.८२, दि.०१/०२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सह शहर अभियंता (स्थापत्य) या प्रवर्गात ३ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद मागासवर्गीयांसाठी आरक्षित आहे. महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.बीसीसी-२०१६/प्र.क.२२८ए/१६/१६-ब दि.२९ मे २०१७ नुसार छोटया संवर्गातील मागासवर्गीयां करीता आरक्षित पदे पदोन्नतीने पदे भरताना अनुसरावयाची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्यानुसार बिंदुनामावलीच्या क्रमवारीनुसार प्रथमतः अनुसुचित जाती प्रवर्गाकरीता पद भरण्याचा विचार करावा, त्यानंतर अनुसुचित जमाती प्रवर्गाचा विचार करावयाचा आहे. यापूर्वी सह शहर अभियंता पदावर अनुसुचित जाती प्रवर्गातील उमेदवार भरणेत आले असून सदरचे पद आता रिक्त आहे. बिंदु नामावलीनुसार सदर जागेवर सद्यस्थितीत अनुसुचित जमाती प्रवर्गाचे उमेदवारास पदोन्नती देणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर अनुसुचित जमातीच्या प्रवर्गाचे श्री.देवन्ना नरसिमलु गट्टूवार हे सेवाजेष्ठता यादीप्रमाणे प्रथम क्रमांकावर आहेत. तरी सदर अधिकारी यांची कार्यकारी अभियंता या पदावर

,

चार वर्षापेक्षा जास्त सेवा झालेली असल्याने त्यांना अनुभवाचा काही कालावधी शिथिल करुन पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर अभ्यासक्रमा करीता मानधनावर प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक नेमणूका करणेत आलेल्या आहेत. सदरच्या नेमणूका यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामार्फत एकत्रित मानधनावर ३ वर्ष कालावधीसाठी मा.महापालिका सभेच्या मान्यतेने करणेत आलेल्या आहेत. सदर नेमणूकांना १ वर्षाचा कालावधी झाला असल्याने सदर कर्मचा-यांची मागणी व अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर अभ्यासक्रम यांनी केलेली शिफारस विचारात घेता तसेच नव्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम संस्थेकरीता मिळालेली मान्यता विचारात घेता प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक या दर्जाचे अधिकारी सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने प्राप्त परिस्थीतीत सदरील पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांना कायम वेतन श्रेणीत सामावून घेण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच महाराष्ट्र शासनाच्या प्रतिष्ठेचा शिवछत्रपती पुरस्कार हा खालीलप्रमाणे खेळाडूंना प्राप्त झाला आहे.

| अ.क्र. | खेळाडूंचे नांव | वय | पत्ता | खेळाचे नांव | शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्नेहल प्रदिप शिंदे | २७ | फ्लॅट नं.५,१००५, स.नं. ३९/८,बालाजी प्राईड, दळवीनगर, आंबेगाव बु. | कबड्डी | २०१२-१३ |
| २ | प्रिताली रविकांत शिंदे | २५ | क्यू.११, मंत्री हौसिंग सोसा. शिवाजी पुतळया जवळ, शिवाजी चौक, दापोडी पुणे-५३. | सायकलिंग | २०१४-१५ |
| ३ | शेजल शैलेश मानकर | | सुंदरपार्क, गणेशनगर, धनकवडी पुणे-५३. | जलतरण | २०१७-१८ |

,

वरील प्रमाणे तीन खेळाडूंना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला असल्याने सदर तीन्ही खेळाडूंची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर “लिपिक” या पदावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आशा शेंडगे-धायगुडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी जी उपसूचना दिली तत्पुर्वी मी सभागृहाच याठिकाणी लक्ष वेधू इच्छिते की काल स्थायी समितीची सभा झाली मला वाटते की आपल्या महानगरपालिकेमध्ये वायसीएमला संलग्न असलेले जे पी.जी.इन्स्टिटयूट आहे त्या पी.जी.इन्स्टिटयूटसाठी जे डीन या पदावरती असणारे डॉ.पंडीत यांची अपल्याकडची नियुक्ती १७ तारखेला संपली. १७ तारखेपर्यंत त्यांची नेमणुक होती त्याच पत्र माझ्याकड आहे. तुम्ही खात्री करा मग मला पुढे बोलायला. ते किती तारखेपर्यंत आपल्याकडे रुजू होणार होते, किती तारखेपर्यंत आपल्याकडे थांबणार होते आणि त्यांना आपण आपल्या येथून कधी कार्यमुक्त करणार होतो त्यांचा कालावधी सांगावा, संबंधितांनी मला ती माहिती सांगीतली पाहीजे. डॉ. पंडीत यांना आपल्या येथे डीन म्हणून जबाबदारी दिलेली होती त्यांची तारीख सांगावी. डॉ.पंडीत यांची नियुक्ती किती तारखेपर्यंत आहे हे सांगाव.

**मा.पाटील** (अति.आयुक्त- १) **-** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आता आशाताई शेंडगे यांनी प्रश्न विचारलेला होता की यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये आता जे पी.जे.इन्स्टिटयूट आहे त्याठिकाणी डीन म्हणून कार्यरत असलेले डॉ.पंडीत यांची नेमणुक कोणत्या तारखेपर्यंत आहे. येथील माहितीनुसार १७ फेब्रूवारी पर्यंत त्यांची मुदत होती आणि त्यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव सादर झालेला आहे.

**मा.आशा शेंडगे-धायगुडे -** मा.महापौर साहेब. मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आम्ही सगळे नगरसेवक, नगरसेवीका येथे काम करतो. जर स्थायी समितीला आमचे सोळा नगरसेवक असतात. तथापि मला वाटल की माझा एखादा विषय आहे तरी त्या पवीत्र सभागृहाच उल्लंघन होवू नये म्हणून आमच्यातला कोणीही त्या सभागृहाची पायरी सुध्दा उबंरठा सुध्दा शिवायला जात नाही. मग डॉ. पंडीत असे कोण की जे कालच्या स्थायी समितीमध्ये जावुन बसले, याचा खुलासा दयायचा. नाहीतर मग मा.महापौर साहेब, आपल्याला पण विनंती आहे की, त्यावेळेस पदभार सांभाळणारे जे कोणी तत्कालीन आयुक्त असतीलतर त्यांच्यावरती आपल्याकडन सुध्दा कठोर कारवाई झाली पाहीजे. नियम सगळा

,

नगरसेवकांनाच, शिस्तप्रिय आम्हांलाच. कोण असे पंडीत आहेत की आपल्या सभागृहामध्ये ज्या पंडीत साठी इतक्या आपण पायघडया टाकतो. आम्ही सुध्दा याठिकाणी नागरीकांचे प्रश्न विचारायला येतो. त्यासाठी आमचा गुन्हा ठरतो. कोणत्या नियमान्वये त्या सभागृहामध्ये डॉ.पंडीत कालच्या सभेला बसले होते आणि आता सुध्दा कुणाच्या परमीशनने ते येथे येवू शकतात. कोणाचा त्यांच्यावरती वरदहस्त आहे. त्यांच्या चुकीमुळे आपल्याला पी.जी.ची मान्यता मिळायला उशीर झालेला आहे हे सुध्दा आख्ख्या शहराला माहिती आहे, तुम्हांला सुध्दा माहिती आहे. मग अशा अकार्यक्षम अधिका-याला, अशा अकार्यक्षम अधिकारी अवर्जून म्हणतेय की ज्याला वीस लाख रुपये भरायचे का दोन लाख रुपये भरायचे हे सुध्दा ज्ञान त्या माणसाला नाही, खरतर ही जबाबदारीची गोष्ट आहे. जर एखादी व्यक्ती सांगते की साहेब, एवढे पैसे भरायचे आहेत, नाही नाही एवढेच भरायचेत या त्यांच्या हलगर्जीपणामुळे जर माझ्या शहराला एक वर्षाच्या कामाला मुखाव लागत असेल, माझ्या शहराची प्रगती एक वर्षानी खुंटली असेलतर त्या अधिका-याला जबाबदार धरण्याऐवजी त्यांच्यासाठी पायघडया घालण्याची मेहरबानी कोण करतय याचा खुलासा दया. मा.महापौर साहेब, मी तुम्हांला विनंती करते की आता जी उपसूचना करतो ती का करतो आपण. जी लोक याठिकाणी मानधनावर म्हणून घेतली त्याच मानधनावरच्या लोकांना तुम्ही कायम करण्याचा विषय करता. या महानगरपालिकेमध्ये हजारो कर्मचारी मानधनावरती काम करतात. वायसीएमलाच डॉक्टर्स आहेत. एमबीबीएस, एमएस ते या पुढच्या शिक्षणासाठी किती खस्ता खात खात माझे डॉक्टर्स त्याठिकाणी शिक्षण घेतात. किंबहुना माझा मुलगा असलातरी त्याला डॉक्टर व्हायच नाही. डॉक्टर होईपर्यंत डोक्यावर केस राहत नाही त्यामुळे आपल्याला काही मेडीकलला जायची इच्छा नाही हे आम्ही आमच्या घरामध्ये सुध्दा बोलतो परंतु हे डॉक्टर्स ज्यावेळेस शिक्षण घेतात, पदव्युत्तर शिक्षण घेतात, पदविका शिक्षण घेतात आणि याठिकाणी नागरीकांच्या सेवेमध्ये यायची मानसीकता ठेवतात त्यावेळेला हे शिक्षण घेत असताना त्यांनी केलेले कष्ट, त्यांच्या कुटूंबीयांनी केलेली पैशाची मोजणी करावी लागते. मी या गोष्टीला सभागृहात बोलत असताना सांगते की पैसे मोजावे लागतात, जी फि मोजावी लागते या सगळया गोष्टी अत्यंत अपरिहार्य आहेत. आणि हे सगळे केल्यानंतर माझा डॉक्टर बंधु किंवा भगिनी त्याठिकाणी जॉईन व्हायला येते. जर मानधनावरची ऍडव्होर्टाइज असेलतर फार हुशार नसेलतर ते म्हणतात की मानधनावरती दोन वर्षे काम करुयात. जर त्याठिकाणी हुशार डॉक्टर्स असेलतर तो म्हणतो दोन वर्षासाठी कोण येईल काम करायला म्हणून तेथे आले

,

नसतील. आज जे काही लोक आले आहेत त्यातन सिलेक्शन. मला चांगल गुण मिळाले नसतील म्हणून मी मानधनावरती काम करायला आले. काहीजण अनुभवासाठी पण येत असतील. परंतु जर तीच ऍंड आपली कायमस्वरुपी असली असतीतर हजारो डॉक्टर्स आले असते. आणि माझ्या शहराच्या चांगल्या विकासासाठी मला चांगल्या डॉक्टर्सची निवड त्याठिकाणी करण्याची संधी उपलब्ध झाली असती. मग असं न करता आपल्याकडे ही कोणती पध्दत आहे याचा खुलासा दयायचा आहे की अशा मानधनावरच्या लोकांना आपण कायमस्वरुपी करु शकतो का. याठिकाणी माझा विरोध आहे. याठिकाणी ज्यावेळेला डॉक्टर शिक्षण घेतो, नोकरीसाठी येतो, नोकरी करतो पर्याय नाही त्याला जरी रुग्णाची सेवा करायची असेल, जरी त्याला सर्व रुग्णांना बर करायच असेलतरी दुसरा पर्याय आहे, नण्याची दुसरी बाजू असते की त्याला त्याची उपजिवीका चालवावी लागत त्यामुळे त्याला चांगल्या पगाराची नोकरी अपेक्षीत असते. मानधनावर तुम्ही देत असलेला पगार आणि कायम स्वरुपी असणारा पगार यातला फरक कळतो. चुकीच्या पध्दतीने सभागृह चालू देणार नाही. कोणावर अन्याय होवू देणार नाही. या पध्दतीने जर आपण करणार असालतर शंभर टक्के विरोध नोंदवा. आणि या विषयासाठी आम्ही कोर्टात जायला सुध्दा घाबरणार नाहीत. डॉ. पंडीत याठिकाणी १७ तारखेला का होते याचा खुलासा मा.आयुक्त साहेब आपण दयायचा आहे. आणि आज सुध्दा ते याठिकाणी काय लुडबूड करतात, लाज वाटली पाहीजे त्या माणसाल सुध्दा याठिकाणी वर्षभर त्यांनी शहर मागे टाकल त्या माणसाला आपण नेमणूक देतो कशासाठी. श्रीकर परदेशी तत्कालीन आयुक्त होते त्यावेळेस आम्हांला माहिती आहे. त्याठिकाणी रॉय यांनी काम केल मेहरबानी केली नाही ते नोकरी करतात नोकरीच्या बदल्यात काम केलं. परंतु आयत्या बीळावरती नागोबान का बसायचं. आज त्या पंडीत यांची भाषा बघा काय बोलतात ते आमच्याशी. साहेब, याठिकाणी माझा भाऊ आजारी आहे, माझी बहीण आजारी आहे म्हणून आम्ही कधीच डॉक्टराना फोन करत नाहीत. या शहरातील नागरीकांच्यामुळे आम्ही या सभागृहात आहोत, ज्यांच्यामुळे आम्हीं या सभागृहात आहोत त्यांच्यासाठी आम्ही फोन करतो. जे दुर्बलघटक आहेत, ज्यांची आर्थीक परिस्थिती चांगली नाही अशा नागरीकांसाठी त्यांना फोन करतो त्यावेळेस त्यांची अरेरावीची भाषा आम्ही ऐकायची. आमच्या घरच वैयक्तिक काम करतात ते लोक. मी अस केलच नाही, कधी करतच नाही, बघतच नाही, मागच्या अख्ख्या वर्ष त्यांना सुविधा दिल्या कशा प्रकारच काम करतात तेही बघा. मा.महापौर साहेब, आपण सांगाव की हा विषय आपण मंजूर करणार असालतर माझा

,

विरोध नोंदवून घ्यावा. तरच आपण हा विषय करावा. मा.महापौर साहेब, आपण ख-या अर्थाने चुकीची प्रथा या सभागृहात पाडू नये अशी मी विनंती करतो आणि आयुक्त साहेबांनी सुध्दा १७ तारखेचा खुलासा दयावा अन्यत: आपण काय कारवाई करणार आहात त्याचाही आपण खुलासा दयावा अशी मी विनंती करते, थांबते, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता मला कळल की ऐनवेळचा विषय आणला की वायसीएम मध्ये मानधनावरचे जे कर्मचारी आहेत त्यांना कायमस्वरुपी करणे. सत्तावीसे त्रेसष्ठ जागा मंजूर झाल्या त्या भरल्या नव्हत्या. चार ते साडेचार हजार लोकांचा अकृतीबंध मंजूर होवून येईल मग तुम्ही आता मानधनावरचे परमनंन्ट करणार त्याच्यानंतर ठेकेदारी पध्दतीचे पण तुम्ही परमनंन्ट करणार का. २०१६ ला या सभागृहाने असा विषय मंजूर करुन घेतला होता की जे स्थानीक भूमीपुत्र येथे आहेत, ज्याची प्रत्येकाची जागा पाचशे फुट जरी गेली असलीतरी किंवा हजार फुट गेली, दोन एक्कर, तीन एक्कर गेली. प्रत्येक ठिकाणी नियम आणि कायदा आहे. ज्याची जागा गेली तो भूमीहीन झाला आहे. त्यालाही आरक्षण प्लस वीस टक्के असं रिझर्व्हेशन नियमीतीकरण करुन घेतले होते ते आजपर्यंत आपण कुठल्याही योजनेमध्ये राबवले नाही. आपण १५१ आता ईंजिनीअर भरले त्यासाठी सुध्दा क्रायटेरीया वापरला नाही. जे ६५ शिक्षक भरले त्याच्यासाठी सुध्दा क्रायटेरीया वापरला नाही. आता वायसीएम हॉस्पिटलमध्ये जे ५३ डॉक्टर घेतले, तीन महीन्यात आपल्याला जर ५३ डॉक्टर भेटले. पवन साळवेनी तीन वेळा पेपर नोटीस बाकीच्या गोष्टी केल्या त्यावेळेला डॉक्टर आले. दुसरी गोष्ट मानधनावर १०५ नर्स भरायच्या होत्या त्यासाठी २३०० अर्ज आले. कायमस्वरुपी असतेतर तेवीस हजार आले असते आणि आपल्याला डॉ. रॉय सांगतात की मनुष्यबळ उपलब्ध होत नाही म्हणून आपण भोसरी हॉस्पिटल पण प्रायव्हेट करतो. २१ कोटी दरवर्षी देणार. आपण हे ५३ डॉक्टर कायमस्वरुपी तीन महीन्यात भरले, मानधनावर १०५ नर्सच्या जागेसाठी २३०० अर्ज येतात, २१०० ते २२०० लोकांची परीक्षा होते. सगळयाच सिलेक्शन होत त्यातले तीस एकतीस कोर्टात जातात मग बाकीचे साठ ते सत्तर होते तेवढयानाच आपण मानधनावर भरायला पाहीजे होते त्याही भरलेल्या नाहीत. फक्त आपण एकच करायच की आम्हांला लोक भेटत नाहीत. स्वत:ची मानसीकता सुधारली पाहीजे. मा.महापौर साहेब, मला एकच म्हणायच आहे की जो तुम्ही मानधनावरची लोक परमनन्ट करण्याचा ठराव केलेला आहे तो मंजूर करु नका, विरोध आहे

,

आणि दुसरी गोष्ट अशी की आमचा अकृतीबंध मंजूर झालातर जे इथले स्थानीक भूमीपुत्र आहेत, आज वाईट परिस्थिती आहे. वॉचमेन आणि सिक्यूरीटी म्हणून आठ ते दहा हजारावर ते कामाला जातात. ती पण आपल्या सगळयाची लोक आहेत. आपण या शहरासाठी आहोत आपल्या लोकांच चांगल झाल पाहीजे. सर्व लोकांच्या दृष्टिने विचार करुन हा निर्णय घेणेत यावा. आणि जर मंजूर करणार असालतर माझा विरोध आहे, मी स्वतः या विषयात कोर्टात जाईल, एवढ बोलून थांबतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. नामदेवरावांनी नावाप्रमाणे गोल सगळीकड वा-या करुन आणल्या आणि आडनावाप्रमाणे लावला सगळयाला ढाक. कारण आज सगळया नगरसेवकांना समजलेल आहे. मा.महापौर साहेब, तुम्हांला अगोदरच मी सांगते तुम्ही जर हा विषय केलातर मतदानाला हा विषय घेतला जाईल आणि जेवढयांना कोर्टात जायच आहे तेवढे कोर्टात जातील, ही प्रथा पाडू नका. आज तुम्हांला डॉक्टरांची संख्या दिसली की आज आपल्याला पी.जी.ची परमीशन मिळाली म्हणून तुम्ही त्यांना नियमीत करायला निघालात. कुठून तुमच्या डोक्यातून या सुपीक कल्पना येतात. मग दयानां पेपरला जाहीरात, येवूदयात नां आपल्याकडे नामांकीत डॉक्टर्स, घ्यानां त्यांना परमनंन्ट सेवेमध्ये. पेपरला जाहीरात काढायला पाहीजे होती, असं तुम्हांला करता येणार नाही. पती-पत्नी एकत्रीकरणाचा मगाशी कोणीतरी उल्लेख केला तो सुध्दा विषय करता येणार नाही. मा.महापौर साहेब, हा डॉक्टर्स नियमीतीकरणाचा विषय तुम्ही करु नका. वाघेरेनी सुध्दा आता सांगीतल आहे.  आता या नगरसेवकांना दोन ते आडीच वर्षे होत आले आहेत त्यामुळे त्यांनाही आता हे विषय समजायला लागलेले आहेत. डॉ.पंडीत हे सिनीअर आहेत मी त्यांचा आदर करते, ते डॉक्टर आहेत, खरतर आपल्या प्रशासनाची चुक आहे. आपल्याकडे एखादयाला आमंत्रण दयायच आणि त्यांचा अपमान करायचा. ही संस्कृती पिंपरी चिंचवडची नाही. मी गेली पंचवीस वर्षे या सभागृहामध्ये येतो. आज त्या व्यक्तीला किती दुख्र होत असेल की मी माझ आयुष्य घालवल आणि तुम्ही त्यांना मुदत न वाढवता तुम्ही त्याना सांगता काम करा म्हणून ही आपल्या प्रशासनाची चुक आहे की नाही. आज वयस्कर रिटायर्ड झालेल्या व्यक्तीनी, त्यांना काय कुठेही गेलेतरी काम मिळणार आहे. पण ही प्रशासनाची चुक नाही का. याला जबाबदार कोण. आज त्यांना तुम्ही स्टॅण्डींगमध्ये बसायला सांगता त्यांना तुम्ही सभागृहामध्ये यायला सांगता. मुदत संपल्यानंतर आयुक्तांनी अधिकारात दयायच होत किंवा तीन महीने आगोदर त्यांना मुदतवाढीच पत्र दयायच होतं. हे योग्य नाही, घरी

,

पाहूण्याना बोलवायच आणि त्याचा तोंडावर अपमान करायचा हे आमच्या संस्कृतीततर बसत नाही. तुम्ही जाहीरात काढा आपल्याला शंभर टक्के, आपल्याला ५३ नाहीतर एकशे त्रेपन्न नाही, दोनशे त्रेपन्न नाही पाचशे त्रेपन्न भरा. परंतु हे महापौर साहेब अजीबात करता येणार नाही सभागृहात मतदान होईल. फक्त तुम्हांला डॉक्टरांचच कस काय सुचल, १९९८ सालापासून घंटागाडीवाले कोर्टात आहेत. अक्षरशः त्या घंटागाडीवाल्यांचे कित्येक कर्मचारी गेले. त्यांचे नातेवाईक रडून रडून पार त्यांच्या कुटूंबाची वाट लागली. त्यांना मानधनावरच ठेवलय. तसेच शिक्षणमंडळाच पण आहे. शिक्षणमंडळात मानधनावर लोक कामाला आहेत. पती-पत्नी एकत्रीकरण दिसत त्यावेळेस या कर्मचा-यांच दिसल नाही. असा दुजाभाव कसा होतो. सभागृह सगळयांसाठी आहे, नियमान चाला त्यांचीही भरती करा. त्यांचीतर सलग नोकरी आहे. ९८ सालापासून ते आजपर्यंत पिंपरी चिंचवड शहरामध्ये काम करतात. अक्षरशः घाणीमध्ये घंटागाडीवाले काम करतात. घंटागडीमध्ये ते बकेट टाकतात आणि ते गेली इतक्या वर्षे काम करतात की कित्यैंक लोकांना आजार झाले तरी सुध्दा बीचारे आज ना उदया परमनंन्ट होवू या आशेनी कोर्टात लढतात, शिक्षणमंडळवाले कोर्टात लढतात आणि एवढ असताना फक्त आपल्याला डॉक्टरच दिसले. पक्षनेते तुम्हांला जे योग्य वाटत ते करा पण हे करताना अस लक्षात ठेवा की अजीबात चुकीच करु नका. नव्हेतर आता तुम्ही पेपरला जाहीरात दया आयुक्त साहेब. काढा जाहीरात आणि घ्या तुम्ही जाहीरातीनुसार डॉक्टर. तुम्हांला माहिती आहेना की आपल्याला आता पी.जे.इन्स्टिटयूट चालू करायची आहे मग त्याला डॉक्टर लागणार आहेत. अगोदरच सहा महीने तुम्हांला परमीशन काढता येत नव्हती का. सहा महीने जाहीरात आदि काढता येत नव्हती का. मा.महापौर साहेब, मी आताच तुम्हांला सांगते की हा विषय तुम्हांला मतदानाला घ्यावा लागेल. परत म्हणताल सांगीतल नाही आणि विषय मंजूर करताल. तरी हा विषय उपसूचनेसह मागे घ्यावा एवढीच मी विनंती करते आणि थांबते, अन्यतः आम्हांला परत बोलायचे.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाचा बागुलबूवा सभागृहामध्ये काही मंडळी करतात. खरतर अत्यंत वेदनादायक चित्र आहे. ब-याच जणांनी एक गोष्ट मनापासून सांगीतली आहे की वायसीएमची परिस्थिती सुधारली पाहीजे. डॉ.पंडीतांच्या संदर्भामध्ये खरतर या सभागृहामध्ये बसलेल्या माझ्यासारख्यांचीतर निश्चितच क्षमता नाही, डॉ.पंडीताकड बोट दाखवायची. डॉ.पंडीत, बी.जे.मेडीकल कॉलेज या कॉलेजचे डीन आहेत. ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरचे कर्मचारी नाहीत. हे खरतर

,

सगळया सभागृहातल्या सगळया सन्माननीयांच्या ध्यानात यायला पाहीजे. डॉ.पंडीतांनी डॉ.श्रीकर परदेशींच्या काळामध्ये त्यांना याठिकाणी वायसीएममध्ये पी.जे.इन्स्टिटयूट करण्याच्यासाठी खरतर विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून या महापालिकेमध्ये खरतर पाठवले गेलं. ज्यांनी ज्यांनी शंका वायसीएमच्या बाबतीत उपस्थित केली त्यांनी थोडीशी अधिक माहिती या सभागृहामध्ये घेणं गरजेच आहे. वायसीएमच्या संदर्भामध्ये नाहीतर वैदयकीय विभागामध्ये आपल्या आपल्या मर्जीचा अधिकारी असला पाहीजे यामुळ खरतर पिंपरी चिंचवड शहरामधल्या सर्वसामान्य माणसाच्या आरोग्याशी खेळण्याच काम मागच्या अनेक वर्षाच्या काळामध्ये केलं आणि अजूनही ब-याचवेळा असं वाटतय माझ्या अधिकारातला अधिकारी असलातर माझी त्या हॉस्पिटलमध्ये अत्यंत चांगली लुडबूड होईल आणि मला काम करता येईल अशी परिस्थिती आहे. खरतर डॉ.पंडीत आणि त्यांच्या टिमच मी मनापासून अभिनंदन करतो. या महापालिकेच्या सभागृहामध्ये हा विषय मंजूर केला पाहीजे का नाही केला पाहीजे, मतदान घेतल पाहीजे का नाही घेतल पाहीजे हा माझ्यासाठी मुद्दा नाही हे लक्षात ठेवा. परंतु एखादया अधिका-यांच्या माध्यमातून मला वाटतय की आशाताईनी सांगीतल की मागच्या काळामध्ये २० लाख रु. भरले की नाही भरले, त्यामुळे आपले वर्षे वाया गेलं. तुम्ही बोललात या नगरसेवकांना दोन ते आडीच वर्षे झाले, हुशार झाले सगळे नगरसेवक त्यामुळे माझ बंधन त्या विषयामधल काही नाही. ते हुशार, त्यांनी नीट अभ्यास केला पाहीजे, एखादया विषयाची माहिती घेतली पाहीजे. तुम्ही सांगीतले की हे जे डॉक्टर आहेत ते २३०० आले पाहीजे मी तर म्हणतो २३ हजार आले पाहीजेत. नामदेवरावांनी वारीला जातानी खोट नाही बोलले हे लक्षात ठेवा. खरंतर वायसीएमच्या दयनीय परस्थितीला राज्यकर्ते म्हणून आपण जबाबदार आहोत. गेल्या सात आठ महीन्यामध्ये वायसीएमची परस्थिती बघा. डॉ. पाटोळयांच्या संदर्भामध्ये, मी खरतर कौतूक करतो डॉ. पाटोळेंच, विनायक पाटील, न्यूरोसर्जन आज आपल्याकडे येत नाहीत. ताई तुम्हांला माहिती आहे उमेश फाळके तुमचे जवळचे आहेत त्यांची परस्थिती काय केली आणि हीच पुढच्या काळामध्ये वायसीएमची करायची का. रुबी एल केअरला आपल्याला कराव लागलं, का कराव लागलं याचाही खरतर विचार करणार आहोत की नाही. मा.महापौर साहेब, मी या निमीत्ताने एवढच सांगेल की त्यावेळेसची जाहीरात या वैदयकीय शिक्षण संस्था या महापालिकेच्या माध्यमातून पी.जी. इन्स्टिटयूट करण्याच्या संदर्भामध्ये केली गेली त्यावेळेसची परस्थिती या सगळया डॉक्टरांना परमनन्ट सेवेमध्ये घ्याव अशाच पध्दतीची

,

जाहीरात होती, ती वाचा. तुमच्या जवळचे डॉक्टर असतील घ्या मागून त्यांच्याकडून आणि त्याच्यामध्ये बघा. त्या डॉक्टर लोकांना का नाही घेतलं. त्यावेळेसची परस्थिती अशी होती की पी.जी.इन्स्टिटयूट आम्हांला मिळते की नाही. नाही मिळालतर या डॉक्टरांचा बोजा आम्ही घेणार की नाही. ही परस्थिती खरतर या विषयाच्या संदर्भामध्ये होती. व्हिजन डोळयासमोर ठेवा. माझी सगळया नगरसेवकांना विनंती आहे की हा विषय करण्याच्या संदर्भामध्ये नाही, तर गेल्या दोन चार वर्षापुर्वीच वायसीएमच ऑडीट करा. तिथ पेशंटला मिळणारी ट्रिटमेंट कशा पध्दतीने मिळते याचाही अभ्यास करा आणि गेल्या सात आठ महीन्यापासूनची परस्थिती बघा. रोज किती पेशंट होतात. किंती ऑपरेशन्स होतात. डॉक्टर चांगल्या पध्दतीच काम करतात की नाही. माझी सगळयांना विनंती आहे की सगळया नगरसेवकांनी वायसीएम मध्ये गेलं पाहीजे. मागच्या आठवडयामध्ये ज्यावेळेस सात विषयाला पी.जी. इन्स्टिटयूटची परवानगी मिळाली, एवढ मोठ यश या महापालिकेच्या माध्यमातून या सात विषयाला मान्यता मिळाली पुढच्या तीन चार महीन्याच्या काळामध्ये दहा विषयामध्ये आपल्याला परवानगी मिळणार आहे. आज आपल्याला दरवर्षाला पंचवीस तीस डॉक्टर्स पुढे एमडी, एमएस होण्यासाठी आले तेही चांगल्या मेरीटचे येणार आहेत. परवाच्या दिवशी आम्ही आयुक्तांच्या समोर बसलो त्यावेळेस आम्ही सांगीतल की नगरसेवक किंवा मॅनेजमेंट कोठा नका ठेवू. मेरीटने मुल येवू दयात. मेरीटने आलेले मुल या महापालिकेच्या सेवेमध्ये काम करतील ते मेरीटनेच आपल्या पेशंटची सेवा करण्यासाठी येतील हे लक्षात ठेवा. या महापालिकेमध्ये आम्ही दोन वर्षापुर्वी सत्तेत आलो आणि कधी कधी या महापालिकेमध्ये सत्तेत आल्याच्यानंतर केंद्रशासनाच्या माध्यमातून पी.जी.इन्स्टिटयूट व्हावी ही खरतर तुमची इच्छा होती ती तुमची इच्छा खरतर तुम्ही करु नाही शकले. या देशा मधली पहीली महापालिका अशी आहे या महापालिकेच्या माध्यमातून पी.जे. इन्स्टिटयूटचा मान पिंपरी चिंचवडला मिळतो ही खरतर सगळयांना या शहरवासीयांना अभिमानाची गोष्ट असली पाहीजे. दुर्दैवाने ज्या पध्दतीने वायसीएमच्या वैदयकीय विभागामध्ये आजही बघा कोणाचे ठेके आहेत, या पुढच्या काळामध्ये वायसीएम या शहरामधल सुपरस्पेशालीस्ट हॉस्पिटल बनल पाहीजे यासाठी सगळयानी काम करण्याची गरज आहे. राजकारणतर केलच पाहीजेनां. कुठ करतो राजकारण आपण, वायसीएमच्या विषयात. सर्वसामान्य मानसाला ज्याठिकाणी सुविधा दयायच्या, त्याची सेवा केली जाते अशा ठिकाणी आपण राजकारण करतो, दुर्दैवान मला असं वाटतय. या सभागृहाच्या माध्यमातून मला एकच विनंती करायची आहे. नीट अभ्यास करा,

,

नीट बघा या शहराच हीत कशात आहे. एखादया टेंडरमध्ये आपल्या पध्दतीने आपण चाललो अशा पध्दतीचा विचार नका करु. हे शहरवासीय या महापालिकेच्या बाजूने चांगला विचार करतात. येथे चांगले डॉक्टर आले पाहीजेत. कधी कधी मला अभिमानान एक गोष्ट सांगावीसी वाटते या ठिकाणी पी.जी. इन्स्टिटयूटचा तो डॉक्टर आहे त्यांनी आज अनेक गुडघ्यावरच्या शस्त्रक्रिया या महापालिकेच्या माध्यमातून करतात. आपला एक एक मेडीसीनचा डॉक्टर रोजची चारशे ते साडे चारशेची ओपीडी करतो. अनेक शस्त्रक्रिया महापालिकेच्या माध्यमातून केल्या जातात. खरतर त्या हॉस्पिटलमधील डॉक्टरांच म्हणण काय आहे तुम्ही आम्हांला अजूनही ऑपरेशन थिएटर अव्हेलेबल करुन दया, अजूनही आम्हांला वेगवेगळे आयसीयू युनीट करुन दया. ताई, कुठले कर्मचारी घेण्याच्या संदर्भातला प्रश्न नाही, परंतु हे जर डॉक्टर जर गेलेतर माझी एवढी विनंती आहे की कुणाच्या दबावाखाली आपल्याला नाही जायचं. आपण ज्या पध्दतीने सगळया शाळेचा दौरा केला, तुम्ही वायसीएमचा दौरा केला आणि या शहरवासीयांना जर आपण चांगले उपचार देवू शकलो नाहीतर सभागृह आपल्याला माफ करणार नाही, या शहराची जनता माफ करणार नाही. एखादया विषयाच राजकारण करण्यासाठी सगळयाच विषयाच राजकारण करतात. मी एवढच सांगेल की प्रशासनाने मनापासून विचार केला पाहीजे की डॉक्टर पंडीत यांची जर १७ तारखेला मुदत संपलेली होती तर प्रशासन काय झोपेत होते का. खरतर पंडीत ६०-६५ ला गेलेले आहेत. आम्ही त्यांना विनंती केली की डॉक्टर साहेब तीन तारखेला दुसरा डीन येतो. दुसरा डीन आल्याच्यानंतर तुम्ही पंधरा वीस दिवस दुसऱ्या डीनला इथल्या पध्दतीची सिस्टीम, इथले अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक त्यांचा मान सन्मान कसा करावा लागतो हे सांगण्यासाठी आठ दहा दिवस घ्या. डॉ.पंडीताना आपली गरज नाही हे लक्षात ठेवा आपल्याला डॉ.पंडीताची गरज आहे. आणि आपणही विचार केला पाहीजे की आपण कुणाच्या बद्दल एखादी गोष्ट बोलतो. मला अभिमान एका गोष्टीचा वाटतो की डॉ.राठी नावाचे एक डॉक्टर आपल्याकडे आहेत ईएनटी स्पेशालीस्ट आहेत, एम डी आहेत. चांगल्या कॉलेजमधुन नौकरी सोडून याठिकाणी आलेत. आपल्याला कल्पना आहे का ईएनटीच्या संदर्भामधल्या केसेसच्या माध्यमातून महात्मा फुले, डॉ.राजीव गांधी दिवसभराच्या दोन चार शस्त्रक्रिया केल्याच्यानंतर या महापालिकेच्या तीजोरीमध्ये किमान एक लाख रु. तो डॉक्टर मिळवून देतो. याच्या अगोदरची काय परिस्थिती होती. पेशंट शेजारच्या हॉस्पिटलमध्ये शिफ्ट व्हायचा. जा तिथ राजीव गांधी मधुन ट्रिटमेंट घे, मा.मुख्यमंत्री सहाय्य निधीमधुन ट्रिटमेंट घे आणि ते पैसे

,

कोणाच्या खिशामध्ये जातात, त्या हॉस्पिटलच्या. पहील्यांदा मला महापालिकेच्या माध्यमातून अभिमान वाटतो माझा वायसीएम मधला एखादा डॉक्टर मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून असेल, महात्मा फुले मध्यमातून असेल, या महापालिकेच्या तिजोरीमध्ये पैसे जमा करण्याच काम करतो. मला अभिमान वाटतो एका गोष्टीचा पुढच्या काळामध्ये या महापालिकेच वायसीएम हॉस्पिटल सुपर सुपर स्पेशालीटीतर त्याठिकाणची परिस्थिती बघीतलीतर एन्जोग्राफी, एन्जोप्लास्टी आज रुबी हेल्थ केअरमध्ये आपण करतो, पुढच्या काळामध्ये यशवंतराव चव्हाण या हॉस्पिटलमध्ये एन्जोग्राफी, एन्जोप्लास्टी आपल्याला कराव्या लागतील आणि त्याचे जे दिड दिड, दोन दोन, तीन तीन लाख येतील ते महापालिकेच्या तिजोरीमध्ये येतील हे लक्षात ठेवा. पिंपरी चिंचवड महापालिका या संस्थेमुळे स्वतःच नाव निर्माण करणार आहे. हे देशामधील पहीली महापालिका तेथे पी.जे.इन्स्टिटयूट, मेडीकल कॉलेज हे चालू करते आणि हे शहर म्हणून आपल्याला अभिमान असायला पाहीजे. महापालिकेमधल रुबी हेल्थ केअर पुढच्या काळामध्ये बंद करुन सुपर स्पेशालीटीच्या माध्यमातून ब-याच जणांची दुकानदारी बंद होईल या भीतीन वायसीएमवर आरोप करता का. एखादया चांगल्या संस्थेला जन्म जेव्हा आपण घालतो, एखादया मुलाला जन्म देताना माझ्या भगीनीनां जो त्रास होतो, त्या बीचा-या डॉक्टर लोकांना त्रास झाला. डॉ.साळवींच मी कौतूक करेल, अभिनंदन करेल. त्या बीचा-यांनी कुठल्या गोष्टीला कर्मचारी नाही म्हणले नाही, डॉ.पंडीतांच अभिनंदन करतो, अरे, तुम्हांल त्यांची गरज नसेल परंतु एखादया अधिका-यांच्या बद्दल या सभागृहाच्या माध्यमातून त्याचा अपमान करण्याचा सुध्दा अधिकार तुम्हांला नाही. जो चांगल करतो त्याच्या माग ताकदीन उभे रहा. शाळा सुधारल्या पाहीजेत शहरामधल्या मुलांना चांगल्या पध्दतीच शिक्षण मिळाल पाहीजे. हॉस्पिटल सुधारल पाहीजे. या शहरावासीयांच्या गोरगरीबांना चांगल्या पध्दतीचे उपचार मिळाले पाहीजेत अशी उदात्त भावना ठेवा. प्रत्येक गोष्टीमध्ये राजकारण करता, प्रत्येक गोष्टीमध्ये आपलच म्हणण धरल पाहीजे. मला किती काळजी आहे असं चालल आहे, अरे, राजकारण करण्याचे सुध्दा दिवस नाहीत. मा.महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे मतदान करायच, मतदानामध्ये काय विषय होईल तो होवू दया. परंतु या शहरवासीयांना चांगल्या पध्दतीचे आरोग्य या देशवासीयांना मिळाल पाहीजे. नरेंद्रभाई मोदींच्या सरकारच कौतूक केल पाहीजे. मा.ना.जे.पी.नड्डा यांची अचारसंहीतेच्या अगोदर वेळ घेवून या शहरवासीयांना चांगल्या पध्दतीच्या सुविधा झाल्या पाहीजेत यासाठी आपण प्रयत्न करतो. अनेक मंडळी आपआपला इन्ट्रेस्ट दाखवून या

,

महापालिकेच्या माध्यमातून कार्यरत आहेत. त्यांनाही पुढच्या काळामध्ये आपल्याला जागा दाखवण्याची गरज आहे. या पुढच्या काळामध्ये भारतीय जनता पार्टीची महापालिकेमध्ये सत्ता आहे ती सत्ता एवढयासाठी आहे की वंचीतांना, शोषीतांना, या शहरातल्या शेवटच्या माणसाना चांगल्या पध्दतीने शिक्षण मिळाल पाहीजे यासाठी आम्ही प्रामाणिकपणान प्रयत्न करतो. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की ज्यांना ज्यांना असं वाटतय त्यांना नीट अभ्यास करु दयात. विनाकारण विषयाच्या संदर्भामध्ये राजकारण.......

(सभागृहात गोंधळ)

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.मंगला कदम -** नगरसचिव मतदान घ्या.

**मा.महापौर-** मतदान घ्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** विषय क्रमांक १३ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३८५ विषय क्रमांक -१३
दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.राजेंद्र लांडगे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.८२, दि.०१/०२/२०१९

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

,

विषय क्रमांक -१४

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.
२) मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४७ दि. ७/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथिमक शिक्षण विभागाच्या १०५ शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये अंदाजे ११५० मुख्याध्यापक / शिक्षक कार्यरत असून ३८,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तरी शिक्षण विभागावर नियंत्रण राखणेची संपूर्ण जबाबदारी प्रशासन अधिकारी श्रीमती ज्योत्सना शिंदे यांच्यावर आहे. तरी शिक्षण विभागात सद्यस्थितीत त्यांचे कामकाज चांगले नसून याबाबत मनपाच्या नगरसेवकांच्या व नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. तसेच त्यांना सोपविललेल्या कामाची प्रशासन अधिकारी ज्योत्सना शिंदे या टाळाटाळ करीत आहेत. तरी यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रतिमा समाजात मलीन होत आहे. प्रशासन अधिकारी ज्योत्सना शिंदे यांच्या अशा कामकाजामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील पट नक्कीच कमी होणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रतिमा खराब होणार आहे. तरी त्यांना महाराष्ट्र शासनाकडे परत पाठविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.घुले नानी उर्फ हिराबाई -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा. ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ३८६ विषय क्रमांक- १४

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव.
२) मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४७ दि. ७/२/२०१९

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

'

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा. महापौर साहेब, विषय क्रमाक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक -१५

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
नरवि/कावि/६/२५३७/२०१८ दि.२४/१२/२०१८
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३५३ दि.४/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी M/s HCP Consultant यांची विहीत प्रकीया पार पाडून सल्लागार म्हणुन नेमणुक झालेली आहे. त्या अनुषंगाने दिं. २७-११-२०१८ रोजी M/s HCP Consultant यांचे प्रतिनिधीं समवेत उपसंचालक, नगररचना यांची चर्चा झाली असुन खालील तक्त्यात नमुद गावांच्या भागांमध्ये एकुण १५ नगररचना योजना (TP Scheme) राबविणे शक्य आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे क्षेत्राचा तपशील | अंदाजे क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | थेरगाव | स.नं. - १,२,३, ३४,३५, ३६,३७ | ३९.०० |

,

| | | | |
|---|---|---|---|
| २ | चिखली | **गट.नं. -** १०३ ते २०८, २१० ते २१२,२१९, २२१ ते २४७ ,२५६ ते २७४, २८४, २७६ ते २७८, ३५० ते ३५७, ३९७, ४१८ ते ४२०४४५ ते ४६०, ५०१ ते ५१५, ५२१ ते ५२४, ४९६ ते ५००, ४२१,४४४,४६१,४६२,४१३, ५१६, ४९६,४९४,४७६, ४७४,४६३ ते ४६९ , ४४३, ४२२ ते ४३०, ४४१, ४६९,४७०, ४३१, ४३२, ४३३, ४२६, ४४२, ४७१, ४७३, ४७२, ४१२, ४११, ४१०, ४०९, ४०८, ४१४, ४१६,४१७, ४०४, ४०६, ३९८, ४०७, ४०३, ४०५, ३९६, ३५८ ते ३८४, ४०२, ३२५ ते ३२९, ३८५ ते ३९७, ४००, ४०१, ४३६ ते ४४०, ४७७ ते ४९७, ५१८, ५१९, ५३०, ५२६, ५२७, ५३३, ५१७, ५२९, ५२०, ५२८, ५२५, ५३२, ५३४, ५३५, ५३३, ५३६ ते ५३८, ३४३, ३४६ ते ३४९, २७९, २७५, २८०, ३४५, ३४२, ३४४, २८१, ३४१, ३४०, ३३६, ३३०,३३२, ३३३,३२२, ३२४,३२३,३३४, ३३५, ३००ते ३२१, २८२, २९७,२९८, २९९, २९५, २९३,२८८, २८६,२८४,२८३ ,२८५, २८७, २८९, २९१, २९१,२९०, २९६,२९२, २९४,२५५, २५१,२५०, २५४,२५३, २५२, २४८,२४९. | १२८.०० |
| ३ | चिंचवड | **स.नं. -** ८, १३, १७,१८, १९,२०,२१, २२,४१,४२,४३, ४४, ४५ , ४६, ४७,४८, ४९, ५०,५१,५२,५३,५४,५५, ७०, ७१, ७२, ७३,३६, ८१,८२, ८३ ,८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२,९३,९४,९५,९६, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२,१०३, १०४, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, १११.११२,११३ ,११४,११५,११६,११७, ११८,११९ ,१२०, १२१,१२२. | ११४.०० |
| ४ | च-होली | **न.र.यो. क्र. १ - स.नं. -** १२ ते २७ ,१६० ते १६९,१७२ ते १८२ , १८४ ते १९१ , १९३ ते १९७ , १९९ ते २००,२११ ते २००,२२१ ते २३२,२३३ ते २४८,२५०,२५० ते २५८ , २६० ते २६२,२६४ ते २८३ . | २०६.०० |
| | | **न.र.यो. क्र. २ - स.नं.** ४३१,४८३ ते ४८९ , ४४६ , ४४८ पै , ४४९ पै , ४५० पै, ४५१ ते ४५८ , ४६१ , ४६४ ते ४६८ , ३८० ते ३८४ , ३८५ ते ३९१, ३९३ ते ३९५ , ३९६ पै, ३९६ पै , ३९२ पै , ३७९ पै , ३७९ पै , ३५८ ते ३६१ , ३६३ ते ३६४ , ३६७ ते ३६८ . | ११७.०० |
| | | **न.र.यो. क्र. ३ - स.नं.** ४३२ ते ४३५ , ४२५ ते ४२८ , ४४१ , ४४३ ते ४४५ , ४४७ , ४४८पै , ४४९ पै ४५०पै , ३९९ ते ४१० , ३५२ ते ३५७ , ३७० ते ३७८ , ३९७ पै ,३९६ पै, ३९२ पै , ३७९ पै , ३६९ पै , ३४७, ३९२ पै , ३७९ पै , ३६९ पै , ३४७ | १७९.०० |
| ५ | रावेत | **न.र.यो. क्र. १ – स.नं. -** ३२, ३४, ३१, ४१, ४२,४८ ,४९, ५०,५१,५२, ५३,५९,५४, ५६, ५५,५७,५८,६३,६२,६४,६५, ६०. | ५०.०० |
| | | **न.र.यो. क्र. २ – स.नं.-** ७३, ७२, ६६, ६७, ६८, ६९,७०, ७१,८२,८१, | २५०.०० |

,

| | | | |
|---|---|---|---|
| | | ८०,७९,८३,३८, ८४, ८५, ७८,७७,९५, ९४, ९३,८६, ८७,८८,८९,९० ,९१, ९२,९७,९८,९९,१००,१०१, १०३, १५०,१५१, १५३,१४९,१४८, १५२, १४५,१४६,१४३,१४२,१४०,१३९,११३,११४,११७,११८,१२१, १२२,११०,१०५,१०४,१०९,११६,११९,१२०,१०६,१०७,१३७, १३८,१३६,१३४,१३५,१३३,१३२, १२३. | |
| ६ | किवळे | स.नं. - १ ते ६ , ८ ते २२ , ३७ , ७९ ते ८३ , ८५ , ८८ ते १०२ , ११० | २८७.०० |
| ७ | पुनावळे | स.नं. - ११ ते १४ , १६ ते २७ , २८ ते ४० , ४१ ते ४८ , ५० ते ५३ | ३९१.०० |
| ८ | ताथवडे | न.र.यो. क्र. १ - स.नं. - २८ ते ४१ , ४२ पै , ६२ ते ८० , १२६ , १२९ पै , १३३ ते १७१ , | १९०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ - स.नं. - ८६ , ८९ ते १०० , १०१ ते ११५ , ११६ ते १२७ | १५६.०० |
| ९ | मामुर्डी | स.नं. - १ ते ४ , ६ ते १२ , १३ पै , १९ पै , ३२ पै , ३३ ते ३५ | १०४.०० |
| १० | डुडुळगाव | न.र.यो. क्र. १ - गट. नं. - १९१ पै ते १९६पै, १९७ ते २००, २०१पै ते २०२ पै, ३०५, २०६, २१०, २११, २१२पै ते २१६पै, २१७, २१८, २२३ ते २४०, २४३ पै, २४१पै, २४२, २०४पै. | १३०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ - गट. नं. - ५० , ५१ पै, ५४ ते ६४, ६५पै ते ६६ पै, ६९ ते १०३, १७५ ते १८२, १८३ पै ते १८६ पै, १८८पै, १८९ पै. | ५९.०० |
| ११ | मोशी | न.र.यो. क्र. १ – गट नं - ५२६, ५२७, ५३०, ५२५, ५२३, ५२१, ५१९, ५१५, ५१४, ५१३, ५१२, ५१०, ५०९, ५०६, ५०७, ५३१, ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५३७, ५३८, ५३९, ५४०, ५१८, ५१७, ५१६, ५०८, ५०४, ५०३, ५०२, ५०१, ४९५, ४९४, ४९२, ४९३, ४९७, ४९८, ४८८, ४८९, ४८७, ४८६, ४९०, ४९१, ४८३, ४८५, ४८४, ४७८, ४७७, ४८२, ४७७, ४८१, ४८०, ४७९, ४७६, ४७५, ४७३, ४७४, ४७२, ४७१, ४७०, ४६९, ४६७, ४६८, ४६६, ४६५, ४५१, ४५०, ४५३, ४५४, ४५५, ४५६, ४५७, ४५९, ४५८, ४४२, ४४१, ४४३ ( सर्व जुने ) | १०२.६९ |
| | | न.र.यो. क्र. २ – गट नं - ४३५, ४३४, ४३३, ४३२, ४३९, ४१८, ४१९, ४३०, ४२९, ४२८, ४१७, ४१६, ४१८, ४२७, ४१५, ४१४, ४१३, ४१२, ४२६, ४२५, ४२३, ४२४, ४२१, ४२२, ४०२, ४०४, ४०७, ४०५, ४०३, ४०१, ४०८, ४०९, ४१०, ३८८,, ३८९, ३९६, ३९७, ३९१, ३९०, ३९३, ३९२, ३९४, ३९५, ३९६, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८०, ३७९, ३३९, ३३८, ३३७, ३३६, ३३४, ३३५, ३३३, ३३१, ३३०, ३२९, ३२८, ३२७, ३२६, ३२४, ३१७, ३१८, ३१९, | ९३.५१ |

,

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३२०, ३२२, ३२१, ३२४, ३२३, ३१६, ३१५, ३१४, ३१३, ३१२, ३११, २४९, २४७, २४६ ( सर्व जुने ) | |
| १२ | बो-हाडेवाडी | न.र.यो. क्र. १ मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतच्या म. प्रा. न. र. व अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावयाचे क्षेत्र | ७८.२२ |

सबब वरील तक्त्यात नमुद केलेल्या गावांमधील क्षेत्रात तसेच मा. आयुक्त वेळोवेळी तातडीनुसार सुचवतील त्या क्षेत्रासाठी तसेच सोबतच्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नगररचना योजना (TP Scheme) राबविण्यास मान्यता देणेस, व मा.महापालिका सभेच्या मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रात नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे निश्चित होणा-या क्षेत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदी नुसार सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास उदा. नगररचना योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे, प्रारूप नगररचना योजना मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सल्लामसलतीने तयार करून प्रसिध्द करणे, हरकती/सुचनांचा विचार करणे, तदनंतर प्रारूप नगररचना योजना शासनास मान्यतेसाठी सादर करणे इत्यादी प्रकीया करण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास देखील मान्यता देणेत यावी.

**मा.प्रेमकुमार उर्फ बाबू नायर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा. राजेंद्र लांडगे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ३८७ विषय क्रमांक -१५

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
नरवि/कावि/६/२५३७/२०१८ दि.२४/१२/२०१८
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३५३ दि.४/२/२०१९

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

,

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.माधवी राजापूरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३८८ विषय क्रमांक -१६

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
वैदय/१४अ/कावि/१२१/२०१९ दि.५/२/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत असणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबिय व सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी (पती / पत्नी) यांना माहे सप्टेंबर २०१५ पासुन “धन्वंतरी स्वास्थ्य योजना” लागू करणेत आलेली आहे. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेंतर्गत कार्यरत महापालिका अधिकारी / कर्मचारी यांचेकडून र.रु. ३००/- इतका स्वहिस्सा व सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचेकडून र.रु. १५०/- इतका स्वहिस्सा जमा केला जातो व एकुण जमा होणा-या हिश्याच्या दुप्पट रक्कम महापालिका धन्वंतरी निधीमध्ये जमा करीत असते. या योजनेंतर्गत खाजगी रुग्णालयांसोबत करारनामा करणेत आलेला असून, त्या ठिकाणी उपचार घेणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्या बीलांची अदायगी थेट स्वरुपात संबंधित रुग्णालयांना महापालिकेने निश्चित केलेल्या वैद्यकिय उपचारांचे दरांनुसार धन्वंतरी निधीमधून केली जाते. सदरचे धोरणास मा.महापालिका सभा ठराव क्र. ४७५, दि. २०-०२-२०१४ व ठराव क्र. ५४९, दि. १९-०८-२०१४ अन्वये मान्यता देणेत आलेली होती.

सदरची योजना सुरु करतेवेळी धन्वंतरी योजनेंतर्गत जमा होणा-या एकूण निधीची रक्कम रु. ९.२६ कोटी इतकी अंदाजित करणेत आलेली होती व त्यामधूनच वैद्यकिय उपचारार्थ होणा-या खर्चाची अदायगी करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात योजना लागू झालेनंतर जमा होणारा निधी व होणारा खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत निर्माण झाली. परिणामी धन्वंतरी निधीमध्ये महापालिकेला निश्चित केलेल्या हिश्याच्या रकमेपेक्षा जास्त रक्कम जमा करणे आवश्यक ठरले. धन्वंतरी स्वास्थ्य योजना सुरु झालेपासुन म्हणजेच

,

माहे ऑक्टोबर २०१५ ते जानेवारी २०१९ अखेर र.रु. ६०.९३ कोटी इतक्या रकमेच्या बीलांची अदायगी करणेत आलेली आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये सद्यस्थितीत एकुण ९३ रुग्णालयांचा समावेश आहे. धन्वंतरी धोरणांतर्गत वरीलप्रमाणे झालेल्या खर्चाचा विचार करता, प्रत्यक्षात अंदाजित केलेल्या रकमेपेक्षा कितीतरी पटीने जास्त रक्कम यावर खर्च होत आहे. तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेवर केले जाणारे वैद्यकिय उपचार हे नियंत्रित करता येण्याजोगी बाब नाही. त्याचप्रमाणे या योजनेंतर्गत ९३ ही मर्यादित रुग्णालयांची संख्या असल्याने काही वेळेस आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपचार घेणेकरीता अडचणी निर्माण होतात. तथापि, वैद्यकिय विम्यांतर्गत जवळपास ६००० रुग्णालयांचा समावेश असल्याने आपत्कालीन परिस्थितीमध्ये देखील जवळच्या रुग्णालयामध्ये उपचार घेण्यास अडचणी संभावणार नाहीत. त्यामुळे धन्वंतरी योजनेऐवजी खाजगी विमा ब्रोकरची नेमणुक करुन “वैद्यकिय विमा” उतरविणेबाबत निश्चित करणेत आलेले होते. त्यानुषंगाने याकरीता M/s. K. M. Dastur Reinsurance Brokers Pvt. Ltd. यांची, कार्यरत / सेवानिवृत्त महापालिका अधिकारी / कर्मचारी यांचा “वैद्यकिय विमा” उतरविणेकरीता ब्रोकर म्हणुन नेमणुक करणेत आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये महापालिका अधिकारी / कर्मचारी यांना लागू करणेत आलेली “धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३” या धोरणा ऐवजी वैद्यकिय विमा ब्रोकरची नेमणुक करुन कार्यरत / सेवानिवृत्त महापालिका अधिकारी / कर्मचारी यांच्या “वैद्यकिय विमा” बाबत नव्याने धोरण निश्चित करणेची कार्यवाही कार्यान्वित आहे. वैद्यकिय विमासंदर्भात नव्याने निश्चित होणा-या धोरणामध्ये खालीलप्रमाणे बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे:

१. धन्वंतरी स्वास्थ योजना धोरणाचे धर्तीवरच वैद्यकिय विमा योजना निश्चित करण्यात येणार आहे.

२. यामध्ये इन्शुरन्स ब्रोकरमार्फत RFP तयार करुन निविदेद्वारे इन्शुरन्स कंपनीची निवड करण्यात येणार आहे.

३. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेंतर्गत एका अधिकारी / कर्मचा-याकरीता वार्षिक २० लाख इतकी खर्च मर्यादा निश्चित करणेत आलेली होती. नव्याने निश्चित करण्यात येणा-या वैद्यकिय विम्यांतर्गत प्रति कुटूंब र.रु. ३ लाख इतक्या रकमेचा विमा उतरविणेत येणार

,

असून, आजाराचे स्वरुपानुसार हीच मर्यादा २० लाखांपर्यंत वाढेल. याकरीता १० कोटी इतक्या रकमेचा बफर निश्चित केला जाणार आहे.

४. सद्यस्थितीत लागू असणा-या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेनुसार निश्चित करण्यात आलेले आजार / उपचारांचा समावेश यामध्ये करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे दुर्धर आजारांचा देखील यामध्ये समावेश असेल.

५. धन्वंतरी योजनेमध्ये समाविष्ट असणा-या ९३ रुग्णालयांसह संपुर्ण भारतातील जवळपास ६००० रुग्णालयांचा यामध्ये समावेश असेल. त्यामुळे महापालिका अधिकारी / कर्मचारी यांना आवश्यकतेनुसार योग्य त्या रुग्णालयांमध्ये उपचार करणे शक्य होईल. याचा फायदा दुर्धर आजारांवरील जे उपचार राज्याबाहेर उपलब्ध आहेत, असे उपचार देखील महापालिका अधिकारी / कर्मचा-यांना घेणे शक्य होणार आहे.

६. वैद्यकिय विमा उतरविणेकरीता निश्चित केलेल्या ब्रोकरमार्फत RFP (Request for Proposal) प्रमाणे निविदा प्रक्रिया राबवून संस्था निश्चित केली जाणार आहे. तदनंतर याबाबतचे सर्व कामकाज हे संबंधित ब्रोकरमार्फत केले जाणार आहे.

७. सदरचे वैद्यकिय विम्याकरीता अधिकारी / कर्मचारी यांच्या हिश्यानुसार दरमहा वेतनातून कपात करावयाची रक्कम अद्याप निश्चित झालेली नाही. याबाबतचा निर्णय पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ यांचेशी चर्चा करुन घेतला जाईल व त्यासंबंधीचे आदेश मा.आयुक्त यांचेमार्फत स्वतंत्रपणे पारित केले जातील.

वरीलप्रमाणे निश्चित केलेली वैद्यकिय विमा योजना लागू झालेनंतर, “धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३” नुसार होणारी कार्यवाही बंद होणार असून “वैद्यकिय विमा” लागू करावयाचे स्वतंत्र धोरण निश्चित होणार आहे.

तरी महापालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचारी कुटुंबिय व सेवानिवृत्त महापालिका अधिकारी / कर्मचारी (पती / पत्नी) यांना “धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३” बंद करुन त्याऐवजी “वैद्यकिय विमा” बाबतचे नव्याने निश्चित केलेले धोरण लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्या माहितीप्रमाणे जी धन्वंतरी योजना होती त्यासाठी ९ कोटी रु. ठेवले व बील झाले ६० कोटीची. आता विमा कवचचा विषय आहे. ज्यावेळेस कर्मचारी काम करत असतो, तो पुर्णपणे

,

नोकरी करतो. त्यावेळेस त्यांना जी धन्वंतरी योजना दिली होती, धन्वंतरीचा जरी पेशंट असलातरी सुध्दा तेवढेच पैसे जाणार आहेत. विमा असेलतरी सुध्दा तेवढेच पैसे जाणार आहेत. याच्यावर विचार केला पाहीजे. नुसतेच मंजूर करुन कसं चालेल. कर्मचा-यांशी बोललात का, महासंघाशी बोललात का, डॉक्टराशी बोललात का. आज आपण नगरसेवकांसाठी विमा पाच लाखाचा केलेला आहे. यातल्या किती लोकांनी त्याचा बेनिफीट घेतला. त्यांनाही माहिती असेल की ज्यावेळेस आपण कॅशलेस पॉलीसी करतो त्यावेळेला हॉस्पिटलमध्ये पहीले बील भरा म्हणतात. कर्मचा-यासाठी ही पॉलीसी दिलीतर यांच्याकड पैसे असणार आहेत का. या विषयी काही विचार केला का. मा.महापौर साहेब, त्यामुळे या विषयाची गडबड करु नका. नगरसेवक पैसे भरु शकतात. केसलेस पॉलीसी असली तरी सुध्दा पहील्यांदा ऍडव्हान्स भरा म्हणतात. परंतु कर्मचा-यांना दरवेळेला आई-वडील, बायको, मुल यांना ज्यावेळेस दवाखान्यात घेवून जातील त्यावेळेस ऍडमीटतर करुन घेतात व चोवीस तासामध्ये तो इन्शूरन्सवाला अजीबात त्याठिकाणी पोहचत नाही. आणि मग तीथ कर्मचा-याची परखड होईल. त्याच लक्ष कामावर राहणार का. हा महत्वाचा विषय आहे. त्यामुळे तुम्ही हा विषय करताना अजीबात गडबड करु नये. कर्मचा-यांच्या बाबतीतला हा विषय आहे. खुलासा करावा की कर्मचा-यांना याच्यातुन कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. कोणताही विमाधारक वेळेवर हॉस्पिटलला पोहचत नाही. कोणीही पेमेंट करत नाही. कॅशलेस पॉलीसी असेलतर कर्मचा-यांचे कुटूंब कॅशलेसच दवाखान्यातून बाहेर पडले पाहीजेत. त्यामुळे या विषयाचा खुलासा झाल्यानरंतर मला परत बोलायचे आहे.

**मा.डॉ.अनिल रॉय -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सध्या आपण धन्वतरी २०१५ पासून चालू केला होता. आपला अपेक्षीत खर्च वर्षाला ९ कोटी असा होता. तथापि पहील्या सहा महीन्याचा आपला खर्च ११ कोट रु. झाला. आपण ४ कोटी ८० लाखाची बील देवू शकलो. पुढील वर्षात २०१६-१७ मध्ये २० कोटीचे बील आपल्याकडे प्राप्त आहेत. त्यात मागील थकबाकी ६ कोटी रु. होती. त्यामुळे त्यांचे पुर्ण बील अदा करता आले नाही. २०१७-१८ मध्ये एकूण १४ कोटीची बील प्राप्त झाले आणि १४ कोटी शिल्लक आहेत. चालू वर्षात जानेवारी आखेर १७ कोटी २९ लाखाची बील प्राप्त आहेत. मागील थकबाकी ८ कोटी आहे. अजून दोन महीने जायचे आहेत म्हणजे अजून साधारणपणे आपले २० ते २५ कोटी रु. आऊटगो आहे. पैसे खर्च होतात पण रुग्णालय जे आपल्याकडे आहेत ते सुरवातील १२३ होते आता फक्त ९४ रुग्णालय आहेत. पुण्यामधील अनेक रुग्णालय आहेत उदा.रुबी हॉल,

,

जहांगीर हॉस्पिटल, केईएम हॉस्पिटल, दिनानाथ मंगेशकर हे या स्किममध्ये यायला तयार नाहीत. इथ देखील निरामय सारख रुग्णालय या स्किममध्ये यायला तयार नाही. आपले अनेक कर्मचारी याठिकाणी ऍडमीट होतात. इन्शुरन्सचा फायदा एवढाच होणार आहे की त्यांच्या अखत्यारीत सहा हजार हॉस्पिटल आहेत, पैशात बचत होणार. दुसरी गोष्ट खर्चाला मर्यादा येणार आहे. कॅसलेस स्किम असणार आहे. धन्वतरीला देखील हॉस्पिटल ऍडव्हान्स घेतोच. ऍडमीनिस्ट्रेशन दहा टक्के हॉस्पिटलचे आहेत त कोटेशन करुन आतापर्यंत कर्मचा-याकडून ऍडव्हान्स घेतला जातो ते पैसे कर्मचारीच भरतो.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यांनी खुलासा करताना सांगीतल की पैशामध्ये बचत होणार आहे. कर्मचा-यांना ज्यावेळेला धन्वंतरी योजना लागू केली त्यावेळेस करायची नव्हती ना. त्यावेळेला माहिती नव्हतं का. जर हा आकडा असा असेल ११ कोटी १८ कोटी २० कोटी ६ कोटी शेवटचे देणे. १४ कोटी मध्यंतरी दिले. हा जर असा आकडा असेलतर तुम्ही मा.महापौर साहेब सांगा की पिंपरी चिंचवडची एवढी वाईट परिस्थिती आहे का की आरोग्य विभाग ढासळला आहे. लोकांवर नाहीतर आपल्या कर्मचा-यांच्या नातेवाईक कुटूंबावर एवढा खर्च करावा लागतो आपल्याला. तर अख्ख्या शहरामध्ये किती खर्च होत असेल. याचा अर्थ असा होतो की पिंपरी चिंचवड शहराच्या आरोग्याचीच क्षमता पुर्ण ढासळलेली आहे. कोणाच्या बाबतीत घडला हा प्रश्न नाही. प्रत्येकाच्या इथ चार चार, पाच पाच पॉलीसी आहेत. परंतु प्रत्ये पॉलीसीधारकाला हाच प्रॉब्लेम येतो. ओरीजन पेपर सादर केला नाही, आमच्या ते नियमताच बसत नाही. आम्ही हेच करणार नाहीत. आपल्या कर्मचा-यांच्या बाबतीत हे झालतर कर्मचा-यांना चालणार आहे का हा माझा मुद्दा आहे. माझा मुद्दा काय आहे हे लक्षात घ्या. नाहीतर आपल्या कर्मचा-यांना सांगाना आम्ही फक्त वायसीएम, तालेरा आमची जेवढी पिंपरी चिंचवडची हॉस्पिटल आहेत तेवढीच फक्त आम्ही देणार. कशाला तुम्ही बाहेर रेफर करता मग. तुम्हांला काटकसरच करायची आहेना मग कर्मचा-यांच्या बाबतीत असा नियम लागू करा की आम्ही फक्त आमच्याच महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये आम्ही देणार. त्याच्या व्यतिरीक्त प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये आम्ही पाठविणार नाहीत. हे चुकीच आहे. येथून पुढे वार्षीक कितीची पॉलीसी उतरविणार एका कर्मचा-याची.

**मा.डॉ.अनिल रॉय -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वार्षीक तीन लाख रुपयाची पॉलीसी उतरविणार आहेत आणि त्याला बफर असणार १७ लाख रु.असे एकूण २० लाख रुपये. तीन लाखाची पॉलीसी उतरविणार आहेत. ऍक्सीडेंट इन्शूरन्स फक्त कर्मचा-

,

यांपुरताच असणार आहे. ओपीडी खर्च १० हजार प्रती वर्षे जो आता आपण देत नाहीत. आणि दु र्धर आजारासाठी एक लाख रुपये.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्या कर्मचा-यांच्या बायकोचा ॲक्सीडेंट झालातर तीला हॉस्पिटल फॅसिलीटी, पॉलीसी तीन लाखाची आणि बफरींग सतरा लाखाच केल आहे. कर्मचारी महासंघाकडून हे मंजूर होवून आलं का. आम्ही कर्मचा-यांच्या बाजूने आहेत. आज आपण म्हणतो जसे आपले जवान शहीद झाले परंतु त्यांच्या मागच्या लोकांच काय. उदया आमचे फायरचे लोक आहेत, अतिक्रमणाला लोक जातात. उदया दगडफेक झाली, शहरामध्ये काही झालतर शेवटी आम्ही कर्मचा-यांच्या बाजूने बोलणार. कर्मचा-यांना हे मान्य असेलतर आम्हांला मान्य आहे. तुम्ही कर्मचारी महासंघाची मिटींग लावा, कर्मचा-यांची मिटींग घ्या, प्रशासनाची मिटींग घ्या. या लोकांना जर मान्य असेलतर आम्हांला मान्य आहे. असे होणार नसेलतर त्यांना जर २० लाखाच मंजूर असेलतर आमच काहीही नाही. वीस लाख म्हणलतरी सुध्दा बिलींगच्या वेळेला तीप्प्ट निधी लावतात.

**मा.डॉ.अनिल रॉय -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. मागील तीन वर्षात बहुतांशी ८० टक्के बील ही एक लाखाच्या आत आहेत. १० टक्के बील १ लाख ते तीन लाखाचे आहेत. पाच ते दहा लाखाचे बील पंधरा ते सोळा टक्के आहेत. तसेच एकूण कर्मचारी ७५०० आहेत व टोटल कुटूंब आहे ५० हजार.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यावर आम्हांला काहीही म्हणायच नाही. आमच म्हणण आहे कर्मचा-यांना मान्य असेलतर आम्हांला मान्य आहे.

**मा.डॉ.अनिल रॉय -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. त्यांच्या बरोबर मिटींग झालेली आहे.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मग तसा खुलासा करायचाना कर्मचा-याबरोबर मिटींग झाली म्हणून. कर्मचा-यांना, महासंघाला मान्य असेलतर आमच काहीच म्हणण नाही. अन्यत: हे चुकीच आहे हे आताही सांगते. महासंघाने निर्णय घेतलेला असेलतर ठिक आहे. उदयाच्याला धन्वंतरीची जशी गडबड केली तस होवू नये.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पहील्याप्रथम तुम्ही या सभागृहाच्या समोर तुम्ही ही गोष्ट सांगा की कर्मचारी महासंघा बरोबर आपली मिटींग झाली होती. त्यांच म्हणण काय काय होतं. या महापालिकेच्या अस्थापनावरच्या कुटूंबीयाना

,

चांगल्या पध्दतीची ट्रिटमेंट मिळाली पाहीजे. जास्तीत जास्त पैसे मिळाले पाहीजेत. कर्मचारी महासंघा बरोबर तुमची मिटींग झालीतर त्यांच काय म्हणण आहे ते सभागाच्या समोर सांगा. त्यांच म्हणण ओके असेलतर यांच काहीही म्हणण नाही.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. रॉय सर मी तुम्हांला असं सांगत की, धन्वंतरीच्या बाबतीत आपण असंच केलं, कर्मचा-यांचा खुप फायदा होणार जेनरीक मेडीसीन दिलतर असं होणार, तसं होणार पण काहीही झाल नाही. तसेच या योजनेचा तुम्ही विचार करावा. मा.महापौर साहेब, माझ म्हणण असं आहे की धन्वंतरीच्या बाबतीत सुध्दा गडबड झाली तशी गडबड करु नये आणि ज्यावेळेला माझा कर्मचारी अणि आपल्या सर्वाचा कर्मचारी ज्यावेळेला ॲडमीट होईल त्यावेळेला कॅशलेस पॉलीसमधुन ज्यावेळेला जाणार त्या कर्मचा-यांना त्याच्या नातेवाईकाना पहीले पैसे भरा, हा आमका आजार त्याच्यात येत नाही, अमक्या पैशात होत नाही हे कारण दाखवता कामा नये. ही जबाबदारी जर घेणार असतीलतर हा विषय आणि कर्मचारी महासंघाने मान्य केला असेलतर.

**मा.डॉ.अनिल रॉय -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. कर्मचारी महासंघा बरोबर धन्वंतरीच्या वेळेला मिटींग झाली त्यावेळेला मान्यता आह तथापि काही त्यांनी बदल सुचवलेल आहेत.

**मा.मंगला कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. धन्वंतरीच्या बाबतीत सुध्दा अशीच गडबड झाली होती त्यास माझ ऑब्जेक्शन नाही परंतू यातून कुठल्याही कर्मचा-याच्या कुटूंबीयास त्रास होवू नये एवढच माझ म्हणण आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सीमा चौगुले -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

,

ठराव क्रमांक – ३८९ विषय क्रमांक -१७

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्वभाअक/१/कावि/ ३७/२०१९ दि. ७/०२/२०१९

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु.८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १५९०२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत | १५९०२ | |

,

| | | | |
|---|---|---|---|
| स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १३३०९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१२७१५ | मनपामार्फत बांधकाम पुर्ण-८५६७<br><br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम -४१४८ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२ सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ९१९९ लाभार्थी | GOI+GOM=५५१.९४ लाख | GOI =२०००/- व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १८३.९८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७३५.९२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ८३४३ लाभार्थी | GOI+GOM=५००.५८ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१६६.८६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६७७.४४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.माधुरी कुलकर्णी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३९० विषय क्रमांक -१८

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दिनांक २१/१२/२०१८, ०४/०१/२०१९ व ०८/०१/२०९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०८/०१/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १८/०१/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.माधुरी कुलकर्णी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३९१ विषय क्रमांक -१९

दिनांक – २२/२/२०१९ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक १९/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ११/०१/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक २५/१/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

